४२ शब्द रुची

मूल्य १० रुपये • पृष्ठे ६८

# साहित्य संमेलन कशासाठी?


Offbeat Tour Operators
isha tours®
Lets explore the world...
2017
International & Domestic Tours Attractions
लेह लडाख
२३ व ३० मे, २०१७
९ व २२ जून, २०१७
४,११ व २५ जुलै, २०१७
१२ व १४ ऑगस्ट, २०१७
१७ सप्टेंबर, २०१७
विंटर लडाख
• २५ जानेवारी • ११ फेब्रुवारी २०१७
अंदमान (स्वा. सावरकर स्मरणयात्रा)
• २५फेब्रुवारी २०१७
नॉर्थ ईस्ट
• ११ एप्रिल २०१७
स्कॅंडिनेव्हिया
नॉर्वे, फिनलँड,स्वीडन
• २१ जून, २०१७
केनिया - टांझानिया
• १९ मे २०१७ केनिया - टांझानिया
• २८ मे २०१७ टांझानिया
ईस्टर्न युरोप
• ०३ जुलै२०१७
ईशा टूर्सच्या इतर कौटुंबिक सहली :
• राजस्थान • केरळ • मनाली • सिक्किम
• नैनिताल • कर्नाटक • ओरीसा • सिंधुदूर्ग-कोकण
इतर वाईल्ड लाईफ सहली :
• पेंच • कान्हा • बांधवगड • रणथंबोर
• सुंदरबन • काबिनी • काझिरंगा
info@ishatours.net | ✆ 8080 144 000 | www.ishatours.net
संपर्क कार्यालये ठाणे - १ए, मुरलीधर सोसायटी, ब्राम्हण सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे. (प)
✆ ०२२ २५४३ ७४१७ / २५४३ ७४५८, ९३२०१ ३१९१० दादर - लक्ष्मी सदन, भारत पेट्रोलियम पंपच्या शेजारी,
गोखले रोड (नॉर्थ), दादर, मुंबई २८ ✆ ९३२००३१९१० बोरीवली - १०३, साई आदर्श, लिंकविन्नू रेस्टॉरंटच्या मागे, ऑफ लिंक रोड,
सावली हॉस्पिटलच्या समोर, बोरीवली (प). ✆ ९३२४५३१९१० पुणे - गीतांजली : ९३२०९३१९१०
कुडाळ - उदय : ९१६९०२३२३४ गोवा - राजीव सिंम्बाळ : ९८९००१८७२०

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

४२ ग्रंथाली

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

जानेवारी २०१७, वर्ष तिसरे
अंक नववा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : डॉ. वीणा सानेकर
मुखपृष्ठ : सतीश भावसार

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप / मधु भोसले
granthaliad@gmail.com
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी २५० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## संपादकीय...

समाजाच्या सर्व स्तरांचे प्रतिबिंब साहित्यात उमटेल तेव्हाच मराठी साहित्य खऱ्या अर्थाने समृद्ध होईल असे मानणाऱ्या 'ग्रंथाली' वाचक चळवळीचा अविभाज्य घटक म्हणजे शब्दरुची!

'ग्रंथाली'च्या निवडक पुस्तकांचे संपादन, काही कार्यक्रमांतील सहभाग, कादंबरी आणि भाषा-साहित्य या 'शब्दरुची'च्या विशेषांकाचे संपादन या साऱ्यांतून टप्प्याटप्प्याने मी 'ग्रंथाली'शी जोडली गेले. या प्रवासातील आणखी एक पाऊल आता टाकते आहे. त्याकरता 'ग्रंथाली' परिवाराने माझ्यावर जो विश्वास दाखवला तो मौलिक आहे.

'ग्रंथाली' ही 'संस्कृतिकारणा'शी जोडलेली आणि गेली ४२ वर्षे अव्याहत सुरू असलेली चळवळ आहे. गेली आठ वर्षे मी मराठीच्या चळवळीत आहे. आम्हा कार्यकर्त्यांचा शब्द म्हणजे 'मराठीकारण'! चळवळीच्या बंधातून 'ग्रंथाली' आणि 'शब्दरुची'त सहभागी होणे मला महत्त्वाचे वाटते. नव्या जाणिवांचा आणि लेखकांचा शोध घेणाऱ्या पूर्वसुरींची वाट समोर असल्यामुळे स्वतःचा विचार करायला, मांडायला, चुकायला आणि त्यातून शिकायला पूर्ण वाव आहे.

२०१७ सालातील प्रस्तुतचा जानेवारीचा अंक अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनावर केंद्रित आहे. साहित्य संमेलनाचे पडघम वाजू लागले असताना त्याविषयीचे वेगवेगळ्या पिढ्यांतील लेखक-अभ्यासकांनी, कलावंतांनी, वाचकांनी केलेले विचारमंथन या अंकाच्या निमित्ताने चर्चेला यावे अशी संकल्पना समोर ठेवून हा अंक प्रकाशित करतो आहोत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आता जत्रेचे स्वरूप आले आहे' हा सूर काही नवा नाही, पण दीर्घकाळ सुरू असलेल्या या उपक्रमाची आवश्यकता, अनावश्यकता, त्याचा समाजमानसावर होणारा परिणाम, मराठी भाषा व साहित्याच्या वाटचालीसाठी त्याच्यातून दिसणाऱ्या दिशा अशा मुद्द्यांची चाचपणी या अंकातून

व्हावी असा मानस आहे. संमेलनाकडे पाहण्याच्या विविध दृष्टींचा वेध घेण्याचा उद्देश समोर ठेवून या अंकाची रूपरेषा आखली आहे.

'साहित्यसंमेलन माझ्या नजरेतून' या विभागात ज्येष्ठ समीक्षक निशिकांत मिरजकर, कादंबरीकार प्रवीण बांदेकर, तरुण कथाकार प्रणव सखदेव, जागतिक साहित्याचे चोखंदळ वाचक-अभ्यासक शशिकांत सावंत यांचे लेख आहेत तर दुसऱ्या विभागात स्त्रियांच्या नजरेतून मांडलेला साहित्य-संमेलनांचा लेखाजोखा आहे. ज्येष्ठ लेखिका व संशोधक डॉ. प्रतिमा इंगोले, पत्रकार डॉ. अस्मिता गुरव यांनी लिहित्या स्त्रियांचा प्रातिनिधिक स्वर मुखर केला आहे. या अंकातील तिसरा विभाग माध्यम प्रतिनिधींच्या मतमतांतरांवर प्रकाश टाकतो. साहित्यचळवळींशी जोडल्या गेलेल्या विजय चोरमोरे यांनी प्रसारमाध्यमांतून होणाऱ्या साहित्यसंमेलनाच्या चित्रणाचे पैलू अधोरेखित केले आहेत तर मुक्त पत्रकार प्रशांत डिंगणकर यांनी साहित्यसंमेलनातील राजकारण्यांच्या सहभागावरील प्रश्नचिन्हाला केंद्रस्थानी ठेवून संमेलनाशी निगडित अन्य प्रश्नांची मांडणी केली आहे.

कथात्म साहित्याचे लेखक आणि समीक्षक जी.के. ऐनापुरे आणि विचारवेध संमेलनाच्या उभारणीतले बिनीचे शिलेदार असणारे राज्यशास्त्राचे अभ्यासक किशोर बेडकिहाळ हे दोघेही तसे समकालीन! त्यांच्या मार्मिक प्रतिक्रियांचा समावेश या अंकातील स्वतंत्र विभागात आहे.

अलीकडेच अनिल साबळे या कवीची कविता वाचनात आली. आदिवासी आश्रमशाळेत काम करणाऱ्या या तरुण कवीची कविता आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या जगण्याच्या अंगाने व्यक्त होते. वस्तीपाड्यांतून उमेदीने लिहिणाऱ्या तरुणाईची प्रतिक्रिया अनिल साबळेने व्यक्त केली आहे.

ओंकार थोरात यांनी प्रश्नावलीच्या आधारे घेतलेल्या शोधाच्या आधारे साहित्यसंमेलनातून सांस्कृतिक समज व अभिरुचीचे संवर्धन होते का? या मुद्द्याचे विस्तृत विवेचन केले आहे तर मराठी भाषेशी संबंधित पैलूंचा सखोल अभ्यास असणाऱ्या डॉ. प्रकाश परब यांनी 'संमेलन आणि भाषा संवर्धन' या विषयाचे चिकित्सक विश्लेषण केले आहे.

चित्रकार प्रदीप म्हापसेकर यांची हसत-हसत कोपरखळी मारणारी व्यंगचित्रे निखळ आनंद देणारी आहेत मात्र त्यांच्याकडे तितकेच निखळपणे पाहता यायला हवे. याही अंकात डॉ. अनंत लाभसेटवार यांचे अमेरिकेची सफर घडवणारे सदर आणि ग्रंथपानेही समाविष्ट आहेतच.

कुंठिततेच्या कात्रीत अडकलेल्या समाजाला सामाजिक लोकशाहीची दिशा देण्यासाठी धडपडणाऱ्या न्यायमूर्ती रानडे आणि लोकहितवादींनी ग्रंथकारसभेची संकल्पना मांडली. आजवर झालेल्या ८९ अखिल भारतीय साहित्यसंमेलनांच्या अध्यक्षांपैकी निवडक अध्यक्षांनी मराठी भाषा, समाज-संस्कृतीसंबंधातील आपल्या भूमिका, त्या-त्या काळातील प्रश्नांच्याबाबत ठामपणे मांडल्या. शि.म. परांजपे, न.र. फाटक, श्री.व्यं. केतकर, द.वा. पोतदार, दुर्गाबाई भागवत अशा अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांतून थेट राज्यकर्त्यांवर फैरी झाडल्या. सर्वांचाच उल्लेख इथे करणे शक्य होणार नाही, पण निवडक संदर्भ पाहणे सयुक्तिक होईल.

१९३१ साली श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी साहित्य-संमेलनापुढील कार्य स्पष्ट करताना म्हटले, की मराठी साहित्य-संमेलनापुढील कार्य म्हणजे केवळ काव्य-नाटक याविषयी चर्चा करण्याचे नाही. भाषारक्षण हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. भाषा जगेल तरच तीत साहित्य वाढेल.

१९६२ साली काकासाहेब गाडगीळ यांनी संमेलन म्हणजे काय हे स्पष्ट शब्दांत सांगितले. ''महाराष्ट्रीयांच्या आकांक्षा बोलून दाखवणारी ही एक संस्था असून तिला मिळालेली प्रतिष्ठा लक्षात घेता तिने आपले कार्य निर्भयपणे पण जबाबदरीने पार पाडले पाहिजे. काय हवे आहे, काय इष्ट आहे, काय अन्याय होत आहे या सर्वांचा जाहीर उच्चार येथून झाला पाहिजे.''

१९९५ च्या परभणी येथील साहित्य संमेलनात कवी नारायण सुर्वे यांनी समाजाने वर्षानुवर्षे स्वत:वर लादून घेतलेल्या कर्मकांडाच्या, उच्चनीचतेच्या, प्रारब्धवादी रुढिग्रस्ततेच्या ओझ्याचा उच्चार केला. आजही धर्माच्या नावावर प्रगत मानवी मूल्यांना आव्हान दिले जाते, ही शोचनीय घटना आहे हे त्यांचे विधान समकालीन वास्तवाच्या संदर्भात मोलाचे आहे.

कऱ्हाड येथील साहित्यसंमेलनात (१९७५) दुर्गाबाईंनी आविष्कारस्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या केंद्र सरकारचा निर्भीडपणे निषेध केला तर बेळगावच्या साहित्यसंमेलनाने (२०००) सीमा भागातील लढ्याचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात पोहोचवला (आजही तो अनिर्णित आहे.) याच संमेलनात य.दि. फडके म्हणाले होते, ''नेत्यांचे दैवतीकरण करण्याची प्रवृत्ती, जातीविषयीचा

व धर्माचा दुरभिमान या दुष्प्रवृत्ती वाढीस लागल्या की कोणाच्या भावना केव्हा दुखावतील याचा नेम नाही. आविष्कारस्वातंत्र्यावर आघात करण्याच्या सवयीस वेळीच आळा घातला नाही तर लोकशाहीचे रूपांतर प्रथम झुंडशाहीत आणि नंतर एकपक्षीय हुकूमशाहीत किंवा लष्करशाहीत होते.'' य.दि. फडके यांनी मांडलेल्या विचारांची सत्यता किंचितही कमी झालेली नाही. न्यायमूर्ती रानडे यांनी दिलेल्या ग्रंथकार सभेच्या निमंत्रणास म. फुले यांनी नकार दिला. त्यामागे त्यांची एक दृष्टी होती. म. फुलेंना अपेक्षित बंधुप्रिती वाढवण्याचे बीज इतक्या वर्षांनंतरही सापडत नसेल, तर अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या शतकपूर्तीची वाट पाहण्यात अर्थ आहे असे वाटत नाही.

कधी राजकारणमहर्षी तर कधी शिक्षणमहर्षींच्या तालावर आज संमेलने चालतात मग 'साहित्यसंमेलनात वाद नकोत', अशी सोयीची भूमिका घेऊन अंगाला काही लावून न घेणाऱ्या अध्यक्षांच्या मालिकेत भर पडत राहते. साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष गुळाचा गणपती असून उपयोग नाही. भाषेच्या प्रश्नांसाठी, शिक्षणातील संपत चाललेल्या मराठीसाठी, रया जात चाललेल्या ग्रंथालयांसाठी, आकसत चाललेल्या अभिव्यक्तीस्वातंत्र्यासाठी, शोषितांचा उलगुलान समजून घेण्यासाठी ठामपणे भूमिका घेऊन काम करण्याची गरज आहे. साहित्यसंमेलनाच्या तीन दिवसांच्या मंडपात हे प्रश्न सुटणार नाहीत.

आजच्या काळात जी आव्हाने समाजासमोर उभी आहेत त्यांना भिडायचे तर अभ्यास-संशोधनापासून रस्त्यावरच्या चळवळींपर्यंत सर्व अंगांनी भिडावे लागणार. निर्माण होणारी प्रत्येक नवी गोष्ट क्षणात 'गार्बेज'मध्ये रुपांतरित होण्याचा आजचा काळ आहे आणि विचारही केराप्रमाणे आपण पायदळी तुडवू पाहात आहोत. विचार नष्ट होत जाण्याचा धोका वेळीच ओळखायला हवा.

विचाराला विचाराने उत्तर देण्याचा विवेक आज संपत चालला आहे. पुण्यात घडलेल्या राम गणेश गडकरी यांच्या पुतळ्याच्या विटंबनेतून हेच निदर्शनास येते. ऐतिहासिक बीजावर आधारित कलाकृती लिहिताना लेखक त्याच्या काळात उपलब्ध साधनांच्या आधारे ती लिहितो आणि साहित्यकृतीतील पात्रप्रतिमा उभ्या करतो. हेही खरे की आपापल्या पद्धतीने अर्थ लावण्यास महाराष्ट्राच्या इतिहासात पुष्कळच वाव आहे. मात्र इतिहासातील दुखऱ्या जागा आणि फटी शोधून वर्तमान समाजातले वातावरण गढूळ करणे उचित नाही.

ज्या समाजात आपण जगतो त्या समाजातले विचारविश्व प्रवाही असायला हवे. परस्परविरोधी मतांची-दृष्टिकोनांची टक्कर अटळ आहे मात्र त्यापलीकडे जाऊन संवादाची काही एक बैठक निर्माण करणे गरजेचे आहे. या अर्थाने 'शब्दरुची' हा विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान यांची सांगड घालणारा विचारमंच व्हावा.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा आणि महानगरी जीवनाचा आरसा समोर धरणारे लेखक, विचारवंत आणि 'ग्रंथाली'चे अग्रणी अरुण साधू यांना महाराष्ट्र फाउंडेशन जीवन गौरव घोषित झाला, तर आसाराम लोमटे यांचा 'आलोक' साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ठरला. दोघांचेही मनःपूर्वक अभिनंदन!

'ग्रंथाली' परिवारातील श्याम जोशी यांना नुकताच राज्यशासनाने 'भाषासंवर्धक पुरस्कार' जाहीर केला. बदलापूरमध्ये त्यांनी उभे केलेले काम, ग्रंथसखा वाचनालय आणि त्याकरताचा त्यांचा ध्यास प्रत्यक्षच अनुभवला पाहिजे. श्याम जोशी यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

२०१६ च्या सरत्या टप्प्यावर व्रतस्थ व व्यासंगी विचारवंत वसंत पळशीकर, ग्रामीण साहित्य चळवळीतले लेखक आनंद यादव, परिवर्तनवादी लेखक वामन होवाळ, संवेदनशील कलावंत अश्विनी एकबोटे, व्यंगचित्रकार वसंत सरवटे आणि युद्ध, स्पर्धा व ढोंगीपणाला जन्म देणाऱ्या भांडवलशाहीचा कट्टर विरोधक फिडेल कॅस्ट्रो यांनी जगाचा निरोप घेतला त्यांना 'शब्दरुची'ची भावांजली!

जानेवारीच्या प्रस्तुत अंकाकरता प्रसाद हावळे या युवा पत्रकाराचे बहुमोल सहकार्य लाभले, त्याचे श्रेय दिलेच पाहिजे. येत्या फेब्रुवारी महिन्याच्या 'भाषा' विशेषांकाचे अतिथी संपादन प्रल्हाद जाधव आणि महिलादिनाच्या निमित्ताने मार्च महिन्यात प्रकाशित होणाऱ्या विशेषांकाचे संपादन डॉ. सुलभा कोरे करणार आहेत. यातून 'शब्दरुची'ला वेगळी परिमाणे मिळतील यात शंका नाही.

**- डॉ. वीणा सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar1966@gmail.com

# अनुक्रम


**साहित्यसंमेलन : माझ्या नजरेतून**

- साहित्य संमेलनाचे दायित्व / ८
  **निशिकांत मिरजकर**
- या सांस्कृतिक भूकबळीचं काय करायचं? / ११
  **प्रवीण बांदेकर**
- छोटी-छोटी संमेलनं घ्यायला हवीत! / १४
  **प्रणव सखदेव**
- गर्दीची ऊर्जा कार्यप्रणालीत केव्हा बदलणार? / १६
  **शशिकांत सावंत**

**साहित्यसंमेलन : तीन प्रतिक्रिया**

- ... हेच संमेलनांपुढचे खरे आव्हान! / २०
  **किशोर बेडकिहाळ**
- टीका झालीच पाहिजे! / २२
  **जी.के. ऐनापुरे**
- बोलींच्या जननाकडे लक्ष देण्याची गरज / २३
  **अनिल सावळे**

**साहित्यसंमेलन 'स्त्री'च्या नजरेतून**

- हे त्यांना शोभत नाही! / २४
  **डॉ. प्रतिमा इंगोले**
- लढाईत तयारीने उतरायला हवे... / २६
  **डॉ. अस्मिता गुरव**

**साहित्यसंमेलन : पत्रकारांच्या नजरेतून**

- साहित्यथसंमेलन आणि प्रसारमाध्यमे / २८
  **विजय चोरमारे**
- साहित्यसंमेलनाविषयी काही प्रश्न / ३२
  **प्रशांत डिंगणकर**

**साहित्यसंमेलनांमधून प्रतीत होणारी सांस्कृतिक समज आणि अभिरुची**
ओंकार थोरात / ३५

**अ.भा. मराठी साहित्यसंमेलन आणि मराठी भाषेचे संवर्धन**
डॉ. प्रकाश परब / ४०

**कुंचल्यातून तीर**
प्रदीप म्हापसेकर / ४४

**निश्चलनीकरणाचे काही परिणाम**
डॉ. अनंत लाभसेटवार / ४६

**रम्य निळाई-आनंदवन**
आत्माराम परब, नरेंद्र प्रभू / ५०

**ग्रंथाली वाचकदिन वृत्तांत** / ५४
**ग्रंथाली पुस्तक प्रकाशन वृत्तांत** / ६०
**साधना प्रकाशन ग्रंथपान** /६२
**'ग्रंथाली' परीक्षणे** – चांगदेव काळे / ६३



अन्नपूर्णा

‘अन्नपूर्णा’

# मंगला बर्वे

यांना ‘मॅजेस्टिक परिवारा’तर्फे विनम्र श्रद्धांजली!

पाकशास्त्रावरील पुस्तकाचे विक्रीचे उच्चांक मोडणारे **‘अन्नपूर्णा’** पुस्तक आम्हीच प्रकाशित केलं.

आतापर्यंत जवळजवळ ३ लाख प्रतींची विक्रमी विक्री.

**मंगला बर्वे यांची आणखी काही ‘मॅजेस्टिक’ प्रकाशने :**

- मांसाहारी इच्छाभोजन
- भाजी एक-पाककृती अनेक
- सॅलड्स
- चायनीज पदार्थ
- वर्षाचे सणवार
- देशोदेशीची सूप्स
- छंद लोकरीच्या विणकामाचा
- Annaupurna (English) I Translation : Snehalata Datar

मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४०८१ मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ मॅजेस्टिक ग्रंथदालन। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ मॅजेस्टिक बुक गॅलरी । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

Website : www.majesticprakashan.com I E-mail : majesticph@gmail.com

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी Click करा- www.majesticonthenet.com या साईटवर

Customer Care : 022-65666755

# साहित्यसंमेलनाचे दायित्व

**निशिकांत मिरजकर**

> **फक्त काही लोकांना मिरवायला मिळते, साहित्य-व्यवहाराशी संबंध नसणाऱ्या लब्धप्रतिष्ठितांना आपल्या प्रतिष्ठेची कमान आणखी थोडी उंचावता येते, पढिक परिसंवादपटूंची भाषणे श्रोत्यांच्या अवधानविरहित श्रोत्रांवरून घसंगळत जातात आणि सजावटीचा थाटमाट व सुग्रास जेवणावळींची कौतुके हेच संमेलनांच्या यशस्वीतेचे मापदंड होऊन बसतात.**

'**ने**मेचि येतो मग पावसाळा' या न्यायाने दरवर्षी येणारे (अखिल भारतीय) मराठी साहित्यसंमेलन हा आता एक जल्लोषपूर्ण उत्सव होऊ लागलेला आहे. महादेव गोविंद रानडे, न.चिं. केळकर आदींनी सुरू केलेल्या 'ग्रंथकर्त्यांचे संमेलन'पासून आजच्या या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'पर्यंतच्या प्रवासात संमेलनाचे उद्दिष्ट, संमेलनाला मिळणारा प्रतिसाद आणि संमेलनाचे नियोजन यांमध्ये पराकोटीचा बदल झालेला आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आणि आजचा गणेशोत्सव यांमध्ये जे महदंतर आहे, तेच साहित्य संमेलनाच्या बाबतीत झालेले आहे. साहित्य निर्माण करणारे, साहित्याचा आस्वाद घेणारे व साहित्यविषयी गंभीरपणाने चिंतन करणारे अशा तिन्ही प्रकारच्या लोकांना साहित्य-संमेलनाविषयी आत्मीयता वाटेल आणि त्यापासून काहीतरी लोकांना मिळाल्याचा आनंद होईल अशा प्रकारे साहित्य संमेलनाचे नियोजन करणे ही खरी गरज आहे आणि ती खरी कसोटीही आहे. प्रतिभावान लेखक, समुत्सुक वाचक आणि साक्षेपी समीक्षक यांच्या पारस्परिक विनिमयाचे केंद्र म्हणजे साहित्य संमेलन होय, या तथ्यावर लक्ष केंद्रित करून साहित्य संमेलनाचे नियोजन केले, तर आणि तरच हे साध्य होऊ शकेल. लेखक, वाचक आणि समीक्षक हे साहित्य व्यापाराचे तीन मूलभूत घटक आहेत. लेखक हा तर साहित्याचा निर्माताच असतो. जीवनानुभवाच्या नानाविध आकृतींना शब्दरूप देण्याची करामत लेखक करतो तेव्हाच साहित्य निर्माण होते, पण हे शब्दरूप देत असताना लेखकाच्या मनात वाचक हा असतोच. जे आपल्याला भावले, त्याला शब्दरूप देण्याची निकड लेखकाला भासते, कारण त्याला ते कुणाला तरी सांगायचे असते. समीक्षक हा देखील एक वाचकच असतो; पण परिपक्व, जाणकार वाचक असतो. साहित्याच्या विपुल वाचनाने आणि सातत्यपूर्ण साहित्यविषयक चिंतनाने त्याची साहित्याविषयीची समज तयार झालेली असते. लेखकाने घडविलेल्या जीवनानुभवाच्या शब्दरूपांतील विविध स्तर तो उलगडून दाखवितो, विचारांची सूक्ष्मता सुस्पष्ट करतो, सौंदर्यस्थळांचे मर्म विशद करतो. हे तिन्ही घटक स्वतंत्रपणे कार्यरत असतातच. लिहिणारे लिहितात, वाचणारे वाचतात आणि समीक्षा करणारे ती करतच असतात. साहित्यसंमेलनाच्या निमित्ताने हे तिन्ही घटक एकत्र येऊन त्यांच्यामध्ये परस्परविनिमय होण्याची सुसंधी प्राप्त होते, म्हणून साहित्यसंमेलन ही एक सामाजिक गरज आहे. समाजाच्या साहित्यविषयक अभिरुचीचे पोषण करण्याचे आणि साहित्यविषयक संस्कृतीचे संवर्धन करण्याचे दायित्व साहित्य संमेलनावर असते, परंतु संमेलनाच्या उत्सवी स्वरूपाच्या जल्लोषामध्ये या दायित्वाचा विसर पडतो.

सामाजिक जीवनामध्ये उत्सवांनाही महत्त्वाचे स्थान असते, हे नाकारता येणार नाही. उत्सवांमुळे माणसांची मने मोकळी होतात, त्यांना चैतन्याचा स्पर्श होतो. समाजामध्ये उत्साह संचारतो, परंतु या उत्सवांमधून निर्माण झालेली ऊर्जा उत्सवाच्या मूळ उद्दिष्टाकडे वळविणे फार महत्त्वाचे असते. अन्यथा आजच्या गणेशोत्सवाचे आणि दहिहंडीचे जे झाले, ते उत्सवाच्या नशिबी येते.

सध्याच्या साहित्यसंमेलनांमध्ये साहित्यव्यवहाराच्या दृष्टीने काहीही सकारात्मक घडत नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. अप्रबुद्ध वाचकांना साहित्यातील नवनव्या प्रवाहांचे, प्रयोगांचे आणि आकृतिबंधांचे ज्ञान होणे आणि त्यांच्या अभिरुचीचे पोषण होणे, हे घडत नाही किंवा सामाजिक प्रबोधन होणे, समाजातील दुर्बल घटकांविषयी करुणा निर्माण होणे आणि सामाजिक अन्यायाविषयी चीड निर्माण होणे, हे घडत नाही. व्यक्तिगत अनुभूतींच्या परिघाचा विस्तार होऊन वैश्विक अनुभूतीमध्ये विरून जाण्याची प्रेरणा मिळणे आणि मानवतेच्या उत्कर्षाकडे संमुख होणे, हेही घडत नाही. जीवनातील दुःख हळुवारपणे जाणून घेणे आणि सुखाच्या क्षणांची दिवाळी साजरी करणे हे साहित्याचे ईप्सित आहे, याचा साक्षात्कार होत नाही. फक्त काही लोकांना मिरवायला मिळते, साहित्यव्यवहाराशी संबंध नसणाऱ्या लब्धप्रतिष्ठितांना आपल्या

प्रतिष्ठेची कमान आणखी थोडी उंचावता येते, पढिक परिसंवादपटूंची भाषणे श्रोत्यांच्या अवधानविरहित श्रोत्रांवरून घरंगळत जातात आणि सजावटीचा थाटमाट व सुग्रास जेवणावळींची कौतुके हेच संमेलनांच्या यशस्वीतेचे मापदंड होऊन बसतात. समाज उत्सवप्रिय असतो आणि सामाजिक जीवनव्यवहारात उत्सवांना महत्त्वाचे स्थान असते, हे खरे आहे; पण सामाजिक उत्सवाचे काहीएक अंतिम उद्दिष्ट असावे लागते आणि ते उद्दिष्ट समाजातील मानवांच्या भावनिक, वैचारिक, आत्मिक विकासाशी व उन्नतीशी संबद्ध असावे लागते. आजच्या साहित्य संमेलनांच्या जत्रांमध्ये याचा विसर पडत चालल्याचे प्रकर्षाने जाणवते.

साहित्यसंमेलन समाजाची वाङ्मयीन अभिरुची घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. साहित्य संमेलनामध्ये जे परिसंवाद आयोजित करण्यात येतात, त्यांच्या कुशल नियोजनातून हे शक्य होते. संतसाहित्य, पंडिती काव्य, शाहिरी वाङ्मय, अनुवादित साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, उत्तराधुनिक साहित्य या मध्ययुगीन काळापासून आजतागायतच्या मराठी साहित्यामधील विविध प्रवाहांना मराठी वाचकांनी कधी नीटपणे समजून घेतले आहे? संतांच्या अभंगांचे भक्तिभावाने भजन करणारे आणि त्यांच्या प्रबंधांची पारायणे करणारे शेकडो लोक आहेत, परंतु या साऱ्या वाङ्मयाला साहित्य म्हणून समजून घेऊन त्याचा आवाका लक्षात घेणे आणि त्या अंगाने त्याचा आस्वाद घेण्याचीही सवय लावून घेणे त्यातील किती जणांना शक्य होते? पंडिती काव्य आणि शाहिरी काव्य हे तर समीक्षकांपासून सामान्य वाचकांपर्यंत सर्वांनी विशिष्ट जातींत आणि वर्गांत वाटून घेतलेले दिसते आणि आपल्या जातिवर्गाशी जोडल्या न गेलेल्या यांतील काव्याची उपेक्षा, अवहेलना अथवा कुटाळकी करणे हेच वाचक म्हणून आपले कर्तव्य असल्याची भावना जोपासली गेलेली दिसते. अनुवादित साहित्य सध्या मराठीमध्ये मोठ्या संख्येने येत आहे. तथापि या अनुवादित साहित्यामुळे मराठी वाङ्मयसंस्कृतीला कोणती नवी परिमाणे प्राप्त होत आहेत याविषयी या अनुवादित साहित्याचे वाचक अनभिज्ञ असतात आणि ते जाणून घेण्याची वा त्या दृष्टीने विचार करण्याची निकडही त्यांना फारशी भासत नाही. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य आणि उत्तराधुनिक साहित्य यांचा विचार समग्र साहित्यसंस्कृतीच्या संदर्भात कधी केलाच जात नाही. मराठी साहित्यक्षेत्रातली ही वेगळी-वेगळी बेटे आहेत, अशा भूमिकेतूनच समीक्षक आणि अभ्यासक त्यांविषयी बोलतात आणि सामान्य वाचक त्यांविषयी विनाकारण एकतर अभिनिवेशाची किंवा मग परकेपणाची भूमिका घेताना आढळतात.

ही परिस्थिती दूर करून एक प्रकारच्या निकोप आणि सर्वसमावेशक वाङ्मयाभिरुचीची जडणघडण करण्याचे कार्य साहित्य संमेलनाला करता येते. नव्हे, ते करण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. संमेलनातील परिसंवादांचे सजगतेने नियोजन करून हे साध्य करता येईल. त्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे परिसंवादाचे विषय विवादात्मक ठेवून चालणार नाही. वक्त्यांनी ही किंवा ती बाजू घेऊन, जणू काही वादविवादाच्या स्पर्धा ठेवल्या आहेत अशा थाटात आपल्या बाजूचे मंडन व विरुद्ध बाजूचे खंडन करत इरेसरीने तुटून पडावयाचे, असा माहौल निर्माण होता कामा नये. परिसंवादाच्या विषयाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करून त्यातील वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश पाडण्याचे काम त्यांनी केले पाहिजे. श्रोत्यांनीही आपण वाग्युद्धाच्या दंगलीचा थरार अनुभवण्यासाठी बसलो नसून एका साहित्यविषयक प्रश्नाची अंगोपांगे सम जून घेण्यासाठी बसलो आहोत, याचे भान ठेवले पाहिजे. परिसंवादाकरिता वक्ते निवडताना वक्तृत्वप्रसिद्धीपेक्षा त्या त्या विषयाच्या अभ्यासाला महत्त्व दिले पाहिजे आणि परिसंवादाच्या अध्यक्षांनी परिसंवादातील चर्चेचा स्तर विश्लेषणाचा, अभ्यासाचा, विशदीकरणाचा राहील अशा तऱ्हेने त्याचे नियमन केले पाहिजे.

सर्वसाधारणपणे रात्री करमणुकीसाठी एखादा नाट्यप्रयोग ठेवण्याची प्रथा आहे, ती चांगलीच आहे, परंतु नाट्यप्रयोगाची निवड करताना केवळ करमणुकीवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी रंगभूमीवर काही नवीन प्रयोग करू पाहणाऱ्या आणि नाट्यपरंपरेच्या विकासात महत्त्वाचे योगदान ठरू शकणाऱ्या नाटकाची निवड केली पाहिजे. एकपात्री सादरीकरण, कीर्तन, पोवाडे, लावणीनृत्य, वगनाट्य, नाट्यवाचन, कथाकथन, भारूड अशा कार्यक्रमांचाही पर्याय म्हणून विचार करण्यास हरकत नाही. यात करमणुकीबरोबरच अन्य कलांच्या सहकार्याने साहित्यसंहिता प्रसारित करणे हे महत्त्वाचे आहे, याचे भान ठेवले जावे. या दृष्टीनेच साहित्यसंहितेवर आधारित अशा चित्रांचे प्रदर्शनही आयोजित करणे औचित्यपूर्ण ठरावे. मराठी अभ्यास परिषदेच्या अंमळनेर येथील अधिवेशनात तुकारामांच्या अभंगांवर आधारित चित्रकार हांडे यांच्या चित्रांचे प्रदर्शन ठेवले होते किंवा अमरावतीच्या साहित्य संमेलनात कविता महाजन यांच्या स्वत:च्या कवितांवर आधारित चित्रांचे प्रदर्शन ठेवलेले होते, त्याची येथे आठवण होते. नामदेवांच्या हिंदी पदांवर आधारित स्वाती दैठणकर यांच्या नृत्याचा कार्यक्रम घुमानच्या साहित्य संमेलनात आयोजित केलेला होता किंवा अंदमानच्या विश्व मराठी साहित्यसंमेलनात सावरकरांच्या कवितांच्या गायनाचा व 'मी सावरकर बोलतोय' हा एकपात्री सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता, ही औचित्यपूर्ण नियोजनाचीच उदाहरणे मानावी लागतील.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षांचे भाषण हा साहित्यसंमेलनाचा एक महत्त्वपूर्ण घटक असतो. उद्घाटनाच्या कार्यक्रमात या भाषणाला केंद्रवर्ती स्थान मिळावयास हवे. सांगलीच्या साहित्य-संमेलनाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले होते. त्यामुळे उद्घाटकांचे (राष्ट्रपतींचे) भाषण समारंभाच्या केंद्रस्थानी आणि संमेलनाध्यक्षांचे भाषण मार्जिनमध्ये ढकलले गेलेले, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. संमेलनाध्यक्षांनीही आपल्या भाषणात केवळ आजवरच्या मराठी साहित्याचा अथवा स्वत:च्या वाङ्मयीन वाटचालीचा आढावा घेण्यात समाधान न मानता साहित्यांर्गत व साहित्याशी संबंधित प्रश्नांची उकल करण्यावर भर दिला पाहिजे. वादग्रस्त प्रश्नांच्या बाबतीत स्वत:ची भूमिका ठामपणाने, परंतु अनाक्रमक पद्धतीने मांडली पाहिजे.

साहित्यसंमेलनात राजकारणी नेत्यांचा सहभाग असावा की नाही, हा एक वादाचा मुद्दा गेली अनेक वर्षे चर्चेत आहे. राजकीय नेते स्वत:च्या राजकीय लाभाकरिता साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठाचा दुरुपयोग करून घेतात, त्यांच्या उपस्थितीने साहित्यिकांवर दडपण येते, नेते साहित्यिकांना मिंधे बनवतात, सबब राजकीय नेत्यांना साहित्यसंमेलनांत निमंत्रित करू नये असे काहीजणांचे स्पष्ट मत असते, तर राजकारणी नेते हेदेखील साहित्याचे रसिक वाचक असतातच, जेथे शेकडो साहित्यरसिक साहित्यावरील प्रेमापोटी एकत्र जमतात तेथे राजकारणी नेत्यांनाच तेवढे का वगळावे, राजकारण हा आजच्या समाजजीवनाचा एक अभिन्न घटक आहे, त्याच्याबद्दल असा दुजाभाव कसा दाखवता येईल, असे दुसऱ्या पक्षाचे मत असते. या फसव्या युक्तिवादाबाबत असे म्हणता येईल की संमेलनात उपस्थित राहणाऱ्या शेकडो रसिकांना काही व्यासपीठावर जाऊन भाषण करण्याची आणि सन्मानित होण्याची संधी मिळत नाही. ते श्रोतृवर्गामध्ये बसून साहित्यचर्चेत हजेरी लावतात. राजकारणी नेत्यांनीही तशा प्रकारे श्रोतृवर्गात बसून श्रवणभक्ती केली वा अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेत भाग घेतला तर त्याला कोणाचाच आक्षेप असण्याचे कारण उरणार नाही. ज्यांची साहित्यरसिकता खरोखरीच उच्च दर्जाची आहे आणि ज्यांनी साहित्याचे वाचन जाणकारीने केलेले आहे, अशा राजकारणी नेत्यांना उद्घाटक म्हणून अथवा एखाद्या परिसंवादाचे अध्यक्ष म्हणून अथवा परिसंवादातील वक्ते म्हणून व्यासपीठावर निमंत्रित करण्यासही हरकत नाही. मात्र अशा वेळी त्या नेत्यांनी राजकारणाची झूल अंगावरून उतरून व्यासपीठावर वावरणे आवश्यक आहे. या बाबतीत झळझळीत अपवादात्मक उदाहरण यशवंतराव चव्हाण यांचे आहे. यशवंतरावांचे साहित्यावरील प्रेम आणि साहित्याविषयीची जाणकारी सर्वश्रुत आहे. यशवंतराव कऱ्हाडच्या साहित्य संमेलनाचे उद्घाटक होते. त्यांच्या उद्घाटनाच्या भाषणात राजकारणाचा लवलेश नव्हता. व्यासपीठावर वावरताना संमेलनाध्यक्ष दुर्गा भागवत यांचे केंद्रीय महत्त्वाचे स्थान आपल्यामुळे झाकोळून जाणार नाही, याची ते सर्वतोपरी काळजी घेत होते. त्यावेळेस आणीबाणीनिमित्त तुरुंगात असलेले आणि प्रकृतिअस्वास्थ्य भोगणारे जयप्रकाश नारायण यांच्या आरोग्याविषयी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे सर्वांनी उठून शांत उभे राहावे असे आवाहन दुर्गाबाईंनी केले, तेव्हा सत्ताधारी पक्षात असूनही आणि जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनास विरोध असूनही, क्षणाचाही विलंब न करता यशवंतराव चव्हाणही सर्वांबरोबर उठून उभे राहिले होते! आजच्या राजकारणी नेत्यांच्या भाऊगर्दीत यशवंतरावांच्या साहित्यप्रेमाचा सुसंस्कृत वारसा जपण्याचा प्रयत्न करणारे सुशीलकुमार शिंदे हे एक नेते आढळतात. बाकी फारसे आशादायक चित्र आढळत नाही.

संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्षांच्या हस्ते ग्रंथांचे प्रकाशन करण्याची प्रथा आहे. हे प्रकाशन म्हणजे केवळ एक औपचारिकता निभावण्याचा प्रकार असतो. कधी कधी तर पंधरावीस ग्रंथांची यादी वाचून दाखवली जाते (तिकडे कोणाचंही लक्ष नसते) आणि या सर्व ग्रंथांचे प्रकाशन झाले, असे अध्यक्ष जाहीर करून टाकतात. 'माझ्या पुस्तकाचे प्रकाशन साहित्य संमेलनात अध्यक्षांच्या हस्ते झाले,' असा टेंभा आपल्या मित्रपरिवारात मिरवून नवखा लेखक तृप्त होतो, याव्यतिरिक्त अशा प्रकाशनांतून काही साध्य होत नाही तेव्हा ही प्रकाशनाची पद्धत साहित्यसंमेलनातून रद्दबातलच करून टाकावी. त्या ऐवजी ग्रंथप्रदर्शनातील संबंधित प्रकाशकाच्या ठेल्यावरच छोटेखानी प्रकाशन समारंभ ठेवावेत. पुस्तकाविषयी एकदोघांनी पाच-दहा मिनिटे बोलावे, एखाद्या मान्यवराच्या हस्ते प्रकाशन व्हावे, त्यावेळी पाच-दहा मिनिटेच बोलावे, सगळा कार्यक्रम फारतर अर्ध्या तासात उरकावा आणि लगेच ते पुस्तक त्या ठेल्यावर सवलतीच्या दरात उपलब्ध व्हावे. खुर्च्यांची व्यवस्था करण्याचेही कारण नाही. सगळा कार्यक्रम उभ्या उभ्या साजरा व्हावा. ग्रंथप्रदर्शनात हिंडणारे लोक कुतूहलाने कार्यक्रमासाठी थांबून राहतील, त्यांना त्या पुस्तकाविषयी निश्चितपणाने काहीतरी कळेल आणि त्यांच्यापैकी काही जणांना तरी पुस्तक विकत घेण्याची प्रेरणा होईल. 'माझ्या पुस्तकाचे प्रकाशन साहित्य संमेलनात झाले' हा टेंभा मिरवायला लेखक मोकळाच. दिल्लीत ग्रंथजत्रेमध्ये अशा प्रकारचे छोटेखानी प्रकाशनसमारंभ दरवर्षी होत असतात.

संमेलनांतील जेवणावळींसंबंधीही नव्याने विचार केला पाहिजे. अनेक व्यंजनांनी भरगच्च असलेले सुग्रास भोजन हीच साहित्यसंमेलनाची मनाला सुखविणारी आठवण म्हणून गोंजरण्याची सवय आता सगळ्यांनीच सोडून दिली पाहिजे. स्वच्छतेने बनवलेल्या आणि पोषणमूल्य असणाऱ्या चार पदार्थांचे 'वर्किंग लंच' ठेवण्यात यावे. महत्त्व भोजनाच्या आस्वादाला नाही, तर भुकेच्या वेळी जेवणाचा कार्यभाग उरकून साहित्यविषयक उपक्रमांत सहभागी होण्यास आहे, हे सर्वांनीच मनी बाळगणे आवश्यक आहे. ज्यांना जिव्हालौल्याचेच फक्त अप्रूप असेल, त्यांच्यासाठी विविध खाद्यपदार्थांचेच ठेले संमेलनाच्या परिसरात असतातच.

साहित्यरसिकांना केवळ श्रवणभक्तीची सक्ती न करता क्रियाशीलतेचा आनंद मिळण्यासाठी साहित्यविषयक विविध स्पर्धांचेही आयोजन करता येईल. या स्पर्धांची बक्षिसे पुस्तकांचीच असावीत.

अशा तऱ्हेने परिसंवादांच्या नियोजनापासून आणि अध्यक्षीय भाषणांपासून ते छोट्या छोट्या आनुषंगिक बाबींपर्यंत विविध प्रकारांनी मराठी साहित्य संमेलन अर्थपूर्ण व साहित्य संस्कृतीच्या विकासाला हातभार लावणारे असे बनवता येईल. यावर्षी साहित्यव्यवहाराकडे गांभीर्याने पाहणारे आणि साहित्यावर मनापासून प्रेम करणारे, तसेच साहित्याविषयी तटस्थपणे विचार करू शकणारे समीक्षक अक्षयकुमार काळे हे संमेलनाध्यक्षपदी निवडून आल्यामुळे या दिशेने काही वाटचाल निश्चित होईल, अशी आशा करण्यास वाव आहे.

**– निशिकांत मिरजकर**
भ्रमणध्वनी : ९९७०१८४५६२
nishimirajkar@yahoo.co.uk

# या सांस्कृतिक भूकबळींचं काय करायचं?

**प्रवीण दशरथ बांदेकर**

> **साहित्यसंमेलन ही कालपरवासारखी आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही फक्त शहरी, पांढरपेशा वा तत्सम विशिष्ट वर्गाची मक्तेदारी राहू नये, कालनिहाय वाचकांची बदलती अभिरुची जाणून त्यात बदल व्हावा, दलित आदिवासी-ग्रामीण-स्त्रीवादी अशी सर्वसमावेशकता यावी, असे मनापासून वाटत असेल तर साहित्य संमेलनाने संकुचितपणाची, पारंपरिक मानसिकतेची आणि आपमतलबीपणाची वस्त्रे अंगावरून काढून टाकून खुलेपणाने मराठी साहित्यव्यवहाराला सामोरे जाणे जास्त गरजेचे आहे...**

महात्मा फुल्यांनी तत्कालीन उच्चवर्णीयांच्या साहित्य संमेलनांची घालमोड्या दादांची संमेलने म्हणून संभावना केली होती, त्यालाही आता कैक वर्षे उलटून गेली आहेत. मात्र इतका काळ उलटला तरी साहित्य-संस्कृती व्यवहार आणि तो ज्यांच्या हाती आहे ते या व्यवस्थेचे ठेकेदार यांच्या मनोवृत्तीमध्ये काही विशेष फरक पडला आहे असे दिसून येत नाही. उलट गेल्या काही वर्षांपासून तर साहित्य संमेलने, त्यांच्या निवडणुका, आयोजन या गोष्टी सत्ताकेंद्राच्या जवळ जाण्याची, वर्चस्व आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्याची हुकमी साधने बनत चालल्या आहेत. महात्मा फुलेंना अभिप्रेत असलेली खेड्यापाड्यातील, शूद्रातिशूद्र बहुजन कष्टकरी जातींतील मुले गेल्या काही वर्षांपासून शिक्षणाच्या आणि त्यामुळे साहित्यसंस्कृतीच्या मुख्य प्रवाहात आलेली दिसत असली, तरी काही अपवाद वगळता यातल्या किती जणांना सन्मानपूर्वक या मुख्य धारेतल्या अखिल भारतीय पातळीवरच्या साहित्य संमेलनामधून सामावून घेतले जात आहे? नव्या जाणिवांनी आजवर मराठी साहित्यात कधीही न आलेले आपले अनुभव, आपापल्या पोटसंस्कृती, बोलभाषा यांसह लिहित्या झालेल्या लेखकांची या संमेलनांना का आठवण होत नसावी? जागतिकीकरणानंतरच्या काळात बदललेले मूल्यभान, भाषिक संवेदन, जीवनजाणिवा इत्यादीविषयी लिहिणारी पिढी मराठी साहित्यात स्थिरावली आहे, त्यांच्याविषयी संमेलनाला काहीच देणेघेणे का नसावे? तेच ते हौशेनवशे टाळ्याखाऊ कवी, हितसंबंधाच्या कोट्यातून भरले गेलेले विद्वान चर्चक प्राध्यापक यांच्याशिवाय मराठी साहित्यात काही घडतच नाही का? असे अनेक प्रश्न दर वर्षीच अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे छापातले कार्यक्रम आणि त्यातले सहभागी तथाकथित मान्यवर पाहिल्यावर पडत राहतात. त्यामुळेच गेल्या जवळपास नऊ दशकांपासून धुमधडाक्यात भरवल्या जाणाऱ्या आणि मराठी भाषा-साहित्य-संस्कृतीच्या संवर्धनाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करणाऱ्या या संमेलनांबाबत साहित्यव्यवहाराकडे गांभीर्याने पाहाणाऱ्या लोकांकडून नेहमीच शंका घेतली जात आहे. गेल्या काही वर्षांतले संमेलनांचे चंगळवादी स्वरूप, वाढता राजकीय हस्तक्षेप, साहित्यबाह्य वाद, चर्चा आणि दुय्यमतिय्यम दर्जाचे साहित्यिक वा आपापल्या कळपातील, जातिपातीतील तथाकथित विचारवंतांना निमंत्रित करून उरकले जाणारे सुमार कार्यक्रम पाहता या अशा अखिल भारतीय म्हणवल्या जाणाऱ्या संमेलनांची नक्की काय आवश्यकता आहे असे मनात आल्यावाचून राहात नाही.

अन्य कोणत्याही भारतीय भाषेत क्वचितच आढळणारी ही अशा स्वरूपाची साहित्य संमेलने आणि ऐन दिवाळीमध्ये प्रकाशित होणारे विविध विषयांवरील शेकडो दिवाळी अंक ही आपली सांस्कृतिक परंपरा म्हणून आपण अभिमानाने सांगत असतो. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीशी गेल्या जवळपास शतकभरापासून जोडल्या गेलेल्या या दोन्ही गोष्टींची थोड्या तटस्थपणे चिकित्सा केली तर काय दिसून येते? एखादी गोष्ट समाजामध्ये स्थिरावायला आणि त्याचे परिणाम जोखायला शंभर वर्षे हा काही नक्कीच लहान कालखंड म्हणता येत नाही. त्यामुळेच या इतक्या प्रदीर्घ कालखंडापासून आपल्या मराठी भाषक समाजव्यवहाराशी जोडल्या गेलेल्या या दोन्ही गोष्टींनी मराठीच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक व्यवहारावर नक्की काय परिणाम केला आहे हे पाहता येऊ शकते.

दिवाळी अंकांबाबत बोलायचं झालं तर, मराठी साहित्याला दिवाळी अंकांचे महत्त्वपूर्ण योगदान निर्विवादपणे लाभलं आहे. मराठीतील अनेक महत्त्वाच्या लेखकांचे उत्तमोत्तम साहित्य कथा, कविता, ललित लेखन, वैचारिक लेखन महत्त्वाच्या दिवाळी

अंकांमधून आधी प्रकाशित झाले आहे आणि मगच ते ग्रंथरूपात वाचकांसमोर आले आहे. अनेक नव्या व होतकरू लेखकांकडे वाचक व अभ्यासकांचे लक्ष वेधायलाही दिवाळी अंक कारणीभूत ठरले आहेत, पण हे असे काही अखिल भारतीय पातळीवर आयोजित केल्या जाणाऱ्या साहित्य संमेलनांबाबत म्हणता येते का? क्वचित काही अपवाद वगळता या संमेलनांनी मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीला किती महत्त्वाचे लेखक मिळवून दिले आहेत? किती संमेलनाध्यक्षांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून मराठी समाजाला विचारप्रवृत्त केले आहे? साहित्यव्यवहाराला काही नवा विचार दिला आहे? मराठीतील लक्षणीय साहित्यावर वा लेखकांवर, साहित्यातील प्रवाहांवर वा प्रयोगांवर या संमेलनांतून आजवर किती चर्चा झाल्या आहेत? राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार, अनुवाद, वा अन्य लेखनांतर्गत आशयगुणांमुळे दखल घेतल्या गेलेल्या किती मराठी भाषक लेखकांना या संमेलनाने वाचकांसमोर आणले आहे? या अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे जर नकारार्थीच येत असतील तर शताब्दीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या या संमेलनांनी मराठी साहित्यासाठी नेमकं काय केलं ह्याचे वेगळे उत्तर देण्याची गरज भासू नये.

लाखोंच्या संख्येने हौशे, नवशे, गवशांची गर्दी उसळलेल्या उत्सवी स्वरूपाच्या या संमेलनांमधून लेखक वा त्यांचे वाचक अशा साहित्यव्यवहारातील दोन्ही महत्त्वाच्या घटकांचा परस्परसंवाद क्वचितच घडत असतो. या उलट जयपूर फेस्टिवल वा त्या धर्तीवर आपल्याकडे अलीकडे आयोजित करण्यात येऊ लागलेल्या छोट्याखानी साहित्योत्सवांमधून लेखक व त्याचे वाचक यांचा परस्परांशी थेटपणे संवाद घडताना दिसून येत आहे. अखिल भारतीय पातळीवरच्या साहित्य संमेलनांमधूनही नियोजनपूर्वक काही कार्यक्रमांची आखणी केली गेली तर हे असे घडून येणे नक्कीच शक्य आहे. साहित्यनिर्मितीचा शून्य अनुभव असलेल्यांच्या एकसुरी कंठाळ्या कार्यक्रमांऐवजी थोडी फार कल्पकता दाखवून सर्जनशील लेखकांना बोलते केले गेले तर वाचकांच्या दृष्टीनेही तो बदल स्वागतार्ह ठरू शकेल असे वाटते. ज्या लेखकाच्या कलाकृती आपण वाचत असतो, तो लेखक केवळ आननी कसा दिसतो एवढ्यापुरतंच वाचकांना कुतूहल असतं हे गृहीत धरणं बाळबोधपणाचं आहे. तर त्याही पलीकडे जाऊन लेखकाची निर्मितीप्रक्रिया, त्याची पात्रे, लेखनातील परिसर, त्याच्या राजकीय भूमिका, सामाजिक दृष्टिकोन, समकालीन प्रश्नांबाबतची त्याची मते, त्याच्या अनुभवविश्वाची जडणघडण करणारे घटक अशा अनेक गोष्टींविषयी वाचकांना जाणून घ्यायचं असतं. वाचकांप्रमाणेच नव्या लेखकांनाही आपल्याला आयकॉन वाटणाऱ्या पूर्वसूरींकडून शिकता येण्याजोग्या किती तरी गोष्टी असू शकतात. कुठल्याही भाषिक साहित्यव्यवहाराला प्रगल्भ बनवण्याच्या दृष्टीने हा परस्परसंवाद निश्चितच खूप महत्त्वाचा असतो. अखिल भारतीय साहित्य संमेलनांसारख्या एका मोठ्या व्यापक स्वरूपाच्या व्यासपीठावरून आजवर न घडलेले हे असे काही घडवता आले तर मराठीच्या भवितव्याच्या दृष्टिकोनातून ती नक्कीच स्वागतार्ह गोष्ट ठरावी. उदाहरणार्थ, भालचंद्र नेमाडे, श्याम मनोहर, वसंत आबाजी डहाके, मधु मंगेश कर्णिक, महेश एलकुंचवार, सतीश काळसेकर, दीनानाथ मनोहर, ह० मो० मराठे, रंगनाथ पठारे, सतीश तांबे, राजन गवस, कविता महाजन, जयंत पवार यांसारखे भिन्न भिन्न शैली व प्रवृत्तींचे लेखक म्हणजे मराठीतील एकेका विचार-जाणिवा-दृष्टिकोनांची स्कूल्स आहेत. यांना अनुसरणारे, त्यांच्या वैचारिक प्रकाशात वाटचाल करणारे, व त्यातूनच हळूहळू स्वतःची वेगळी वाट घडवू पाहणारे असंख्य नवे लिहिते हात आसपास असू शकतात. या लेखकांच्या शब्दांवर जीव टाकणारे वाचकही हजारोंच्या संख्येने आहेत. आपल्या आवडत्या लेखकांचे पुस्तकाबाहेरचे विचारविश्व जाणून घ्यायला तेही आसुसले आहेत. आजकालच्या सोशल मीडियावरून या लेखकांना त्यांच्या वाचकांचा मिळणारा प्रतिसाद पाहता ही गोष्ट सहजपणे लक्षात येऊ शकते. त्यामुळेच फेसबुक, ट्विटर वा वॉटसअॅपसारख्या आभासी माध्यमाच्या बाहेर असलेल्या प्रत्यक्ष वास्तवातल्या जगात या लेखकांना भेटायला त्यांच्या वाचकांना नक्कीच आवडू शकते. त्यासाठी नेमकं काय करता येईल, कशा स्वरूपाचे कार्यक्रम आखता येतील, त्यात या मराठीतल्या महत्त्वाच्या लेखक, कवींना कसं सामावून घेता येईल, त्यांच्या त्यांच्या वाचकांच्या गटांना आपापल्या आवडत्या लेखकांपर्यंत कसं पोचवता येईल, त्यांच्याशी कसं संवादता येईल या दृष्टीने नियोजन करता आले तर अशा संमेलनांची ती एक मोठीच उपलब्धी ठरू शकेल.संमेलनांतील कार्यक्रमांचा चाकोरीबद्ध पारंपरिक ढाचा सोडून देऊन कालसुसंगत गरजा लक्षात घेऊन असे काही करता आले, तर मराठीपासून आणि एकूणच वाचनापासूनही दूर जात असलेल्या तरुण पिढीला सामावून घेण्याच्या दृष्टीनेही ते महत्त्वाचे ठरू शकते.

मुळातच, या अखिल भारतीय म्हणवल्या जाणाऱ्या संमेलनांनी मराठी भाषा आणि साहित्याला अखिल भारतीय पातळीवर घेऊन जाण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून त्यानुसार कार्यक्रमांचे नियोजन केले पाहिजे. मधल्या काही संमेलनांमधून उद्घाटनासाठी राष्ट्रीय पातळीवरचा अन्य भारतीय भाषेतला साहित्यिक निमंत्रित केला जात होता, पण ती प्रथा बंद पाडून वाचनसंस्कृतीशी देणेघेणे नसलेल्या राजकीय नेत्यांना आयोजकांनी आपले हितसंबंध जपण्यासाठी बोलावणे सुरू केले. साहित्य अकादमी, आंतरभारती, भारतीय ज्ञानपीठ यांसारख्या राष्ट्रीय स्तरावर भारतीय भाषांसाठी काम करणाऱ्या संस्था ज्याप्रकारचे काम करतात, त्यातूनही संमेलन आयोजकांना खूप काही शिकण्यासारखे आहे. आपल्या भाषेत साहित्य अकादमीचे युवा पुरस्कार, अनुवाद पुरस्कार, मुख्य पुरस्कार मिळवणारे पंचवीसेक तरी साहित्यिक आहेत. या साहित्यिकांना सन्मानाने निमंत्रित करून युवकांशी, अनुवादकांशी, विविध स्तरीय वाचकांशी त्यांचा संवाद घडवून आणण्यामध्ये काय अशक्य आहे? पण आजवरच्या एकाही संमेलनाला या अखिल भारतीय स्तरावर पोचलेल्या आपल्या

लेखक, कवी, अनुवादकांची दखल घ्यावीशी वाटलेली नाही. अखिल भारतीयत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या संमेलनांनी गावगन्ना कुठल्याही व्यासपीठावरून टाळ्याखाऊ कविता वाचणाऱ्या, लोकानुनायी आवेशी भाषणे ठोकणाऱ्या धंदेवाईकांना अखिल भारतीय संमेलनाच्या मंचावरून पवित्र करण्यापेक्षा खऱ्या अर्थाने मराठीला देशापातळीवर घेऊन जाणाऱ्यांना स्थान देणे जास्त गरजेचे आहे.

नव्या तंत्रज्ञानाचा वापर करूनही या संमेलनातील महत्त्वाचे परिसंवाद, चर्चा, भाषणे गावागावातील वाचकांपर्यंत थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून पोचवता येणे सहज शक्य आहे. पुणे येथे येत्या जानेवारीमध्ये साजऱ्या होणाऱ्या 'विचारवेध' संमेलनामध्ये हा प्रयोग राबवण्यात येत आहे. महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरावरील अभ्यासक, प्राध्यापक, ग्रंथालये यांच्या साहाय्याने आधुनिक माध्यमांचा वापर करून या गोष्टी केल्या गेल्या तर प्रत्यक्ष संमेलनाला जाणे शक्य न होणाऱ्या परंतु त्याविषयी आस्था असलेल्या खेड्यापाड्यातल्याही अनेक वाचकांना याचा लाभ होऊ शकतो. यू-ट्यूबसारख्या लोकप्रिय माध्यमामध्ये यातील महत्त्वाची भाषणे, चर्चा टाकता आल्या तर पुढे नंतरही हवं तेव्हा अभ्यासकांना त्यांचा फायदा घेता येऊ शकतो. ई-बुक्सशी संबंधित असलेल्या युवा पिढीसाठी अध्यक्षीय भाषणांच्या ई-आवृत्त्या, किंडल आवृत्ती वगैरे देता आल्या तर तेही कालसुसंगत ठरू शकेल. संमेलनाध्यक्षालाही घटनात्मक अधिकार फार काही नसले तरी हे मानाचे पद भूषविणाऱ्या लेखकाविषयी समाजात आपसुकच एक आदराची भावना निर्माण झालेली असते. या जनभावनेचा फायदा घेऊन संमेलनाध्यक्ष साहित्य-संस्कृतीविषयीचे आपले विचार व मते, भाषणे, मुलाखती, चर्चासत्रे, लेख इत्यादीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचवू शकतो. वसंत आबाजी डहाके, नागनाथ कोत्तापल्ले यांनी त्यांच्या अध्यक्षीय वर्षात अनेक दूर दूरच्या गावांत जाऊन तरुणांशी संवाद साधून वाचनसंस्कृतीविषयी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. गेल्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्याबाबतही असेच म्हणता येईल. ते निवडून आल्यावर तर, यांना कोण ओळखतो, यांचे वाङ्मयीन कार्य काय, वगैरे टीका सुरू झाली होती. पण तरीही वर्षभरात जवळपास शंभराहून अधिक ठिकाणी दिलेल्या भाषणांमधून सबनीसांनी आपली वाङ्मयीन भूमिका ठामपणे रुजवण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या टीकाकारांना त्या माध्यमातून परस्पर उत्तर देऊन टाकले.

सोशल माध्यमांसकट उपलब्ध सर्व माध्यमांमधून निष्ठेने लिहिणारी गावागावातली नवी मुले, या आपल्या पिढीसाठी नियतकालिके चालवणारे तरुण संपादक, प्रकाशक, ग्रंथविक्रेते अशा अनेकांना या संमेलनात सामावून घेण्याची प्रक्रिया सुरू होणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. मराठी भाषा टिकवून ठेवण्याचे काम हीच मंडळी करीत आहेत, त्यांना या संमेलनाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाणे ही त्यांचा हुरूप वाढवणारी गोष्ट ठरू शकते. निव्वळ ह्या त्या साहित्य संस्थांशी संबंधित असलेले, प्राध्यापकीला जोडधंदा म्हणून परीक्षणे लिहिणारे वा हातखंडा भाषणे ठोकणारे यांना सातत्याने त्याच त्या चोथा झालेल्या विषयांवर बोलायला लावण्यापेक्षा प्रत्यक्ष साहित्यनिर्मिती आणि प्रसार यांच्याशी संबंधित असलेल्या गावोगावच्या मुलांचा शोध या संमेलनांनी घेतला तर त्यामुळेच खऱ्या अर्थाने भाषेची सेवा होऊ शकेल. नुसते व्यासपीठावरून मराठी भाषा मरते म्हणून गळे काढण्यापेक्षा हे अधिक विधायक स्वरूपाचे काम होऊ शकते. सर्वस्तरीय साहित्याच्या वाचकांना संमेलनांशी जोडून घेण्याच्या दृष्टीनेही हे महत्त्वाचे ठरू शकते.

एकूणच, अखिल भारतीय म्हणवले जाणारे हे संमेलन खऱ्या अर्थाने अखिल भारतीय स्वरूपाचे व्हावे, साहित्य संमेलन ही कालपरवासारखी आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही फक्त शहरी, पांढरपेशा वा तत्सम विशिष्ट वर्गाची मक्तेदारी राहू नये, कालनिहाय वाचकांची बदलती अभिरुची जाणून त्यात बदल व्हावा, दलित आदिवासी-ग्रामीण-स्त्रीवादी अशी सर्वसमावेशकता यावी, असे मनापासून वाटत असेल तर साहित्य संमेलनाने संकुचितपणाची, पारंपरिक मानसिकतेची आणि आपमतलबीपणाची वस्त्रे अंगावरून काढून टाकून खुलेपणाने मराठी साहित्यव्यवहाराला सामोरे जाणे जास्त गरजेचे आहे. तसे काही करता येत नसेल, तर मात्र ही संमेलने शंभर वर्षांची झाली काय वा हजार वर्षांची झाली काय, मराठी भाषा आणि संस्कृतीच्या गंभीर व्यवहाराशी त्यांना खरोखरच काही आस्था आहे किंवा संमेलनांच्या अवकाशापासून दूर खेड्यापाड्यांतून पसरलेल्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या सांस्कृतिक भूकबळींविषयी त्यांना काही देणेघेणे आहे असे म्हणता येणार नाही.


– प्रवीण दशरथ बांदेकर

भ्रमणध्वनी : ९४२२४३६१००


samwadpravin@gmail.com



॥ग्रंथाली॥

# केसबुक

**डॉ. पी.एस. रामाणी**




**मूल्य १५० रुपये**

**सवलतीत ९० रुपये**

डॉक्टर पी.एस. रामाणी यांनी अक्षरशः लाखो रूग्ण हाताळले आहेत. विविध प्रदेश, प्रांत, जातवार रुग्णांचे नमुने, त्यांचे स्वभाव, त्यांची विचार करण्याची पद्धत इतक्या खोलीवर अन्य कुणी गेला मात्र नसेल. डॉ. रामाणींतल्या भवताल टिपणाऱ्या लेखकाचे वैशिष्ट्य ते हेच. रुग्णांवरील उपचारांसह अशा प्रकारच्या अनुभवांचा आणि मीमांसेचा संग्रह या पुस्तकात आहे.

# छोटी-छोटी संमेलनं घ्यायला हवीत!

**प्रणव सखदेव**

**मी** स्वतः साहित्यसंमेलनाचा अनुभव पहिल्यांदा घेतला, तो सोलापूर साहित्यसंमेलनाच्या वेळी. त्यानंतर पुण्यात झालेल्या संमेलनालाही मी हजेरी लावली होती आणि दोन्ही वेळेस, माझ्या मनात असंख्य प्रश्न निर्माण झाले होते आणि ते प्रश्न मराठी साहित्य आणि मराठीतला साहित्यव्यवहार यांबद्दलचे होते.

तेच ते ठोकताळे असलेलं साहित्य रिसायकलिंग होऊन पुन्हा येतं आहे, जे सांस्कृतिक-साहित्यकदृष्ट्या घातक आहे. सध्याची संमेलनं म्हणजे एक गुन्हाळ आहे, ज्यात दरवर्षी एका बाजूने चिपाडच आत घातलं जातं आणि दुसऱ्या बाजूने पुन्हा चिपाडच बाहेर पडतं. त्यामुळे रस फारसा हाती लागतच नाही...

कवी-लेखकाकडून एकदा का एखादी कलाकृती किंवा साहित्य निर्माण करून झाले की, मग ते लोकांपुढे आणताना ती कलाकृती किंवा साहित्य व्यवहाराच्या कक्षेत येते. मग त्यात प्रकाशक, विक्रेता, वाचक, मेळावे, संमेलनं, चर्चासत्रं आदी घटकांचा समावेश होतो. थोडक्यात त्या साहित्यकृतीचा एकाकडून (कवी-लेखक) अनेकांपर्यंत (प्रकाशक-वाचक) प्रवास होतो. साहित्यसंमेलन ही या प्रवासातली एक प्रत्यक्ष कृती किंवा घटना असते कारण त्या कृतीमुळे ओळखल्या जाणाऱ्या कवी-लेखकांचं व वाचकांचं ते संमेलन असतं असं ढोबळपणे म्हणता येईल.

संमेलन म्हणजे एकत्र जमणं आणि नुसतंच एकत्र जमणं नाही, तर जमल्यानंतर देवाण-घेवाण करणं. साहित्य संमेलनात ही देवाण-घेवाण साहित्यिक असते किंवा तसं अपेक्षित आहे. त्यामुळे लेखक-कवींचं साहित्य व त्यामागची त्यांची भूमिका-निर्मितीप्रक्रिया अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, तसंच साहित्य व्यवहाराच्या इतर घटकांबद्दल चर्चा करण्यासाठी आणि रसिक व लेखक-कवी यांच्यात थेट संवाद व आदानप्रदान होण्यासाठी संमेलन भरवणं यात गैर काहीही नाही. शिवाय संमेलनाच्या निमित्ताने दोन दिवसांत मोठ्या प्रमाणावर पुस्तक विक्री होते हीदेखील संमेलनाची अर्थव्यवहाराच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. (अर्थात, संमेलन हे साहित्याचे असल्याने पुस्तकविक्री हे त्याचे बायप्रॉडक्टच मानायला हवं. मुख्य प्रकाशझोत साहित्यावर हवा.)

या सगळ्या पार्श्वभूमीवर मला पडलेला एक महत्त्वाचा प्रश्न असा की - खरंच वैचारिक वा साहित्यिक आदानप्रदान संमेलनातून होतं का? की केवळ उत्सवी स्वरूपाच्या आकर्षणामुळे (त्यात सेलिब्रिटी व राजकारणी आले) जत्रेला गेल्यागत मनोरंजनासाठी लोक संमेलनाला जातात?

जेव्हा मोठ्या प्रमाणावर उत्सव किंवा अशी संमेलने भरवली जातात तेव्हा एका मर्यादेपर्यंत 'मास'चा विचार करून त्यात मनोरंजनात्मक घटक अंतर्भूत केलेले असणं हे ठीक असलं, तरी उत्सवी रूप, मनोरंजन आणि सकसता व वैचारिकता यांचा कुठेतरी समतोल साधायला नको का? अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात हा समतोल साधला जायला हवा कारण सर्वसामान्य वाचक संमेलनाकडे ओढला जातो आहेच, प्रश्न आहे तो त्या वाचकाला लोकप्रिय व ठरीव साहित्यापेक्षा नवं, वेगळं, समकालीन आणि अधिक खोलात नेणाऱ्या साहित्याची वाट सामान्य वाचकांना दाखवून देण्याचा. जेणेकरून त्यातले काही वाचक तरी आपापल्या परीने मळवाटा सोडून, नव्या वाटा शोधण्याचं काम करू शकतील. त्यातून नवी अभिरुची असलेला वाचकवर्ग घडण्याची शक्यता निर्माण होईल. सध्या मराठीचा विचार करता अशा प्रकारचं काम करणारी व्यासपीठं कमी कमी होत चालली आहेत. खरंतर, साहित्य संमेलनातून अशा प्रकारचं काम होऊ शकतं, पण सध्या तरी तसं होताना दिसत नाही. परिणामी वर्षानुवर्षं लोकप्रिय असलेल्या साहित्यावरच वाचकांचा पिंड पोसला जातो आहे, तेच ते ठोकताळे असलेलं साहित्य रिसायकलिंग होऊन पुन्हा येतं आहे, जे सांस्कृतिक-साहित्यकदृष्ट्या घातक आहे. सध्याची संमेलनं म्हणजे एक गुन्हाळ आहे, ज्यात दरवर्षी एका बाजूने चिपाडच आत घातलं जातं आणि दुसऱ्या बाजूने पुन्हा चिपाडच बाहेर पडतं. त्यामुळे रस फारसा हाती लागतच नाही.

वर उल्लेखलेला समतोल साधला जात नसल्याने संमेलने दिवसेंदिवस भपकेबाज, उत्सवी आणि नीरस, आजच्या काळाला

रिलेट न होणारी होत चालली आहेत. त्यात डामडौल, खाण्याचे विविध पदार्थ आदी गोष्टी भरपूर आहेत, पण त्यात तरुणांना हवी असलेली व्हायब्रन्सीच नाही, ही खेदाची गोष्ट आहे. अगदी खरं सांगायचं तर ती 'बोअर' आहेत. अगदी साधं उदाहरण देतो, टेड टॉकसारख्या माध्यमातून मला किंवा माझ्यासारख्या तरुणांना उत्तमोत्तम लेक्चर्स ऐकायला, पाहायला मिळणार असतील, तर मी संमेलनाला का म्हणून हजेरी लावू? किंवा मुंबई-पुण्यात किंवा कोल्हापूर-सोलापूरसारख्या शहरांमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये तरुणांची लक्षणीय गर्दी का होते, याचाही विचार आयोजकांनी करायला हवा.

साहित्य संमेलनाचा गेल्या काही वर्षांचं प्रारूप आपण पाहिलं, तर त्यात फारसा बदल झालेला नाहीये असं दिसून येतं. म्हणजे उद्घाटन आणि अध्यक्षीय भाषण, दोन कविसंमेलनं, चार-पाच परिसंवाद (विषयदेखील बर्यापैकी तसेच, थोडेसे फिरवलेले), कुमार-बालांसाठी थोडेसे कथाकथन किंवा कविताबाचनासारखे बाळबोध कार्यक्रम किंवा काही मुलाखती. (हल्ली सेलिब्रिटींचे कार्यक्रमही यात असतात. ते कशासाठी हे मला तरी कधीच समजलेलं नाही.) बदलत्या काळानुसार मला वाटतं, हे प्रारूप बदलायला हवं. त्यात नव्या विषयांना अधिक प्राधान्य मिळायला हवं.

दुसरं, गेली काही वर्षं प्रकाशन क्षेत्रात संपादक म्हणून व लेखक-कवी-अनुवादक म्हणून काम करताना लक्षात आलेली गोष्ट अशी की, मुंबई-पुण्यापेक्षा निमशहरं आणि लहान लहान गावं इथे मोठ्या प्रमाणावर लोकांना वाचनाची व साहित्याची भूक आहे. तिथपर्यंत पोचण्यात लेखक-प्रकाशक-विक्रेते यांना फारसं यश प्राप्त झालेलं नाही ही वस्तुस्थिती आहे. सांगायचा मुद्दा हा की, त्यांना वाचायला हवं आहे. म्हणून इथून पुढे या वाचकांपर्यंत पोचण्यासाठी विविध उपक्रमांची गरज आहे. संमेलन हा त्यापैकी एक उपक्रम होऊ शकतो. म्हणजे असं की, एकच एक मोठ्ठं 'दिमाखदार' संमेलन घेणं बंद करून वर्षभरातून चार-पाच छोटी-छोटी संमेलनं (विभागीय नव्हे) वेगवेगळ्या भागांमध्ये (जसं की, बुलढाणा, अमरावती, रत्नागिरी, नांदेड/औरंगाबाद, अलिबाग इ.) घ्यायला हवीत. मोठ्या संमेलनांएवढंच त्यांचंही मार्केटिंग व जाहिरात करायला हवी. या प्रत्येक संमेलनात सहभागी लोकांची संख्याही मुद्दाम मर्यादित ठेवावी. त्या-त्या ठिकाणच्या स्थानिक पुस्तक विक्रेत्यांशी चर्चा करून भरपूर वाचणाऱ्या स्थानिक वाचकांना खास आमंत्रित करावं. तसंच त्या-त्या शहरात मुंबई-पुण्यातल्या लेखक-कवींना बोलवावं, त्या-त्या भागातल्या साहित्यिकांना इतर भागांत न्यावं. यामुळे लेखकांच्या तसंच स्थानिक वाचक-लेखक यांच्या भेटीगाठी होतील आणि वेगवेगळे ट्रेंड व प्रवाह यांची देवाणघेवाण होण्यास चालना मिळेल. या संमेलनांचे विषयही स्पेसिफिक ठेवावेत. त्याला एक आशयसूत्र असायला हवं. (जसं की, मराठीत साहित्यातले नवे प्रवाह किंवा मला आवडलेला एक पाश्चात्त्य लेखक व एक भारतीय लेखक, इंटरनेट किंवा आभासी जगाचा साहित्यावर झालेला परिणाम, पुस्तक किंवा साहित्यकृती वाचल्यानंतरचे वाचकांचे अनुभव, त्यांचं अर्थांतरण इत्यादी.) लेखकांमध्ये संवाद व्हावा, यासाठी त्यांच्या गप्पांची सत्रं ठेवता येतील. या सत्रांमध्ये कोणी एक लेखक अध्यक्ष अशी कोणतीही औपचारिकता नसणं अत्यावश्यक आहे. त्यात लिहिताना येणाऱ्या अडचणी, त्यावर शोधलेले मार्ग किंवा लेखनाचा वेगळा विषय किंवा संकल्पना आदी गोष्टींची मनमोकळी चर्चा व्हायला हवी आणि ही चर्चा साहित्य कसं घडत जातं, त्यावर कोणते परिणाम होत असतात अशा अनेक अंगांनी व्हायला हवी. एखाद्या कवी-लेखकाची मुलाखत घेण्याचं ठरल्यास ती 'तुम्ही लेखनाला कधी सुरुवात केली' यांसारख्या नेहमीच्या प्रश्नांपलीकडे जाऊन त्या लेखकाच्या लेखकीय गाभ्याचा शोध घेणारी मुलाखत असायला हवी. थोडक्यात, 'नवनव्या गोष्टींचा शोध घेत राहू या' - अशी या संमेलनांची टॅगलाइनच असायला हवी, जी सध्याच्या संमेलनांत पूर्णतः 'मिसिंग' आहे.

याही पुढे जाऊन मला असं सांगावंसं वाटतं, की हे सगळं रेकॉर्ड केलं जावं. त्याचे व्हिडिओ संपादित करून 'मसाप' किंवा तत्सम संस्थांच्या वेबसाइट्सवरून प्रसारित केलं जावे. त्यातल्या निवडक लेखांचा, कथा-कवितांचा ऑनलाइन तसंच प्रिंट अशा दोन्ही माध्यमातून अंक प्रकाशित केला जावा.

गेल्या काही वर्षांमध्ये संमेलन संयोजनात आणि सहभागात तरुण लेखकांची संख्या वाढलेली असली, तरी त्यांच्या जगण्यातले, त्यांना आवडणारे विषय व कार्यक्रम संमेलनात यायला हवेत. समकालीन मराठीत साहित्यात काय घडमामोडी घडत आहेत, याबद्दल संमेलनाच्या व्यासपीठावरून बोललं जायला हवं.

शेवटी, साहित्य महामंडळ व संयोजक समितीला मला असं सुचवावंसं वाटतं की, संमेलनात कोट्यवधी रुपये खर्च होतात. दरवर्षी त्याचे आकडेही आपल्यासमोर येतात. तर त्यातला उत्सवीपणा किंचित कमी करून काही एक रक्कम सर्जनशील लेखनासाठी किंवा संशोधन ग्रंथासाठी किंवा कोशासाठी फेलोशिप म्हणून देण्यात यावी. जेणेकरून, यातून प्रत्यक्ष काम करणाऱ्यांसाठी एक आधारसंस्था निर्माण व्हावी.

सध्याच्या उत्सवी, खळबळजनक आणि पृष्ठस्तरीय जगण्याला महत्त्व आलेल्या काळात वर केलेल्या सूचना व मुद्दे एखाद्या फँटसीसारखे वाटू शकतात हे वास्तव आहे आणि मला ते माहिती आहे, तरी आहे हे असं आहे!

**- प्रणव सखदेव**

भ्रमणध्वनी : ७६२०८८१४६३
sakhadeopranav@gmail.com

# गर्दीची ऊर्जा कार्यप्रणालीत केव्हा बदलणार?

शशिकांत सावंत

> आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी मंडळी जोपर्यंत होती किंवा अगदी दुर्गाबाईपर्यंत संमेलनात चैतन्य होते. ही माणसे मोठमोठे इश्यूज उपस्थित करत. दुर्गाबाईंनी तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा केवढा तरी मोठा इश्यू उभा केला आणि खुद्द जे. पीं.च्या आरोग्यासाठी प्रार्थना करायच्या मिशाने अगदी यशवंतराव चव्हाणांना उभे राहायला लावले. ही जी साहित्यिकाची ताकद होती ती आज संपलेली आहे.

**सा**हित्यसंमेलनाच्या संदर्भात नेहमीच संमेलन जवळ आल्यावर काही चर्चा सुरु होतात. एक चर्चा असते त्यातली की संमेलनात इतका पैसा घालवणे बरोबर आहे का? संमेलनाने काय साध्य होते? दुसरे असे असते की संमेलनाचा दर्जा वर्षानुवर्षे खालावतो आहे आणि तिसरे म्हणजे संमेलनाचा अध्यक्ष!

ज्येष्ठ साहित्यिक आजही आहेत आणि त्यांना संमेलनाचे अध्यक्षपद मिळायला काहीच हरकत नाही. श्री. पु. भागवतांसारख्या संपादकाला को.म.सा.प.च्या केळवे, माहीम संमेलनाचे अध्यक्ष करण्यात आले ते संमेलन इतके सुंदर होते की विंदांपासून ते नारायण सुर्वेपर्यंत अनेकांनी त्याला हजेरी लावली. फार सुंदर चर्चा झाल्या. 'चार्वाक'च्या संपादकांपासून ते माझ्यासारख्या तरुण पत्रकारापर्यंत अनेकजण तेव्हा तिथे होते. अशा पद्धतीची संमेलने अधिक व्हायला हवीत.

आता संमेलन हा इव्हेंट झाला आहे याचे कारण असे की गावोगावच्या स्थानिक पुढाऱ्यांना मिरवायला हवे असते. अलीकडे रोहा इथे झालेल्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष तटकरे होते आणि जवळपास एक पंचमांश मंडपदेखील भरला नव्हता. पाडगावकरांच्या मुलाखतीला मात्र थोडे फार लोक आले आणि अर्ध्याहून अधिक सभागृह भरले. अशी जर स्थिती असेल तर मग नियोजकांनी आणि संमेलनावर पैसा खर्च करण्याऱ्यांनी याचा विचार करायला हवा. दुसऱ्या बाजूने सरकार पंचवीस लाख रुपये संमेलनाला देते. अर्थातच सरकारने हे द्यायला हवे कारण संमेलन ही एक मराठी माणसाला आवडणारी कृती आहे. संमेलनात अनेक गोष्टी साध्य होतात. एकतर थोडी बहुत वाङ्मयीन चर्चा होते. हे खरे आहे की प्राध्यापक सुरेंद्र बारलिंगे आणि मे.पुं. रेगे यांची चर्चा जशी काही वर्षांपूर्वी 'सौंदर्यमीमांसा' ग्रंथाबाबत झाली तशा चर्चा काही संमेलनात होऊ शकत नाही. संमेलनातल्या चर्चा ह्या थोड्याशा ज्यांचे वक्तृत्व प्रभावी आहे अशा लोकांनी केलेली एकतर्फी भाषणे असतात. म्हणजे अगदी व्यासपीठावर पु. ल. देशपांडे हजर असताना रत्नागिरी संमेलनात नारायण आठवलेंनी बाजी मारून नेली हेही मी पाहिले होते. अशा वक्तृत्वशीर लोकांना महाराष्ट्रात नेहमीच पाठबळ मिळत आलेले आहे. खरेतर अशी गावोगावी वक्तृत्वाचे फड मारणारी मंडळी असतात. यांच्याकडे बोलण्यासारखे फार काही नसते. फक्त ती वेगवेगळ्या गावात जाऊन भाषणे करतात. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी संमेलनचे अध्यक्ष झाल्या क्षणी प्रवीण दवणेंवर टोला मारला हे काही चांगले वाटले नाही याचे कारण असे की दवणे हे काही ग्रेट साहित्यिक नाहीत. ते स्वतः हे मान्य करतात, पण प्रवीण दवणे ते व .पु. काळे यासारख्या वाचकप्रिय लेखकांना संमेलनात एक विशिष्ट स्थान असते. किंबहुना संमेलनातला मोठा भरणा हा सुहास शिरवळकर, प्रवीण दवणेंसारख्या लेखकांच्या वाचकांचा असतो त्यांना लेखक पाहायचे असतात. त्यांना लेखकांची सही घ्यायची असते. गंगाधर गाडगीळांचे लेखन वाचणारा, दुर्गाबाईंचे लेखन वाचणारा मे. पुं. रेगेंच्या लेखनाचा चाहता वर्ग संमेलनात क्वचितच फिरकतो. हे म्हणजे निवडणुकांसारखे आहे लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकात सरकारे निवडून येतात, पण मध्यम वर्ग आणि उच्च मध्यम वर्ग निवडणुकांत मतदान करायला क्वचित उतरतो. यात भरणा असतो तो सामान्य माणसांचा. तेच संमेलनाबाबतही खरे आहे. आता संमेलनाला हे जे स्वरूप आले आहे ते बदलणे हे काही एकट्या दुकट्याचे काम नाही त्यामुळे जे स्वरूप आहे त्याबद्दल किती हळहळ आणि चिंता व्यक्त करत राहणार? माझा प्रश्न आहे तो वेगळाच, एक म्हणजे संमेलन आणि राजकारण याच्यात नेहमीच 'करिष्मॅटिक' मंडळी लागतात. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी मंडळी जोपर्यंत होती किंवा अगदी दुर्गाबाई होत्या तोपर्यंत संमेलनात चैतन्य होते. ही माणसे मोठमोठे इश्यूज उपस्थित करत. दुर्गाबाईंनी तर अभिव्यक्ती

स्वातंत्र्याचा केवढा तरी मोठा इश्यू उभा केला आणि खुद्द जे. पीं.च्या आरोग्यासाठी प्रार्थना करायच्या मिशाने अगदी यशवंतराव चव्हाणांना उभे राहायला लावले. ही जी साहित्यिकाची ताकद होती ती आज संपलेली आहे. साहजिकच डॅमेज एवढे झालेले आहे, संमेलनाची पत इतकी घसरलेली आहे, तर त्यातल्या त्यात काय करता येईल?

एक तर संमेलनाला खूप मोठ्या प्रमाणावर लोक येतात हे खरे आहे. शासनाची साहित्य संस्कृती मंडळासारखी संस्था अधिक साहित्यिक अधिक काही समाजकार्यकर्ते किंवा स्वयंसेवी संस्था यांना घेऊन संमेलनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर ग्रंथ प्रसाराची मोहीम राबवता येईल का? म्हणजे आजही अनेक खेड्यापाड्यांत ग्रंथालये नाहीत. पाच हजार ते सात-आठ हजारांत शंभर पुस्तकांचे ग्रंथालय होऊ शकते तर महाराष्ट्रातल्या दहा हजार खेड्यांत संमेलनाच्या निमित्ताने ग्रंथालये नेता येतील का? महाराष्ट्राच्या एक हजार खेड्यांमध्ये शंभर एक साहित्यिक मग ते कुठल्याही दर्जाचे असोत, ज्यांनी किमान दोन पुस्तके लिहिली आहेत-संपादित केली आहेत, ज्यांनी किमान शंभर एक लेख लिहिले आहेत अशा शंभर साहित्यिकांना दहा-दहा गावांत फिरवता येईल का? त्यासाठी कॉर्पोरेट, स्वयंसेवी संस्था आणि सरकार यांना एकत्र आणता येईल का? असे केल्यास संमेलन हे केवळ पोशाखी किंवा मिरवण्यापुरते न राहता त्यातून कॉंक्रीट काम होईल, कारण हे काम वर्षभर चालू राहील. जर हजार ग्रंथालये स्थापन करायची म्हटले तर त्यासाठी लागणारा पैसा उभा करावा लागेल. त्यासाठी प्रकाशकांना एकत्र यावे लागेल. ज्योत्स्ना प्रकाशनासारखा उत्तम बालवाङ्मय प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकाची तक्रार असते, की प्रदीप लोखंडेंसारखे लोक गावोगावी जी ग्रंथालये स्थापन करतात त्यात जोस्त्ना प्रकाशन किंवा मौजेच्या बालवाङ्मयाचा समावेश नसतो. याचे कारण प्रदीप लोखंडे ही सारी पुस्तके एका विशिष्ट योजनेतून घेतात; त्यात अडीच हजार रुपयांत शंभर ग्रंथ पडतात आणि पाच हजार देणगी घेऊन त्यांच्या स्वयंसेवी संस्थासाठी अडीच हजार वापरले जातात. यात चूक काहीच नाही, याचे कारण प्रदीप लोखंडेंना गावोगाव ती पुस्तके पाठवणे आणि त्यासाठीचा पत्रव्यवहार व मोठ्या प्रमाणावर पेपर वर्क करायला लागते. हे सांगण्यात माझा दुसरा कुठलाही हेतू नाही पण हेच काम प्रदीप लोखंडे अधिक इतर संस्था अधिक 'ज्योस्त्ना', 'मौज' यांसारखे प्रकाशक अधिक साहित्य संस्कृती मंडळ असे होऊन व्यापक करता नाही येणार का? तसे झाले तर संमेलनाच्या ठिकाणी गर्दी बसण्यापुरती असते, पण गावोगावी पुस्तके ग्रंथालय यांच्या भोवती गर्दी होईल. आज इंग्रजी माध्यमात मोठ्या प्रमाणात साहित्यिकांचीच काय सर्वसामान्य मध्यमवर्गाची, इतकेच नव्हे तर झाडूवाल्या, कामवाल्या बायकांची मुले शिकतात, पण असे होऊनही मराठी माध्यमाच्या शाळा मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. मराठी माध्यमात लाखो मुले शिकत आहेत, पण इंग्रजी माध्यमात गेलेल्या मराठी मुलांनाही मराठी येणे आवश्यक आहे. यासाठी आपण संमेलनाद्वारे मराठीचे वर्ग चालवू शकतो का? सोप्या मराठी पुस्तकांचा प्रसार करू शकतो का? अशा काही योजनांचा विचार करणे आवश्यक आहे. तसे झाले तर संमेलनातील गर्दीची ऊर्जा कार्यप्रणालीत किंवा ग्रंथ-भाषा प्रसारात परावर्तित होईल आणि सर्वांनाच त्यातून मराठी साहित्याच्या प्रसारासाठी हातभार लावता येईल.

संमेलनात साहित्यविषयक अनेक गोष्टींवर चर्चा होते. हजारो लोक येऊन जातात. त्या निमित्ताने मराठीचे सामर्थ्य माध्यमांतून प्रकटते. पण मराठी साहित्याचे प्रश्न संमेलनात चर्चेत येतात का? मराठी साहित्यासमोरचे नेमके प्रश्न कोणते? आज दरवर्षी ३०० ते ५०० पुस्तके मराठी भाषेत प्रसिद्ध होतात, पण दर्जेदार म्हणून त्यातील १५-२० पुस्तके तरी बाजूला काढता येतील का? तशी ती येत नसतील तर त्याला कारणीभूत कोण?

मराठीत कथा, कादंबरी, कवितांची पुस्तके प्रसिद्ध होतात तशीच माहितीपूर्ण म्हणजेच नॉनफिक्शन पुस्तकेही प्रसिद्ध होतात. अनिल अवचट ते अच्युत गोडबोले यांच्या अशा पुस्तकांनाच अधिक मागणी आहे. मराठीत आज कथा-कादंबरी अभावानेच खपते. 'हिंदू'सारखी कादंबरी हा त्याला अपवाद आहे, पण एरवी भूतकाळ रंगवणाऱ्या ऐतिहासिक कादंबऱ्या किंवा पल्प-फिक्शन म्हणजे सुहास शिरवळकर, बाबा कदम यांनाच मागणी असते. आत्मचरित्रे चांगली खपतात. कवितांची पुस्तके खपत नाहीत. अनुवादित पुस्तकांच्या खपाचे प्रमाणही मोठे आहे. हॅरी पॉटर ते जॉन ग्रिशमच्या कादंबऱ्या अशी अनेक इंग्रजी लेखकांची पुस्तके दोन महिन्यांतच मराठीत येतात. सुनील गंगोपाध्यायांची 'पहिली जाग' ही मराठीत अनुवाद झालेली बंगाली कादंबरी १७०० पानांची आहे. तिची पहिली आवृत्ती चक्क संपली. या साऱ्याचा अर्थ असा की मराठी वाचक भुकेला आहे, पण त्याच्यासमोर सकस साहित्य येत नाही. असे का व्हावे? एकेकाळी मराठी साहित्य ऐन भरात होते. पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, दि. बा. मोकाशी, इंदिरा संत, व.पु. काळे, रमेश मंत्री, गौरी देशपांडे, सानिया, विश्वास पाटील असे अनेक लेखक लिहीत होते. 'कोसला'च्या आगमनानंतर साठोत्तरी नवे लेखक लिहू लागले. मराठी साहित्यात वास्तवाला महत्त्व आहे. वास्तवाचे चित्रण करणारे दलित साहित्यही त्याच सुमारास मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झाले. त्यातील आत्मचरित्रांनी वास्तवाचा हा पाया भक्कम केला. याचा एक परिणाम असा झाला की कल्पनाशक्तीचे महत्त्व थोडे कमी झाले. राजन गवस, राजन खान, जयंत पवार असे नवे किंवा रंगनाथ पठारेंसारखे जुने लेखक हे वास्तवावर आधारितच लेखनाला महत्त्व देतात. त्याला छेद देणारे लेखन विलास सारंग, सतीश तांबे यांसारख्यांनी केले आहे. साधारणपणे मराठी माणसाचे अनुभवविश्व हे घर, परिसर, कामाचे ठिकाण एवढेच मर्यादित असते. यामुळे बहुतेक लेखकांचा मसाला आत्मचरित्र हाच असतो. असे लेखक दोन-तीन पुस्तकांत संपून जातात. वेगवेगळ्या जीवनपद्धतींचे निरीक्षण, प्रवास, चित्रकला, सिनेमा यांसारख्या कलांचा अभ्यास, जगभरातील आणि स्वत:च्या

परिसरातील बदलांची नोंद घेणे, त्यासाठी झोकून देणे हे मराठी लेखकाला जमत नाही. पूर्वी तर बहुतेक मराठी साहित्यिक प्राध्यापकच असत. 'प्राध्यापकाच्या नोकरीत दोन्ही वेळ घरी जेवता येते!' असे विद्याधर पुंडलिक यांनी त्या नोकरीचे वर्णन केले होते. अशा परिस्थितीत व्यापक जागतिक भान आणि समग्र अनुभव देणारे लेखन मराठीत कोठून होणार? बनगरवाडी ते कुसुमाग्रज, गंगाधर गाडगीळांच्या कथा असे अनेक प्रकारचे मराठी साहित्य इंग्रजीत अनुवादित झाले आहे. त्यांना जागतिक काय, पण भारतीय स्तरावरही कोणी विचारत नाही. अमित चौधरी यांनी 'पिकॅडोर बुक ऑफ इंडियन रायटिंग' हे भारतीय लेखकांच्या साहित्याचे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यात एकही मराठी लेखक नाही. आणि या गोष्टीबद्दल भांडले कोण, तर गिरीश कर्नाड. थोडक्यात, आपली स्थिती अशी आहे.


तरीही आपण मोठी संमेलने भरवतो आणि साहित्याचा गणेशोत्सव साजरा करतो. औदुंबर येथे कवी सुधांशू भरवत असलेले संमेलन किंवा राजन खान, सतीश तांबे आमंत्रित लेखकांची जी संमेलने भरवतात, अशा ठिकाणीच साहित्यविषयक बाबींची गंभीरपणे चर्चा होऊ शकते. शिवाय वेगवेगळ्या स्तरावरील लेखक, कवी, चित्रकार अशा ठिकाणी एकत्र येऊन विविध स्तरांवरची देवाणघेवाण करू शकतात. राजन खान यांनी पाचगणीजवळ जे संमेलन भरवले होते, त्यात अनेक नवे-जुने साहित्यिक उपस्थित होते. साताऱ्याजवळ वेर्णे येथे झालेल्या तीन दिवसांच्या कार्यक्रमात सतीश तांबे, अशोक शहाणे, विश्राम गुप्ते, ज्ञानदा यांच्यापासून ते सुजित फाटकसारख्या नव्या कवीपर्यंत अनेक जण उपस्थित होते. यातून दोन्ही पिढ्यांना एकमेकांबद्दलची साहित्यिक धारणा कळते. म्हणूनच अशा छोट्या संमेलनांना महत्त्व द्यायला हवे. त्यातूनच साहित्याचे भले होईल.

– शशिकांत सावंत
भ्रमणध्वनी : ९८२१९७८५६१८
shashibooks@gmail.com


॥ग्रंथाली॥

## सफरनामा

**स्मिता भागवत**





**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

माझा प्रवासाचा छंद वारसागत! देशविदेशात मी खूप भटकंती केली. कारण तर्कनिष्ठ घरात झालेले डोळस संगोपन हे माझे परमभाग्य! टुरीझमची फॅशन अस्तित्वात येण्यापूर्वी ज्येष्ठांनी आम्हाला हेतुपूर्ण प्रवास घडवले. सांस्कृतिक स्थळांच्या प्रचलित दंतकथा, आख्यायिका फॅक्ट बेस्ड फिक्शन असल्याचे सांगून सत्य-तथ्याचे पृथक्करण करत प्रवासानंदात भर घातली. अभिव्यक्त होण्याची सवय लावली. परिणामी प्रवासानुभवाचे कथन हा माझ्या आवडीचा प्रांत बनला.

अनुभवांना शब्ददेह देताना मी प्रवासाच्या पुनःप्रत्ययाचा आनंद लुटला. ज्यांना प्रवासानंद लाभला आहे त्यांना समांतर स्मरणयात्रा घडावी आणि ज्यांना आवड असून प्रवास जमलेला नाही त्यांना शब्दयात्रेचा आनंद लाभावा या हेतूने प्रवासप्रेमी लेखिकेने ग्रंथालीच्या वाचकदिनी वाचकांना दिलेल्या नजराण्याचे नाव आहे सफरनामा!...

## सोलमेट

**अर्चना गाडेकर शंभरकर**




**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

'सोलमेट' ही एक अनोखी प्रेमकथा आहे. मैत्री, प्रेम या भावना कायम चिरतरुण आहेत. एकमेकांवर प्रेम करणारी माणसं आपल्या सभोवताली आहेत म्हणून आपण जगतोय. जिवंत राहायला तर हवा, पाणी, अन्न या सर्व वैज्ञानिक कारणांचा आधार घ्यावा लागतो. आपल्या सानिध्यात आलेली प्रत्येक व्यक्ती आपल्याशी कोणतेतरी नाते जोडून जगू पाहते. काही नाती मात्र व्याख्येपलीकडे जातात. मित्र, सखा, जिवलग, प्रियकर या पलीकडे एक नाते असते. ते सर्वांच्या वाट्याला येतेच असे नाही. या नात्याला काळ, वय, आयुष्य कशाच्याही मर्यादा नसतात. अशा नात्यांना शब्दात बांधणे अवघड असते. ही कादंबरी वाचतांना तुमच्या मनातला एखादा हळवा कोपराही उघड होण्याची शक्यता दुणावते आणि मग सोलमेट ही कादंबरी तुमच्या मनातली होते...

सध्याच्या 'कॅश-टंचाई'च्या दिवसांत
वाचकांसाठी बचतीची खास संधी...

रोहन
प्रकाशन

विविध विषय,
लोकप्रिय पुस्तकं

४० दिवस
४० पुस्तकांवर
३०%
सवलत

ONLINE खरेदीची
सोय उपलब्ध

१७ फेब्रुवारी '१७पर्यंत

PAY-TM सोय उपलब्ध

४० पुस्तकं कोणती?

■ चरित्रपर इ. ■

• महास्वप्न (सॅम पित्रोदा) • मेट्रोमॅन श्रीधरन • सुन मेरे बंधु रे (एस.डी.बर्मन) • वहिदा रेहमान • त्या दहा वर्षांतील गुरुदत्त • फिल्ड मार्शल सॅम माणेकशा • शिखरावरून.. (एडमंड हिलरी) • कृष्णाकाठ • वॉर्ड नं.५, केइएम • सरदार वल्लभभाई पटेल • कस्तुरबा : शलाका तेजाची • केवळ मानवतेसाठी (अब्दुल सत्तार इदी) • लाल बहादूर शास्त्री • लोकशाहीवादी अम्मीस दीर्घपत्र • सहकारधुरीण • इंदिरा गांधी, आणीबाणी... • यांनी घडवलं सहस्रक • असा घडला भारत

■ साहित्यिक, माहितीपर व उपयुक्त पुस्तकं ■

• रस्किन बॉंड लिखित कथासंग्रह (६ पुस्तकं) • ऑफबीट भटकंती (भाग १,२,३) • डॉ. कलाम लिखित ३ पुस्तकांचा संच • साउथ ब्लॉक, दिल्ली (शिष्टाईचे अंतरंग) • पर्यटन : एक संजीवनी • हॅपी लग्न...(भाग-१,२) • बॅलन्सशीट व फायनान्स समजून घेताना • मन:स्वास्थ्य संच (४ पुस्तकं) • मधुमेही खुशीत... • करामत धाग्या-दोऱ्यांची

रोहन प्रकाशन
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
www.rohanprakashan.com

विशेष ऑफर
१७ फेब्रुवारीपर्यंत
सर्व दुकानात व
रोहन प्रकाशनाच्या
कार्यालयात

# ...हेच संमेलनांपुढचे खरे आव्हान!

**किशोर बेडकिहाळ**

अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाकडे एकूण मराठी साहित्य, संस्कृती, भाषेचा उत्सव म्हणून पाहिले जाते. उत्तरोत्तर भाषेचा उत्सव म्हणून त्याकडे पाहण्याची जाणीव वाढत चालल्यामुळे भाषेच्या संवर्धनासाठी साहित्यसंमेलनाचे नियोजन होतेच असे नाही. भाषाप्रेमाचा वा साहित्यप्रेमाचा उत्सव होणे गैर आहे का? तर नाही. पण फक्त उत्सवावर जेव्हा भर दिला जातो तेव्हा वाचक व त्याच्या अपेक्षांना या चौकटीत फारसे स्थान नसते. कुणीतरी उत्सव करायचा आणि कुणीतरी तो बघायचा असे रूप मग संमेलनाला येते. संमेलनाचे संयोजन करणाऱ्यांना भाषेच्या प्रश्नांविषयी आस्था असतेच असे म्हणता येत नाही. मग संमेलन म्हणजे निरनिराळ्या सामाजिक व सांस्कृतिक संस्था आणि त्यामागे उभ्या असलेल्या राजकीय शक्ती यांच्या निव्वळ हितसंबंधांचा भाग होऊ लागते.

न्यायमूर्ती रानडे यांनी म. फुले यांचा विरोध असूनही ग्रंथकार संमेलन घ्यायचे ठरवले. त्यांच्या मूळ संकल्पनेत जी कल्पना अनुस्यूत होती त्यात लेखकांनी एकत्र येणे, चर्चा-चिंतन करणे व त्यातून वाङ्मयाबद्दलचे निकोप वातावरण तयार होणे, इ. ग्रंथकार हा केवळ साहित्यिकच असावा असे नाही तर समाजाला काही भरीव देणारा लेखक त्यांना अपेक्षित होता. म्हणजेच राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, अन्य वैचारिक लिहिणारे व ललित वाङ्मय लिहिणारे असे सर्वच अभिप्रेत होते. आज सामाजिक विचारवंत किंवा समीक्षक हा संमेलनाचा अध्यक्ष व्हावा का यावर चर्चा चालते. याचा अर्थ काय होतो? न्यायमूर्ती रानडेंना अपेक्षित व्यापक दृष्टी आपण सांभाळली नाही.

दुसरे म्हणजे, सबंध साहित्यविषयक संस्कृतीचे सर्वोच्च शिखर म्हणून साहित्य संमेलनाकडे पाहणे उचित नाही. तो साहित्यसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक असला तरी एकमेव घटक नाही. समाजात वाचनसंस्कृती विकसित व्हायला हवी. लोकांना चर्चा-चिंतनातून उदारमतवादी विचारांकडे जायची वाट सापडायला हवी. ही संमेलनाच्या संकल्पनेमागची मूळ प्रेरणा, मात्र संमेलनांमधून उदारमतवादी शक्ती बळकट तर होत नाहीतच पण उदारमतवादी शक्तींच्या विरोधात लढण्याचे बळही मिळत नाही. मराठी भाषक समाजाचा हा उत्सव मराठीच्या एकाच एका प्रमाण रूपाचा पुरस्कार करतो. त्यामुळे तो मराठी भाषक समाजातील विविध बोलींचे प्रतिनिधित्व करतो असे होत नाही. संमेलनामधून वाङ्मयाभिरुची विकसित होते का, हा प्रश्नच आहे. आवडत्या लेखकांशी संवाद होतो का, तर तसेही नाही. सगळेच लेखक संमेलनात सहभागी होत नाहीत. साहित्य संमेलनाध्यक्षाची निवड इत्यादी तांत्रिक गोष्टींबाबत अनेक वर्षे घोळ सुरूच असून त्यातून कोणताही निर्णय होत नाही कारण साहित्य संमेलन वाचकांच्या आश्रयावर पार पडत नाही. केवळ वाचकांच्या आश्रयावर एखादे नियतकालिक चालणे देखील आज दुरापास्त झाले आहे. संमेलनाच्या महाकोशाला एक कोटीचा आकडाही ओलांडता येऊ नये, हे वास्तव लक्षात घेता साहित्य संमेलन रसिकाश्रयी व्हावं का याविषयीची समाजाची आस्था(?) नेमकी लक्षात येते आणि भाषेच्या पातळीवर समाज किती परावलंबी झाला आहे हे कळते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आणि ऐंशीच्या दशकानंतर प्रकाशनाचा व्यवहार मध्यमवर्गीय माणसाच्या आवाक्यात आला. याचा अर्थ साहित्य व्यवहाराचे विकेंद्रीकरण होते आहे. एकेकाळी साहित्यकृतीला प्रकाशक मिळणे ही मोठी गोष्ट होती आता साहित्य व्यवहार हा प्रकाशकांवर अवलंबून राहिला नाही. स्वत:ची कलाकृती प्रकाशित करण्याची क्षमता आज मध्यमवर्गीय बहुजन वर्गात आली आहे. आज लेखकांची संख्या प्रचंड वाढली मात्र निर्माण होणाऱ्या वाङ्मयव्यवहाराची चिकित्सा करणे अवघड होऊन बसले आहे. परिणामी जिवंत स्वरूपाचे वादविवाद व चर्चा आज साहित्यसंस्कृतीत घडताना दिसत नाहीत. याच्या जोडीला अस्मितानिष्ठ राजकारण फोफावत असल्याने लेखकाचे स्वातंत्र्य पुरेसे अबाधित राहत नाही. साहित्यसंमेलनांमधून लेखनस्वातंत्र्य किंवा अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा केवळ उच्चार होणं एवढ्यावरच साहित्यसंस्कृती समाधान मानते. त्याचा पाठपुरावा व प्रत्यक्ष कृती करणे यापासून संमेलन दूरच आहे.

मराठी भाषकांची संस्कृती, साहित्याभिरुची व समाजासमोरच्या प्रश्नांची तड लागण्यासाठी खर्चिक संमेलनांपेक्षा छोट्या-छोट्या पातळीवरील संमेलनांना अधिक महत्त्व मिळायला हवं. त्या त्या भागातील साहित्यिकांना

व्यासपीठ देणाऱ्या संस्था या केवळ साहित्य परिषदा नाहीत. महामंडळाच्या घटक संस्थांच्या बाहेरही अनेक छोट्या-मोठ्या संस्था आज भरीव उपक्रम करीत आहेत. उदा. आंबेडकर अकादमीने घेतलेल्या साहित्यचर्चा, तसेच इतर संस्थांचे उपक्रम. अशा उपक्रमांची दखल साहित्य संमेलनांमध्ये घेतली जातेच असे नाही. विचारवेधसारख्या संमेलनांनी समाजासमोरच्या राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक प्रश्नांची तपशीलवार चिकित्सा केली. त्यांना मिळालेला प्रतिसादही लक्षणीय होता. आज विविध बळकट साहित्य प्रवाहांनी साहित्यविश्व घुसळून काढले आहे. विद्रोही संमेलन, ख्रिस्ती संमेलन, जैन साहित्य संमेलन, दलित-आदिवासी साहित्य संमेलने, अनेक भागांत होणारी एक दिवसीय साहित्य संमेलने दक्षिण महाराष्ट्र साहित्यसभेचे संमेलन, को.म.सा.प.ची ची संमेलने इत्यादी संमेलनांनी त्या त्या सामाजिक गटांच्या अभिव्यक्तीला उद्गार दिला. या सर्वांचे प्रतिनिधित्व साहित्यसंमेलनातून होईल तेव्हाच साहित्यसंमेलन प्रातिनिधिक होईल. संमेलनाध्यक्ष कोण हा मुद्दा मला तितकासा महत्त्वाचा वाटत नाही. या मुद्द्यामुळे सबंध साहित्यसंमेलन आपण एकाच व्यक्तीच्या नावाने ओळखतोय ही गोष्ट आपल्या लक्षात येत नाही. लोकशाही चौकटीत आज साहित्यव्यवहाराचे प्रचंड विकेंद्रीकरण होत आहे. त्यातून दोन-चार लेखकच मान्यताप्राप्त राहतील ही शक्यता खूप धूसर आहे. वेगवेगळे सामाजिक स्तर आज बोलू आणि लिहू लागले आहेत. अशावेळी सर्वांना माहीत असलेला लेखकच संमेलनाध्यक्ष व्हावा अशी जी ओरड होते त्याला अर्थ राहत नाही. किंबहुना संमेलनाध्यक्ष म्हणून निवडून येणाऱ्या लेखकाचे साहित्य वाचणे ही वाचकांची-संपादकांची-संयोजकांची जबाबदारी आहे. वाचकप्रिय लेखकच अध्यक्ष व्हायला हवा ही गोष्ट योग्य नाही. साहित्य-समाज यांविषयी लिहू-बोलू शकणारी व्यक्तीही संमेलनाध्यक्ष व्हायला हरकत नाही कारण साहित्यव्यवहारात केवळ लेखकच समाविष्ट नाहीत याचे भान बाळगलेले बरे.

आज साहित्यसंमेलन भरवणे हा परंपरेचा एक भाग म्हणून पाहिला जातो. त्यातून उत्सवीपणाला उठाव मिळतो. परंतु यातून भाषासंवर्धन, वाङ्मयाभिरुचीचे संवर्धन किती घडते हे तपासून पाहिले पाहिजे. लेखक स्वतंत्र राहण्याला संमेलन मदत करत नाही. जात, धर्म, अस्मितानिष्ठ राजकारण यांच्यापलीकडे जाऊन संमेलनाने व्यापक विचारांचा स्वीकार करायला हवा. संमेलने व्हावीत की होऊ नयेत हा मुद्दा महत्त्वाचा नाही ती कशासाठी व्हावीत हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ज्या देशात स्वातंत्र्यप्रिय नागरी समाज नाही व जो आहे तो जात-जमातनिष्ठ जाणिवांनी व सांप्रदायिक धर्मजाणिवेने नकली विज्ञाननिष्ठेने ग्रस्त आहे, त्या समाजात लेखक स्वतंत्र असणे वा राहणे या गोष्टीला मर्यादाच राहणार. साहित्यसंस्था, राज्यसंस्था वा समाज लेखकाच्या मागे उभा राहत नाही त्यामुळे लेखकाची सामाजिक उपस्थिती उत्सवीच राहणार. साहित्य संमेलनांपुढे खरे आव्हान आहे ते हेच.



– **किशोर बेडकिहाळ**

भ्रमणध्वनी : ९४२३०१२८७७

kishorbedkihal@gmail.com



**ग्रंथाली**



## नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१६

**सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते**


**मूल्य ८० रुपये**

**सवलतीत ५० रुपये**

• नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची गोष्टीरूपाने यथार्थ वैज्ञानिक माहिती देणारा एकवीस वर्षे चाललेला जगातला एकमेव उपक्रम. • सर्वोत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीसाठी राज्यशासनाचा तीन वर्षे पुरस्कार. • ''लोकांपर्यंत विज्ञान नेण्याचा अभिनव उपक्रम'' : खुद्द नोबेल विजेत्यांचा अभिप्राय • मराठीतील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी, तसेच द एशियन एज, द फ्री प्रेस जर्नल, बॉम्बे टाइम्स आणि आउट लुक यांनी खास लेख लिहून प्रशंसा केलेली प्रकाशन योजना...

## आठवणीतला गाव

**अशोक बेंडखळे**



**मूल्य १०० रुपये**

**सवलतीत ६० रुपये**

लहानपणीच्या, बालपणीच्या आठवणी मोठ्या आकर्षक असतात. त्यात त्यांना आपल्या गावाचं कोंदण लाभलं की त्या संस्मरणीय ठरतात. मग ते कोणाचेही गाव असो. अशा आठवणी अशोक बेंडखळे यांनी आपल्या या पुस्तकात चित्रबद्ध केल्या आहेत. आठवणीतला गाव, गावची जत्रा, गावचा दसरा, गावची दिवाळी, हरवत चाललेला गुढीपाडवा, गौरी-गणपतीचे दिवस, बालपणीचा श्रावण, पाऊस गावचा, पाऊस मुंबईचा, गोष्ट गावच्या सिनेमाची, गावचा रानमेवा, गावची शाळा, गावचे डोंगर- अशा आपल्या निसर्गरम्य गावाचं सुरेख चित्र त्यांनी रेखाटलं आहे. – डॉ. दत्ता पवार

# टीका झाली पाहिजे!

**जी. के. ऐनापुरे**

साहित्यसंमेलनं ज्यासाठी सुरू करण्यात आली, ते प्रयोजन आता मागं पडलं आहे. साहित्य संमेलनात का जावं असा प्रश्न सर्जनशील लेखकाला पडावा अशी आताच्या संमेलनांची स्थिती आहे. संमेलने ही दिवसेंदिवस कुरूपतेकडे प्रवास करत असताना कोणताही सर्जनशील लेखक तिकडे वळू शकत नाही. संमेलनाचे आताचे स्वरूप पाहिले तर हे धान्यात येईल, की साहित्यसंस्थांचे जे मतदार तेच संमेलनात विविध परिसंवादात, कार्यक्रमांत मिरवताना दिसतात. असं असल्यावर इतर साहित्यप्रेमी वा अभ्यासक, लेखक त्याकडे कसे वळणार? साहित्याच्या सर्व प्रवाहांना संमेलनात सामावून घेता येईल असे प्रयत्न व्हायला हवेत, परंतु ते होताना दिसत नाहीत. ज्यांनी साहित्यात महत्त्वाचं योगदान दिलं आहे, त्यांना संमेलनात व्यक्त होण्याची संधी मिळायला हवी. आपल्याकडे स्त्रियांचं लेखन आता वाढू लागलं आहे. त्याची एक सशक्त परंपरा साकारू लागली आहे. त्यांचा सहभाग संमेलनात कसा वाढेल हेही पाहायला हवं. एरवी संमेलनात गर्दी फार होत असते. दरवर्षी संमेलनातील गर्दीचे आकडे सांगितले जातात. परंतु येथे प्रश्न पडतो की या गर्दी जमण्याचं 'आउटपुट' काय? कारण गर्दी जमतेय हे खरं आहे, मात्र तिथे काही गंभीर घडतंय का? याचे उत्तर सध्या तरी नकारात्मकच आहे. केवळ दिखाऊ आणि भडक उत्सवीपणात आपण वेळ तर वाया घालवत नाही आहोत, याचाही विचार करण्याची वेळ आली आहे. आजवरची अध्यक्षीय भाषणे वाचलीत तर त्यातून काहीच भरीव हाती लागत नाही. महाविद्यालयांत मराठीचे तास घेतल्याप्रमाणे ही भाषणे होत असतात. त्यामुळे यंदाच्या निर्वाचित संमेलनाध्यक्षांकडून काही भरीव हाती लागण्याची शक्यता तशी कमीच आहे. ते सध्याच्या नोटाबंदीच्या निर्णयावर काही मतं मांडणार आहेत का? अशांसारखे प्रश्न, मुद्दे संमेलनात का चर्चिले जाऊ नयेत? ते होणार नसेल तर संमेलनामुळे लोकशाहीला काहीच फायदा होणार नाही.

आतापर्यंत मुख्य प्रवाहाच्या बाहेरील साहित्यिकांनाही संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले आहे. रूढ कलात्मक व परंपरावादी साहित्याविषयी विरोधी मतं असणारे साहित्यिकही अध्यक्षपदी आले आहेत, पण त्यांची संमेलनातील भाषणे पाहा. त्यांच्या भाषणांतून आपल्याला संमेलनाध्यक्षपदी बसवल्याप्रति उपकृत झाल्याचीच भावना व्यक्त होताना दिसते. त्यांनी आपले विचार तेथे ठासून मांडले, असे काही झाले नाही. शेवटी मूठभर लोक, तेच विषय, त्याच-त्याच चर्चा यांनी संमेलनांचा कब्जा घेतला असल्याची परिस्थिती आहे. गंभीरपणे चर्चा व्हायला मोठा 'इन्सिडेंट' घडायला हवा. तो काही तिथे घडेल असे वाटत नाही.

वाचनसंस्कृती वाढण्याच्या दृष्टीने संमेलनाद्वारे प्रयत्न करता येतील. आपल्याकडे संमेलनात पुस्तकविक्री होते, परंतु त्यात कोणती पुस्तके खपतात तेही पाहायला हवे. काही विशिष्ट पुस्तके वा लेखकांचा गाजावाजा संमेलनात केला जातो. शिवाजी सावंत, रणजित देसाई, पु.ल. देशपांडे यांच्यापलीकडे साहित्यच नाही का? सशक्त वाचनसंस्कृती निर्माण व्हायची असेल, तर आधी विविध साहित्यप्रवाहांतील लेखकांचे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचेल यासाठी प्रयत्न करावा लागेल. त्यासाठी आधी नवीन लेखकांचा शोध घ्यायला हवा. प्रकाशकांनी यात मोठी भूमिका बजावायला हवी. येथे पश्चिम बंगालमधील 'अमृतबझार पत्रिका' या नियतकालिकाचे उदाहरण आठवते. नवीन विषयांचा, त्यासाठी नवीन लेखकांचा शोध या नियतकालिकाने घेतला. नवे लेखन त्याद्वारे बाहेर आले, नवीन लेखक घडले. पण आपल्याकडे तसा प्रयत्नही होत नाही. संमेलन व त्यातही प्रकाशक यात खूप काही करू शकतात. धर्मसत्तेकडे जाणारे मार्ग बंद पाडत जीवनवास्तवाला कवेत घेणाऱ्या साहित्याचा प्रसार कसा होईल याकडे संमेलनाने पाहायला हवे.

सामाजिक समस्या जोपर्यंत साहित्यात येत नाहीत तोपर्यंत ते परिपूर्ण होऊ शकत नाही. आजच्या भवतालात भयंकर आशय समोर असताना आशय कवेत येतच नाही अशी ओरड लेखकमंडळी करत असतात. केवळ प्रयोगाकडेच ओढा असल्यावर आशय कवेत येणे शक्यच नाही. या आशयापर्यंत जाण्यासाठी काय केलं पाहिजे याचा विचार करायला हवा. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर, आपल्याकडे शहरात 'समीक्षा' करतात आणि खेड्यांमध्ये 'टीका'. पाचशे-सहाशे पानं साहित्यकृतीवर लिहून झाल्यावरही आशय पोहोचवण्यात अपयश येत असेल, तर त्या लेखनाला काहीच अर्थ नाही. खेड्यातला आमचा वाचक दोन-तीन वाक्यात साहित्यकृतीचं मर्म उलगडून देऊ शकतो. तो टीकेला भीत नाही आणि ती करण्यावाचून कचरतही नाही. टीका ही झालीच पाहिजे आणि तीही जोरात झाली पाहिजे. संमेलनात

ती होताना दिसत नाही.

संमेलनांच्या भवितव्याकडे पाहता, ती टिकतील यात शंका नाही. परंतु, राजकारणी आणि असाहित्यिकांचा तिथला वावर पाहता येत्या काळात महाराष्ट्राचा मुख्यमंत्रीच संमेलनाध्यक्षपदी बसल्यास नवल वाटायचे कारण नाही! परंतु एक बाब येथे नोंदवावीशी वाटते, ती म्हणजे पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे यांची निवड झाली आहे. कसबे यांच्यासाख्या विचारवंताच्या सूचनांना म.सा.प. कसा आणि काय प्रतिसाद देते, हे पाहणे कुतूहलाचे आहे. त्यांच्या प्रयत्नांतून येत्या काळात संमेलनाच्या स्वरूपात काही सकारात्मक बदल झाल्यास चांगलेच आहे.


**– जी.के. ऐनापुरे**

भ्रमणध्वनी : ९४२३०१७८३६

ainapure62@yahoo.com


# बोलींच्या जतनाकडे लक्ष देण्याची गरज

**अनिल साबळे**

**सा**हित्यसंमेलन ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक महत्त्वाची घटना आहे. मराठी माणसाचं साहित्यविषयक मनोगत व्यक्त करण्याचा तो सोहळा असतो. साहित्याच्या आरशात आपली प्रतिमा उत्कटतेनं पाहणं, ती थोडी दुरुस्त करूनही पाहणं यासारखा आनंद नाही, पण याच साहित्य संमेलनांसंबंधी ती व्हावीत-होऊ नयेत अशी उलट-सुलट चर्चा नेहमी होत असते.

साहित्यसंमेलन हे तात्पुरत्या प्रासंगिक सोहळ्याच्या स्वरूपात न राहता, त्या माध्यमातून जनमानसात सांस्कृतिक आणि थवाङ्मयीन जागृती व्हावी, वाचनाचे महत्त्व सर्वसामान्य लोकांना पटावे, तसेच ते सर्व घटकांना सामावून घेणारे सांस्कृतिक संमेलन व्हावे, अशी त्यामागची अपेक्षा असते. संमेलनांना जसजशी प्रचंड गर्दी व्हायला लागली तसतशी राजकारणी मंडळींचा संमेलनातला वावरही वाढू लागला. त्यामुळे त्याला आलेले उत्सवी रूप बदलून त्यात काही कृती होण्याचीही आवश्यकता वाटते. संमेलनात मराठी भाषा व साहित्य यासंबंधीचे नवे उपक्रम राबवायला हवेत. मराठी भाषेतील अनेक बोलींवरील संशोधनाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. या बोलींच्या जतन-संवर्धनाचे उपक्रम हाती घेणे गरजेचे आहे. आदिवासी भाषा ही केवळ भाषा नसून जीवनदर्शन आहे. परंतु सध्याच्या संमेलनांमध्ये या भाषांचा समावेश होताना दिसत नाही. भाषिक प्रश्न सरकारऐवजी साहित्य महामंडळाने हाती घेतले पाहिजेत, असेही वाटते.

दलित आणि आदिवासी लेखकांची पाहिजे तितकी दखल मराठी साहित्याने घेतलेली नाही. तळागाळातील, रानाडोंगरातील लेखक लिहिते झाले आहेत, परंतु साहित्यसंमेलनांमध्ये बोटावर मोजण्याइतक्याच दलित-आदिवासी साहित्यिकांना निमंत्रित केले जाते. साहित्यसंमेलन हा मराठी माणसांचा उत्सव आहे, देखावा नाही. केवळ देखाव्यात पैसे खर्च करू नयेत. साहित्यसंमेलन सार्वजनिकरीत्या भरवले जाते, याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

संमेलनात अध्यक्षपदाबरोबरच कथाकथन, कविसंमेलन, मुलाखत, परिसंवाद आदींसाठी निवड करताना स्त्रीला नगण्य स्थान असते. त्यामुळे साहित्य संमेलन हे पुरुषसत्ताक व्यवस्थेचा भाग झाल्याची शंका येते. आतापर्यंत कुसुमावती देशपांडे, दुर्गाबाई भागवत, शांता शेळके आदींचा अपवाद सोडला तर स्त्रीला संमेलनात स्थान नाही. अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरले तर स्त्रीला प्रचार करणे अवघड होते. इतर ठिकाणी स्त्रीला आरक्षण दिले जाते, मग साहित्य संमेलनात आरक्षण का नाही?

तीन दिवस मांडव घालून हा यांत्रिक उत्सव साजरा होतो. अनेक वर्षांपासून संमेलनाचे स्वरूप ठरून गेले आहे. ग्रंथदिंडी, साचेबद्ध पद्धतीने होणारे उद्घाटन समारंभ, सहा-सात परिसंवाद, कविसंमेलने, मुलाखती, कथाकथन, बालमेळावा अशा सर्व यांत्रिक भानगडी असतात. अगदी सामान्य दर्जाची माणसे कवी-लेखक म्हणून मिरवत असतात, मात्र थोर लेखक संमेलनांपासून दूर राहतात. गंभीर गोष्टी संमेलनात होत नाहीत. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्च होऊनसुद्धा हाती काहीच लागत नसेल तर या गोष्टीत अर्थ काय?


**– अनिल साबळे**

भ्रमणध्वनी : ९५६१८९०४४४

# हे त्यांना शोभत नाही!

**डॉ. प्रतिमा इंगोले**

> **लेखिका अध्यक्षपदासाठी उभी राहिली की तिच्या लायकीबद्दल प्रश्न उपस्थित केले जातात पण सुमार दर्जाचे लेखक निवडून येऊन संमेलनाध्यक्ष म्हणून मिरवतात. लेखिकांच्याच बाबतीत मग कसोटी कशासाठी?**

**सा**हित्याच्या क्षेत्रात अजूनही लेखिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषितच आहे. वास्तविक स्त्रिया कसदार-धारदार लिहिताहेत. बोल्ड लिहिताहेत. त्या नवनवीन प्रयोग करताहेत. समाजवास्तव समजून घेऊन त्याची मांडणी करताहेत. मी स्वत: अनेक गावांतून फिरून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर पुस्तक लिहिले आहे. पुरुषांच्या तुलनेने स्त्रिया कुठेच उण्या नाहीत पण साहित्य संमेलनाच्या बाबतीत स्त्रियांच्या वाट्याला उपेक्षाच आली. विजयाबाई राजाध्यक्ष साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष झाल्या ते वर्ष २००१. त्यानंतर आजतागायत कुणाही लेखिकेच्या-कवयित्रीच्या वाट्याला हा सन्मान आला नाही. २०१२च्या निवडणुकीदरम्यान मी अनेक ठिकाणी जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. प्रचारादरम्यान दोन-तीन लाख रुपये देखील खर्च केले. मीना प्रभू, गिरिजा कीर, प्रभा गणोरकर यादेखील संमेलनाच्या रिंगण्यात उतरल्या होत्या पण गलिच्छ राजकारण करून स्त्रियांना पराभूत केले जाते. भले भले लेखक स्त्रीवादी विचारांचे म्हणून मिरवतात पण प्रत्यक्षात त्यांच्यावरचा पुरुषी संस्कृतीचा पगडा कायम असतो.

एखादी लेखिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाकरता उभी राहिली तर तिला संधी देण्याइतका मनाचा मोठेपणा पुरुष दाखवत नाहीत. स्त्रियांच्या बाबतीत उदार भूमिका घेणारे लेखक प्रत्यक्ष कृतीतून मात्र त्याग करण्याची तयारी दाखवत नाहीत. मग नुसता औदार्याचा आव आणण्यात काय अर्थ?

सर्वांना सामावून घेण्याचा दावा करणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचा ढाचा आजही बदललेला नाही. त्यावरची सदाशिवपेठी पुणेरी छाप अजून पुसली गेलेली नाही.

२०१० नंतर मी जवळपास अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या मंडपात गेलेच नाही. ते ८३ वे अखिल भारतीय साहित्यसंमेलन होते. या संमेलनातले अनुभव मला आजही अगदी ठसठशीतपणे आठवताहेत. ८३व्या संमेलनावर सर्वात मार्मिक टिप्पणी 'झी' या दूरदर्शन वाहिनीच्या कलाकारांनी त्यांच्या एका कार्यक्रमात सादर केली होती. एक राजकारणी, एक महिला आणि संयोजक पुरुष अशा तिघांच्या संवादातून ती सादर केली गेली. राजकारणी संयोजकाला म्हणतो, ''आम्ही राजकारण्यांनी महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले पण तुम्हा साहित्यिकांचे काय? आतापर्यंत तुम्ही फक्त तीनच महिलांना अध्यक्ष केलेत तर आता ह्यापुढे होणाऱ्या तेहतीस संमेलनांना महिलांना अध्यक्ष करा.'' यावर त्यावेळी त्या संवादात सहभागी महिला म्हणते, ''हे खूपच जास्त होतेय. तेहतीस संमेलनांना लेखिकांना अध्यक्ष करणार नाहीतच. थोडं कमी करा.' त्यावर परत राजकारणी म्हणतो, 'मग आपण असा कायदा करू या की, यानंतरच्या तेहतीस संमेलनांपैकी किमान तेहतीस टक्के संमेलनांना महिलांना अध्यक्ष करावे.' आता तेहतीस वर्षांच्या तेहतीस टक्के म्हणजे दहा संमेलनं तरी झालीत. यावरत परत ती सहभागी महिला म्हणते. 'नाही हो! तेहतीस टक्के म्हणजेही खूप झाले. एवढीही अध्यक्षपदं महिलांना देणार नाहीत. हे खूपच झाले.' यावर परत राजकारणी म्हणतो, 'ठीक आहे आपण संयोजकांना सांगूया की, पुढच्या तेहतीस वर्षांत किमान तीन महिलांना तरी अध्यक्ष केलं जावं.' मग महिला म्हणते, 'हं. आता तरी ठीक आहे.' आता तेहतीस वर्षांत तीन महिला अध्यक्ष केल्या गेल्या तर टक्केवारी काय झाली? आणि या पूर्वीच्या संमेलनाची टक्केवारी किती झाली? तर नगण्य!

८३ व्या अ.भा. साहित्यसंमेलनात महत्त्वाचे वैचारिक परिसंवाद झाले. त्यापैकी 'अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक दबाव', 'साहित्यसंस्था आणि काळानुरूप अपेक्षित बदल', 'माध्यम तंत्रज्ञान आणि मराठी भाषा' तसेच 'महाराष्ट्रात मराठी भाषेचा वापर करण्याची सक्ती करणे ही काळाची गरज आहे,' या चारही परिसंवादात एकही स्त्री बोलायला नव्हती. त्यामुळे स्त्री तिखटमीठापुरतीच विचार करू शकते असे एकविसाव्या शतकातही सर्वांना वाटते की काय, असे वाटत राहिले.

मी व माझी वयोवृद्ध आई आम्ही संपूर्ण संमेलनात हजर

होतो. संमेलनात जिथे संधी मिळाली तिथे स्त्रियांनी त्या संधीचे सोने केल्याचे दिसत होते. फक्त दोन कार्यक्रमांत स्त्रियांचा सहभाग पन्नास टक्के होता. ते कार्यक्रम म्हणजे 'कथाकथन' व 'सातासमुद्रापलीकडील मराठी लेखन' त्यामुळे सातासमुद्रापलीकडे कदाचित स्त्रियांना जास्त मोकळीक व सन्मान मिळत असावा, असे वाटले. कथा तर काय त्या उत्तम सांगू शकतातच, पण त्याव्यतिरिक्त फक्त एकाच परिसंवादाचे अध्यक्षपद एका स्त्रीला भूषवायला मिळाले होते आणि समारोपात ज्येष्ठ लेखिका ज्योत्स्ना देवधर यांचा सत्कार केला गेला होता, शिवाय मेघना पेठे यांची स्वतंत्र मुलाखत ठेवली होती पण ती मुलाखत घ्यायला पण एक स्त्रीच होती. जणू तुमचं तुम्ही बघागत! 'मराठी साहित्यातील नवे भान! नव्या वाटा' हा परिसंवाद मी संपूर्ण ऐकला. अर्थात इथेही बोलणारे सगळे पुरुषच होते, पण नवल म्हणजे चुकूनही कोणी स्त्रीलेखिकांना नवे भान आल्याचा उल्लेख केला नाही अथवा लेखिकांच्या साहित्याचा नामोल्लेख अथवा आढावा घेतला नाही. फक्त प्रा. राजेंद्र दास यांनी तेवढा ओझरता स्त्रीवादी साहित्याचा उल्लेख, लेखिकांच्या काही नावांसकट केला होता.

रसिक महिलांचा मात्र संमेलनाला भरपूर प्रतिसाद होता. अगदी संमेलन लेकुरवाळे वाटावे इतपत! बऱ्याच महिलांनी चिल्लीपिल्ली घेऊन हजेरी लावली होती. आपल्या मुलांना साहित्याची गोडी लावण्याचा त्यांचा प्रयत्न वाखाणण्याजोगा होता. काही वेळा तर ही संख्या पुरुषांपेक्षाही जास्तच होती. स्वयंसेवकांचे काम स्त्रिया मन:पूर्वक करत होत्या. उद्‌घाटन-समारोपाच्या कार्यक्रमात मराठमोळ्या पारंपरिक वेषात सजलेल्या तरुणी उठून दिसत होत्या.

त्या वर्षीचे संमेलनाध्यक्ष द.भि. कुलकर्णी यांच्या एका पुस्तकाचे नाव 'पस्तुरी' आहे. पस्तुरी म्हणजे माप झाल्यावर थोडे जास्तीचे देणे. पूर्वी जेव्हा तराजूंचा प्रघात नव्हता तेव्हा माप करण्यासाठी शेर, पायली, पोहरा, अशी धातूंची भांडीवजा साधनं वापरली जायची. ही साधनं शिगोशिग भरून वर चार-पाच मुठी तशाच टाकल्या जायच्या कारण शिग लेकुरवाळीची असते असा लोकसमज होता. त्यामुळे माप शिगोशिग भरून वर टाकलेल्या मुठी या आपले घरही नांदते राहावे व दुसऱ्याचेही नांदते राहावे याअर्थी होत्या. त्यातून सर्व प्रकारची समृद्धी अपेक्षित होती. त्याअर्थी संमेलन महिलांच्या प्रतिसादाने शिगोशिग होते. तर असे हे चित्र ८३व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे! आज ९० वे साहित्य संमेलन येऊन ठेपले पण या चित्रात काही फारसा बदल झाला आहे असे वाटत नाही.

वृत्तपत्रांमधून, मासिकांतून-नियतकालिकांतून स्त्रिया सतत लिहीत आहेत आणि वाचकांकडून त्यांचे लेखन वाचलेही जात आहे. वृत्तपत्रीय लेखनातले किंवा दिवाळी अंक-मासिकांतले स्त्रियांचे स्थान उठून दिसावे असे आहे. त्यांनी स्वत:चा वाचकवर्ग निश्चितच तयार केला आहे अन्यथा त्यांचे लेखन छापलेच गेले नसते पण साहित्य संमेलनांमधून मग स्त्रियांना नगण्य स्थान का मिळावे? मतदारांची यादी जरी पाहिली तरी त्यात महिला मतदारांचे प्रमाण किती आहे? मी जेव्हा निवडणुकीला उभी होते (२०१२) तेव्हा मतदारांच्या यादीत महिला मतदारांचे प्रमाण जेमतेम दोन टक्के होते, जर त्या यादीत निम्म्या मतदार स्त्रिया असत्या तर मीही जिंकून आले असते. त्यामानाने मग राजकारणातले चित्र तरी खूप बरे म्हणायचे.

राजकीय क्षेत्रात आज महिला आरक्षण आहे पण साहित्य संमेलनाबाबतचे चित्र मात्र महिलांबाबत अन्यायकारकच म्हटले पाहिजे. मला व्यक्तिश: अतिशय विदारक अनुभव आला. त्यावेळी महामंडळाचे अध्यक्षपद एका स्त्रीकडेच होते. या कार्यकालात तरी एक महिला अध्यक्ष व्हावी? पण असे घडू शकले नाही.

डॉ. नागनाथ कोतापल्ले अध्यक्ष असताना शरद पवार यांनी उद्‌घाटक म्हणून भाषण करताना महिला संमेलनाध्यक्षांचा मुद्दा उपस्थित केला होता. आम्ही राजकारणात तरी ३३ टक्के आरक्षण महिलांना दिले आहे, असे विधान त्यांनी केल्याचे आठवते आहे.

कितीतरी विद्वान-विदुषी आज महाराष्ट्रात आहेत पण साहित्य संमेलनात शोभेपुरताच स्त्रियांचा सहभाग घेतला जातो. आयोजक पद्धतशीर आखणी करण्यास यशस्वी होतात मग स्त्रियांबाबत समतोलाने का विचार केला जात नाही? राजकारणाच्या क्षेत्रात स्त्रियांना उठून खुर्ची देणे त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करणे असे चित्र आज दिसू लागले आहे पण लेखिकांच्या बाबतीत साहित्यक्षेत्रात आजही टिंगलटवाळीचा सूर दिसतो. लेखिका अध्यक्षपदासाठी उभी राहिली की तिच्या लायकीबद्दल प्रश्न उपस्थित केले जातात पण सुमार दर्जाचे लेखक निवडून येऊन संमेलनाध्यक्ष म्हणून मिरवतात. लेखिकांच्याच बाबतीत मग कसोटी कशासाठी? लेखकांची दृष्टी अजून बदलत नाही. पुरुषी संस्कृतीचा वरचष्मा जर लेखक आजही मिरवत असतील तर हे त्यांना शोभते असे वाटत नाही.

**डॉ. प्रतिमा इंगोले**
भ्रमणध्वनी : ९८५०११७९६९

॥ग्रंथाली॥॥

पोहायला शिकण्यापूर्वीचं पाणी कविता
ज्ञानदा
**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५०**

# लढाईत तयारीने उतरायला हवे!

डॉ. अस्मिता गुरव

साहित्यसंमेलनाध्यक्षपदी स्त्रियांची निवड होण्याइतक्या स्त्रिया बुद्धिमान नाहीत का? स्त्रियांचे साहित्यिक योगदान पुरेसे नाही का? किंवा नाण्याची दुसरी बाजू म्हणून संमेलनाध्यक्ष पद भूषविलेले सर्वच पुरुष साहित्यिक बुद्धिमान होते असा दावा आहे का? आणि त्यांची निवड ही केवळ साहित्यिक योगदानावरून झालेली आहे का?

अखिल भारतीय साहित्य संमेलनाला फार मोठी परंपरा आहे. १८७८ मध्ये महादेव गोविंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात पहिले अ.भा. साहित्य संमेलन संपन्न झाले. त्यानंतर १८८५ ला दुसरे, १९०५ मध्ये तिसरे संमेलन झाले. अधेमधे काही वर्षं वगळता संमेलनं होत राहिली. १९८८ नंतर मात्र सलग आजपावेतो संमेलने होताहेत. संमेलनाचा उद्देश लिहिणारे हात आणि सृजनशील मने एकत्र येऊन संमेलनाच्या व्यासपीठावरून वैचारिक आदान-प्रदान व्हावे असा असला तरी काळानुसार त्यात बदल होत आहेत आणि काळाची गरज म्हणून ते बदल स्वीकारलेही जात आहेत. अर्थात हे बदल ही गरज काळाची की माणसाची असा प्रश्न आता उरलेला नाही कारण काळाच्या ओघात बदलत जाणाऱ्या माणसाची ती गरज आहे हे आता स्पष्टच आहे.

साहित्य संमेलनात अध्यक्षीय निवडणूक हवी-नको ही चर्चा संमेलन जवळ आलं की होतेच. अध्यक्षाची निवडणूक नको तर सन्माननीय नियुक्ती असावी असं म्हणणारे काही असतात तर निवडणूकप्रक्रियेला सामोरं जाऊन निवडून येणं हेही सन्मानाचेच आहे असं म्हणणाऱ्यांचा जमावही आहेच. दिवसेंदिवस संमेलनाचे बदलत असलेले रूप, प्रसारमाध्यमांची रेलचेल आणि एकंदर झगमगाट, संमेलनात राजकीय अधिपत्य असावे-नसावे, शासकीय मदतीची आकडेवारी अशा एक ना अनेक प्रकाराने संमेलने होण्यापूर्वी आणि झाल्यानंतर त्या विषयीच्या बातम्या-चर्चा सुरू राहणं हेदेखील गेल्या काही वर्षांपासून आपल्याला सवयीचं झालं. २०१७ या वर्षातलं संमेलन हे नव्वदावे संमेलन आहे. ९० वर्षांचा इतिहास पाहिला तर केवळ चार वेळा संमेलनाध्यक्षपद स्त्रीसाहित्यिकांनी भूषवलेले आहे. महाराष्ट्र हे वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ राज्य आहे. इथे स्त्रियांच्या विद्वत्तेचा आदर केला जातो. स्त्रियांना सन्मानाची समान वागणूक आहे असं म्हटलं जात असेल तर साहित्यसंमेलनासारख्या वैचारिक, सृजनशील क्षेत्र म्हणून ओळखले जात असलेल्या क्षेत्रातली ही आकडेवारी काय दर्शवते? याचा वेध घेताना अनेक बाबी समोर येतात.

साहित्यसंमेलन हे साहित्य महामंडळाचे अधिवेशन मानले जाते. साहित्यमहामंडळाच्या विभागीय परिषदेचा सदस्य हा मतदार असतो आणि तो साहित्यिक असेलच किंवा असावा असे बंधनकारक नसते-नाही. साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीच्या स्थायी सदस्याच्या ओळखी-पाळखींची, प्राध्यापक, मुद्रक, प्रकाशक, प्रतिष्ठित मंडळी ही मतदार असतात. त्यातल्या त्यात प्रकाशक-मुद्रक हा घटक तरी साहित्याशी संबंधित आहे पण प्राध्यापक आणि (सो-कॉल्ड) प्रतिष्ठित व्यक्ती मतदार असणं आणि त्यांनी साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिकाची निवड करणं हे म्हणजे राजकारणासारखी 'मतदार लॉबी' प्रकाराला प्रोत्साहन देणारी बाब असल्याने निवडणुकीची प्रक्रिया 'मोर्चेबांधणी' प्रकारावर आधारित होणंही साहजिकच आहे.

साहित्यसंमेलनाध्यक्षपदी स्त्रियांची निवड होण्याइतक्या स्त्रिया बुद्धिमान नाहीत का? स्त्रियांचे साहित्यिक योगदान पुरेसे नाही का? किंवा नाण्याची दुसरी बाजू म्हणून संमेलनाध्यक्ष पद भूषविलेले सर्वच पुरुष साहित्यिक बुद्धिमान होते असा दावा आहे का? आणि त्यांची निवड ही केवळ साहित्यिक योगदानावरून झालेली आहे का?

या प्रश्नांची उत्तरे 'हो' किंवा 'नाही' अशा स्वरूपाची देता येणार नाही कारण महामंडळाने साहित्यसंमेलन हे अधिवेशन असल्याचं गृहीत धरलं तेव्हा त्यात गट-तट, चढ-वरचढ आणि निवड-नावड प्रतिक्रिया आलीच. निवडणूक म्हटलं की, संपर्क साधणं-वाढवणंही आलेच. साहित्यिकांचा साहित्यिकांशी संपर्क पुरेसा नाही तर मतदार असणाऱ्या व्यक्तीशी संपर्क असणं अधिक महत्त्वाचा आहे. साहित्यिक क्षेत्रात जरी तुम्ही लोकप्रिय असला तरी साहित्यिक हा मतदार असणं अधिक गरजेचं आहे आणि बहुतांश साहित्यिक मतदार नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

साहित्य महामंडळाची मतदार संख्या हजारच्या पुढे असली तरी त्यात स्त्रीमतदारांची संख्या किती? स्त्री उमेदवारांना का प्राधान्य दिले जात नाही? मोर्चेबांधणी म्हणजे काय? त्यात कोण, कसे यशस्वी होतात हा सगळा भाग आहेच. शिवाय

प्रादेशिक अस्मितेला आवाहन हाही एक मुद्दा असतोच या प्रक्रियेत.

१९६१ मध्ये कुसुमावती देशपांडे, १९७५ मध्ये दुर्गाबाई भागवत, १९९६ मध्ये शांताबाई शेळके आणि २००१ मध्ये विजया राजाध्यक्ष या अनुक्रमे ग्वाल्हेर, कऱ्हाड, आळंदी आणि इंदूरच्या संमेलनाध्यक्षपदी निवड झालेल्या संमेलनाध्यक्ष! या स्त्री-साहित्यिकांव्यतिरिक्त आजवर कुणी प्रयत्नच केले नाहीत असं नाही. १९९२ मध्ये कोल्हापूर येथे झालेल्या संमेलनाकरिता ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत यांनी आपली उमेदवारी दाखल केली होती. इंदिराबाईंचं म्हणणं असं होतं की, 'जर माझी कविता लोकांपर्यंत पोहचली असेल तर लोक माझी निवड करतील; मी कविता लिहीन. कुणालाही मला मत द्या म्हणून पत्र लिहून विनंती करणार नाही'... या उलट रमेश मंत्री यांनी संपर्क-संबंधांना आवाहन करून, भेटीगाठी घेऊन ही निवडणूक जिंकली आणि इंदिरा संतांना पराभव पत्करावा लागला. २००८ मध्ये म.द. हातकलंगणेकरांच्या विरोधात उमेदवारी दाखल केलेल्या डॉ. मीना प्रभू यांनाही पराभव पत्करावा लागला. २०१२ मध्ये डॉ. प्रतिमा इंगोले यांचा पराभव करून निवडून आलेल्या वसंत आबाजी डहाके यांनी त्यापूर्वीच्या आपल्या पराभवाची चिकित्सा करून, अभ्यासपूर्ण नियोजन करून ती निवडणूक जिंकली होती. निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिक-उणे समजून घेऊन ते पुन्हा तयारीनिशी उभे राहिले होते. फ.मु. शिंदे यांनी देखील निवडणुकीला उभं राहण्यापूर्वी दोन-तीन वर्ष संपूर्ण महाराष्ट्रात संपर्क ठेवत आपल्या उमेदवारीची यशस्वी मोर्चेबांधणी करूनच आपली उमेदवारी दाखल केली आणि ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांचा पराभव करून निवडणूक जिंकली.

स्त्रियांना संधी दिली जात नाही, स्त्रियांवर अन्याय होतो आहे वगैरे कोणतीही स्त्रीवादी भूमिका मी मांडावी किंवा स्त्रियांच्या बाजूने काही लिहावे-सांगावे अशासाठी हा लेखप्रपंच नाही. फक्त साहित्यक्षेत्र हे प्रगल्भ वैचारिकतेचा-संस्कृतीचा वारसा सांगणारे क्षेत्र असले तरी त्यातही सन्माननीय पदांपासून स्त्री कशी आणि का वंचित राहतेय, त्या निवडणूकप्रक्रियेचा आणि त्या अनुषंगाने येत असलेल्या मानसिकतेची वस्तुनिष्ठ बाजू समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे.

'निवडणूक' मग ती साहित्यक्षेत्रातील असली तरीही ती निवडणूक राजकीय रंग लेवूनच येते. तिचे काही आराखडे असतात, त्यातही गट-तट, आपला-तुपला, चढ-वरचढ असतेच. वाङ्मयीन निकष हे इथल्या निवडणुकीतही दुय्यमच ठरतात. वेळ आणि आर्थिक अपव्यय नाकारता येणारा नसतोच म्हणून कित्येक साहित्यिकांचं म्हणणं हे सगळं करण्याऐवजी मी लेखनात प्रयोग करण्याला प्राधान्य देईन. कवी विंदा करंदीकरांनी तर ''मी या वादात कधीच उतरणार नाही, याकरिता मला कुठल्याही साहित्यिक निवडणुकीच्या जवळही फिरकायचं नाही'' असं एका मुलाखतीत म्हटलं होतं. पुरुषी वर्चस्ववाद, मानहानी आणि तीव्र विरोधाच्या समोर उभं रहाणं हे स्त्रियांना त्रासदायक असल्याने नको वाटतं. याला साहित्यक्षेत्रही अपवाद नाही.

मराठी साहित्याला प्राचीन परंपरा आहे असा आपण गौरवानं उल्लेख आपण करतो. संतसाहित्यातही स्त्रीसंतांची कामगिरी, सामाजिक जाण, प्रापंचिक भान आणि प्रबोधनाची कास त्यांच्या साहित्यिक योगदानातून दिसून येते. अलीकडे साठोत्तरी, नव्वदोत्तरी काळाचा आढावा घेतला तरी स्त्री-साहित्यिकांची ठळक नोंद आढळतेच. विषयांचे वैविध्य आणि आशयसंपन्न कलाकृती स्त्रीसाहित्यिकांनी समर्थपणे हाताळल्याचे दिसून येते आणि व्यासपीठावरील मुद्देसूद चर्चेतही स्त्रिया अग्रेसर असल्याचे दिसून येते. मग तरीही सन्माननीय पदांपासून स्त्रिया दूर का? या प्रश्नाला अनेकविध कंगोरे आहेत.

एकतर मुळात या पदापर्यंत पोहचण्याच्या प्रक्रियेकडे उदासीनतेने बघण्याची मानसिकता. आपण साहित्यिक म्हणून प्रतिष्ठा मिळवलीय, लौकिक मिळवलाय पण निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याची, त्यातले डावपेच लढण्याची आणि अध्यक्षपद मिळविण्याची पात्रता सिद्ध करण्याची तयारी स्त्रियांची असते का? आणि जरी तयारी दाखवली तरी त्या लढतीत पराभव झाला तर त्या पराभवाची तटस्थ चिकित्सा करण्याऐवजी आपल्या पराभवाचे खापर इतरांवर फोडण्याचा प्रयत्न होत असल्याचा इतिहास नेमके काय सांगतो? निवडणुकीत उमेदवारी दाखल केलेल्या इंदिराबाईंनी, ''मी व्यक्तिगत संपर्क करून मतदारांना विनंती-आवाहन करण्याचा प्रयत्न करणार नाही. मतदार मला, माझ्या कवितेला जाणत असतील तर ते मला निवडून देतील.'' असे म्हणणे तात्त्विकदृष्ट्या कितीही सयुक्तिक असले तरी मुळात साहित्य महामंडळाच्या मतदार सदस्यांत किती मतदार हे साहित्यिक आहेत आणि किती मतदारांना साहित्यिक जाण आहे हा संशोधनाचा विषय आहे. उपलब्ध असलेल्या अधिकृत मतदारांकडून मतं मिळवायची असतील तर इंदिराबाईंची भूमिका योग्य आहे असे कसे म्हणता येईल? त्यांच्या भूमिकेने निकाल त्यांच्या विरोधात जाण्याची वस्तुस्थिती आपण पाहिली. कवयित्री म्हणून इंदिराबाईंचे योगदान निर्विवाद असले तरी उमेदवारी दाखल केल्यानंतर केवळ त्यावर विसंबून राहण्याऐवजी स्त्रियांनी या लढाईत तयारीने उतरायला हवे होते असे वाटल्यावाचून रहात नाही. निवडणूक नको म्हणणाऱ्या स्त्रीसाहित्यिकांनी 'हा काही आपला प्रांत नाही' असं म्हणून महामंडळाच्या वर्षानुवर्ष चालू असलेल्या प्रथा-प्रक्रियेला कुठेही आडकाठी न करणे ही मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. अधिकृत पद्धतीने लढून त्या पदावर नियुक्त झाल्यानंतर आदर्शवादी प्रक्रिया राबविणारे नियम करून, ते पाळले जातील अशी भूमिका घेऊन काम करायचे ठरविले तशी पावलं उचलली तर हळूहळू या प्रक्रियेत बदल घडवून आणणं सहज सोपं नसलं तरी अगदीच अवघड नाही. स्त्रियांच्या वैचारिकतेत काळानुरूप बदल होत आहे. साहित्यकृतीत बदल होताहेत ते आपण पाहतो आहोत. अभिव्यक्तीत स्पष्टता, निर्भीडता आली आहे-येत आहे. तशीच साहित्यक्षेत्रात सन्माननीय पद मिळविण्यासाठी पात्रता ही लढून सिद्ध करण्याची जिद्द ठेवली तर त्यात नियोजन, आखणी करून त्यातही त्या यश मिळवू शकतात हा आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा या दोन बाबींपासून स्त्रियांनी दूर न जाता प्रयत्न केला तर काहीही अवघड नाही.

**- डॉ. अस्मिता गुरव**
भ्रमणध्वनी : ९९२२४३८४९९
asmita.gurav@gmail.com

# साहित्यसंमेलन आणि प्रसारमाध्यमे

**विजय चोरमारे**

> **साहित्यसंमेलनाचे वार्तांकन करणारा वार्ताहर हा चांगला वाचक असण्याची पहिली अट असायला हवी. त्याने साहित्यातील वेगवेगळे प्रवाह समजून घ्यायला हवेत. एकदा साहित्यात रस घेतला की हे सगळे आपोआप घडत जाते परंतु त्यासाठीची इच्छाशक्ती दाखवायला हवी. सव्वाशेहून अधिक वर्षांची परंपरा असलेल्या साहित्यसंमेलनाचे वृत्तांकन करताना प्रसारमाध्यमांनी अधिक गंभीर असायला हवे.**

अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे वारे वाहू लागले, की प्रसारमाध्यमांतून त्याच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागतात. पूर्वी वृत्तपत्र हेच एकमेव माध्यम होते. महाराष्ट्र टाइम्स आणि लोकसत्ता ही दोनच राज्यपातळीवरील वृत्तपत्रे होती. त्यातही पुन्हा महाराष्ट्र टाइम्स हे साहित्य-संस्कृतीविषयक बातम्यांना प्राधान्य देणारे प्रमुख दैनिक होते. तिथं साहित्यविषयक घडामोडींचं आकलन असणारी मंडळी असावीत, असं बातम्यांवरून जाणवायचं. साहित्यसंमेलनासंदर्भातील घडामोडी त्यामुळं नीटपणे कळायच्या. किंबहुना साहित्यविषयक घडामोडी समजून घेण्यासाठी महाराष्ट्र टाइम्स हाच एकमेव मार्ग असायचा. आवृत्त्यांचा पसारा नसल्यामुळं महाराष्ट्र टाइम्स किंवा लोकसत्तामध्ये आलेली बातमी त्या त्या क्षेत्रात रस असलेल्या लोकांपर्यंत राज्यभर पोहोचायची. बाकीच्या वृत्तपत्रांचं तसं नव्हतं. सकाळ, लोकमत यांसारख्या वृत्तपत्रांच्या एका आवृत्तीत आलेली बातमी दुसऱ्या आवृत्तीत येईलच असं नसायचं. त्यामुळं ती बातमी त्या त्या आवृत्तीच्या कक्षेपुरतीच राहायची. हळूहळू लोकसत्ताच्या आवृत्त्या प्रसिद्ध होऊ लागल्या. महाराष्ट्र टाइम्सच्याही आवृत्त्यांचा पसारा वाढू लागला. त्यामुळं एक बातमी संपूर्ण राज्यभर पोहोचण्याचे सगळे मार्ग बंद झाले. महत्त्वाची, पहिल्या पानाच्या योग्यतेची असेल तेवढीच बातमी राज्यभर जाऊ लागली. उदाहरणार्थ, संमेलनाध्यक्षांची निवड, संमेलनाचा उद्घाटन समारंभ वगैरे.

नंतर नंतर इलेक्ट्रॉनिक माध्यमं आली. वृत्तवाहिन्या वाढू लागल्या. वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून साहित्यसंमेलनाच्या बातम्यांना राज्यभर, देशभर, जगभर प्रसिद्धी मिळू लागली. वृत्तपत्रांच्या इंटरनेट आवृत्त्यांमुळेही बातम्या जगभर पोहोचू लागल्या. आवृत्त्यांमुळे आलेली प्रादेशिक बंधने ओलांडली गेली. साहित्यसंमेलन म्हणजे लाखाच्या घरात माणसं एकत्र येण्याचं ठिकाण असतं. संमेलनाचे ठिकाण आणि तारीख ठरण्यापासून ते संमेलनाचे सूप वाजेपर्यंत अनेक घटना-घडामोडी-मानापमान नाट्ये घडू लागली. राजकारण्यांच्या सहभागावरून चर्चा झडू लागल्या. या सगळ्यामध्ये वार्तामूल्य असल्यामुळं साहित्यसंमेलनां-संदर्भातील बातम्यांना जास्त प्रसिद्धी मिळू लागली. वृत्तवाहिन्यांच्या गरजा वेगळ्या असल्यामुळं वाद-विवादांना महत्त्व मिळू लागलं. त्यावर सवाल-जवाब रंगू लागले. एरव्ही पुस्तकांच्या किंवा साहित्याच्या वाऱ्यालाही न फिरकणारी मंडळी साहित्य-संमेलनावरील चर्चेत रस घेऊ लागली. वृत्तवाहिन्यांवरील वेळ साहित्य संमेलनाच्या बातम्यांनी व्यापला, वृत्तपत्रांमधील जागा वाढली तरीसुद्धा हे कव्हरेज समाधानकारक होते असे म्हणणे धाडसाचे ठरेल कारण संबंधित घटना-घडामोडींच्या बातम्या चटपटीत स्वरूपात प्रसिद्ध होत होत्या, परंतु त्यात संबंधित वार्ताहरांचे, उपसंपादकांचे आकलन अभावानेच दिसत होते. अधिक चांगले कव्हरेज आणि अधिक आकर्षक मांडणी यापलीकडे साहित्यसंमेलनाचे वृत्तांकन गेले नाही. दुर्दैवाने आजही तीच परिस्थिती आहे.

प्रत्यक्ष साहित्यसंमेलन सुरू झाल्यानंतरही वृत्तपत्रे भरपूर कव्हरेज देऊ लागली. स्थानिक पातळीवर तर रोज चार-पाच पाने साहित्यसंमेलनाच्या बातम्यांसाठी दिली जाऊ लागली. अन्य ठिकाणीही एक-दोन पाने ठरलेली असतात. एरव्ही राजकारण किंवा गुन्हेगारीविषयक बातम्या प्राधान्याने प्रसिद्ध करणारी वृत्तपत्रे साहित्यसंमेलनाच्या बातम्यांना भरपूर जागा देऊ लागली, ही चांगली गोष्ट म्हणवयास हवी, परंतु केवळ भरपूर मजकूर आणि आकर्षक मांडणी एवढ्यापुरतीच त्याची मर्यादा राहिली. साहित्यविषयक समज असलेल्या कोणत्याही व्यक्तीला हे कव्हरेज कधी समाधान देत नाही. साहित्यसंमेलनाच्याच नव्हे, तर साहित्यविषयक अन्य कोणत्याही समारंभांच्या ज्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होतात त्या वाचल्या, तर अशी प्रसिद्धी नसती मिळाली तर बरे, असे म्हणण्याची वेळ येते कारण समारंभ कितीही महत्त्वाचा आणि गंभीर असला तरी त्यातले एक शतांश गांभीर्य

किंवा आकलन त्या बातमीत उतरलेले नसते. प्रमुख पाहुणा किंवा अध्यक्षस्थानावरील व्यक्तीने बोललेले शीर्षक देण्याजोगे एखादे वाक्य मिळाले, की तेवढ्यावरच संबंधित वार्ताहराचे काम भागते. त्या वाक्याला पूरक चार ओळी पुढे मजकुरात जोडल्या जातात आणि असाच काहीसा उपस्थितांच्या नावांचा वगैरे भरताड मजकूर भरून बातम्या आटोपल्या जातात. ज्यांच्याशी संबंधित बातमी असेल त्यांनी आपल्या कार्यक्रमाचा फोटो पाहून समाधान मानायचे. केवळ साहित्यविषयकच नव्हे, तर संगीत, नाटक अशा अन्य क्षेत्रांबाबतही फारसा वेगळा अनुभव नसतो. 'रसिक मंत्रमुग्ध' म्हटले की बातमी लिहिणाऱ्यालाही समाधान वाटते आणि संबंधित कलावंतालाही भरून पावल्यासारखे वाटते.

हे घडण्यामागचे कारण म्हणजे, आपण ज्या क्षेत्रात काम करतोय त्यासंदर्भात काहीही नीटपणे जाणून घेण्याचा प्रयत्न न करणे. त्यासंदर्भातील काहीएक न वाचणे. त्याचमुळे मग डॉ. श्रीपाल सबनीस यांचे नाव आम्ही ऐकलेले नाही, डॉ. अक्षयकुमार काळे यांचे काही वाचलेले नाही अशी शेरेबाजी केली जाते. साहित्याच्या क्षेत्रात ललित साहित्याच्या वाचकांनी समीक्षकांचे, विचारवंतांचे काही वाचले नसण्याची शक्यता असू शकते. ते वाचले असण्याचा आग्रहही योग्य नव्हे, परंतु किमानपक्षी नावे कानावरून जायला हरकत नसावी. साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या आसाराम लोमटे यांचे काही वाचले आहे का, या प्रश्नाचे उत्तरही अनेकांकडून नकारार्थी येते. त्यांचे नाव ऐकलेले असते, त्यांनी वृत्तपत्रांतून लिहिलेले वाचलेले असते, परंतु त्यांच्या पुस्तकांपर्यंत पोहोचता आलेले नसते. काहीतरी लंगड्या सबबी सांगून आपले अज्ञान लपवले जाते. पट्टीच्या वाचकानेही काही महत्त्वाच्या लेखकांचे साहित्य वाचले नसण्याची शक्यता असू शकते परंतु साहित्य अकादमीसारखा पुरस्कार मिळाल्यानंतर तरी त्या पुस्तकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. वाचकांचे दूर राहिले, प्रसारमाध्यमातून साहित्य-संस्कृती बीट सांभाळणारे किती लोक त्यादृष्टीने प्रयत्न करतात, हे समजून घेण्याचा प्रयत्न केला तर घोर निराशा पदरी येईल.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षनिवडीच्या बातम्या देताना अनेकदा माध्यमांचे अज्ञान प्रकट होत असते. 'अभ्यासोनि प्रकटावे' अशी भूमिका कुणीच घेत नाही. त्यामुळेच मग अध्यक्षाची निवड सन्मानाने व्हावी, ज्येष्ठ साहित्यिकाला मानाने पद द्यावे, राजकारणी लोकांना व्यासपीठावर स्थान देऊ नये, अध्यक्ष निवडणुकीत वाद नकोत, तरुणांना अध्यक्षनिवडीत संधी द्यावी अशा प्रकारचा भाबडेपणा माध्यमातून व्यक्त होत असतो. त्याला काहीएक अर्थ नसतो, कारण अध्यक्षनिवडीची म्हणून एक प्रक्रिया असते. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ नावाची संस्था आहे. तिच्या घटकसंस्था, समाविष्ट संस्था आहेत. त्यांचे सदस्य अध्यक्षनिवडीसाठी मतदान करतात. या सगळ्या प्रक्रियेची प्राथमिक माहिती घेण्याचा प्रयत्नही फारसे कुणी करत नाही. वर्षानुवर्षे साहित्यसंमेलने आणि अध्यक्षनिवड होत असली तरी ते समजून घेण्याचा प्रयत्न फारसे कुणी करीत नाही.

साहित्य क्षेत्रात रस असणारा एखादा तरी माणूस प्रत्येक वृत्तपत्रात, वृत्तवाहिनीमध्ये असतो. तो वार्ताहर असेल किंवा वरिष्ठ पातळीवर असेल. अशा बातम्यांच्यावेळी संबंधिताकडे जबाबदारी सोपवली तर त्यातल्या त्यात निर्दोष वृत्तांकन होऊ शकते, परंतु तेवढेही केले जात नाही. त्यामुळे वार्ताहर त्याच्या आकलनानुसार जे देईल ते प्रसिद्ध होते. त्यामुळे वृत्तांकनाचा गोंधळ मागील पानावरून पुढे सुरू असतो.

वार्ताहराने भरपूर मजकूर आणि जास्तीत जास्त बातम्या देणे अपेक्षित असते. त्या मजकुराच्या गुणवत्तेशी कुणालाच देणेघेणे नसते. अपवाद वगळता अनेक संपादकांनाही त्याच्याशी देणेघेणे नसते. त्यामुळे मग साहित्यविषयक मूलभूत काहीच येत नाही. ज्या विषयातली काडीचीही अक्कल नसते त्या विषयावर संबंधित वार्ताहर रेटून कॉमेंट करीत असतात. अमके ठाकरे संमेलनात आले, मुख्यमंत्री उशिरा पोहोचले, जेवणाच्या मंडपात अचानक गर्दी झाली, कविसंमेलनासाठी नवोदित कवींची रांग लागली अशा प्रकारच्या बातम्या दिल्या जातात. संमेलनाच्या आवारात जे घडत असते त्या प्रत्येक गोष्टीला वार्तामूल्य असते, त्यामुळे या घडामोडी आवश्यकच असतात, परंतु संमेलनाच्या दृष्टीने त्या क्षुल्लक आणि बिनमहत्त्वाच्या असतात. तरीही वार्ताहरांच्या आकलनाच्या मर्यादामुळे त्याच प्रमुख बातम्या बनतात.

दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणे ही सोपी गोष्ट नसते. दोन-तीनशेची क्षमता असलेल्या छोट्याशा सभागृहात कार्यक्रम आयोजित करायचा म्हटले तरी त्यासाठी किती यातायात करावी लागते, हे संबंधित आयोजकांनाच ठाऊक असते. एखाद्या कुटुंबाकडे त्यांच्या संपूर्ण आयुष्यात एखादाच लग्नसमारंभ असतो. पाचशेपासून पाच हजारापर्यंत पत्रिका असलेला हा समारंभ निभावता निभावता संबंधितांची पार तंतरून जात असते. अशा काही गोष्टींचा विचार केला, तर दोन-तीनशे निमंत्रित पाहुणे, शे-दीडशे प्रकाशक आणि लाखभर लोक जिथे जमत असतात अशा साहित्य संमेलनाचे दरवर्षी आयोजन करणे ही छोटी गोष्ट नसते. गेली पंधरा-सोळा वर्षे संमेलनाचा पसारा खूपच वाढला आहे. संमेलनाची जबाबदारी घेणारी स्थानिक संस्था असते आणि तिथले लोक सगळी तयारी पाहात असतात, हे खरे असले तरीही महामंडळाला सगळ्यावर देखरेख ठेवावी लागत असते. स्थळ निश्चित करण्यापासून संमेलन पार पडेपर्यंतच्या सगळ्याची रूपरेषा ठरवून ते पार पडेपर्यंतची जबाबदारी असते. स्थानिक संयोजक, निमंत्रित साहित्यिकांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंतचे सगळे मान-पान सांभाळावे लागते. या सगळ्याची नोंद प्रसारमाध्यमे कधीच घेताना दिसत नाहीत. किमान सहा महिने तयारी सुरू असलेले तीन दिवसांचे भव्य संमेलन पार पाडूनही चार कौतुकाचे शब्द लिहिले-बोलले जात नाहीत. उलट आयोजनातील त्रुटीच जगासमोर मांडल्या जातात.

साहित्य संमेलनातील कार्यक्रम आणि वक्त्यांवरही नेहमीच

टीका होत असते. एक किंवा दोन कविसंमेलने, एक किंवा दोन प्रकट मुलाखती, सत्कार समारंभ, मुलांसाठी एक-दोन कार्यक्रम, सात-आठ परिसंवाद अशी साधारणपणे संमेलनातील कार्यक्रमांची रूपरेषा असते. वीस ते चाळीस कवी आणि इतर चाळीस ते पंचेचाळीस साहित्यिकांनाच संमेलनात संधी देता येते. त्यातही पुन्हा स्वागत समितीने सुचवलेली स्थानिक पातळीवरील काही नावे असतात. मराठीत इतके साहित्यिक, प्राध्यापक, समीक्षक आहेत की एका संमेलनात त्यातल्या काही पूर्णांक साहित्यिकांनाच संधी मिळू शकते. त्यामुळे अनेक महत्त्वाच्या साहित्यिकांना निमंत्रण न मिळाल्याची तक्रार होत असते. संमेलनाच्या मर्यादा लक्षात न घेता त्यावर टीका केली जाते.

साहित्य संमेलनाचे वार्तांकन करणारा वार्ताहर हा चांगला वाचक असण्याची पहिली अट असायला हवी. त्याने साहित्यातील वेगवेगळे प्रवाह समजून घ्यायला हवेत. एकदा साहित्यात रस घेतला की हे सगळे आपोआप घडत जाते परंतु त्यासाठीची इच्छाशक्ती दाखवायला हवी. सव्वाशेहून अधिक वर्षांची परंपरा असलेल्या साहित्य संमेलनाचे वृत्तांकन करताना प्रसारमाध्यमांनी अधिक गंभीर असायला हवे.

न्यायमूर्ती रानडे यांनी ग्रंथकार सभेचे अधिवेशन सुरू केले त्याला १३१ वर्षे झाली. म्हणजे संमेलनाला तेवढ्या वर्षांचा इतिहास आहे आणि या काळात ८९ संमेलने पार पडली आहेत. या वर्षांचा उल्लेख एवढ्यासाठीच की, संमेलन सुरू होऊन बराचसा कालावधी लोटला आहे. ग्रंथकार सभेच्या अधिवेशनाचे निमंत्रण महात्मा जोतीराव फुले यांना देण्यात आले होते. त्यावेळी जोतीरावांनी ग्रंथकार सभेला एक पत्र लिहिले. साहित्य संमेलनाच्या इतिहासात डोकावताना हे पत्र खूप महत्त्वाचे ठरते. हे पत्र आणि त्याची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. हे पत्र वगळले तर साहित्य संमेलनाचा आणि त्याच्या परंपरेचा इतिहास नीटपणे मांडता येणार नाही. ते पत्र असे होते -

*''वि. वि. आपलें ता. १३ माहे मजकूरचें कृपापत्रासोबतचें विनंतिपत्र पावलें. त्यावरून मोठा परमानंद झाला, परंतु माझ्या घालमोड्या दादा, ज्या गृहस्थाकडून एकंदर सर्व मनुष्याच्या मानवी हक्कांविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्याने खुशीनें व उघडपणें देववत नाहींत व चालू वर्तनावरून अनुमान केलें असतां पुढेंही देववणार नाहींत, तसल्या लोकांनी उपस्थित केलेल्या सभांनीं व त्यांनीं केलेल्या पुस्तकांतील भावार्थांशी आमच्या सभांचा व पुस्तकांचा मेळ मिळत नाहीं. कारण त्यांच्या पूर्वजांनी आम्हांवर सूड उगवण्याच्या इराद्यानें, आम्हांस दास केल्याचें प्रकर्ण त्यांनी आपल्या बनावट धर्मपुस्तकांत कृत्रिमानें दडपलें. याविषयी त्यांच्यांतील जुनाट खल्लड ग्रंथ साक्ष देत आहेत. यावरून आम्हां शूद्रादि अतिशूद्रांस काय काय विपत्ती व त्रास सोसावे लागतात, हे त्यांच्यांतील ऊंटावरून शेळ्या वळणाऱ्या ग्रंथकारांस व मोठमोठ्या सभास्थानीं आगांतूक भाषण करणारांस कोठून कळणार? हें सर्व त्यांच्या सार्वजनिक सभेच्या उत्पादकांस जरी पक्के माहीत होतें, तरी त्यांनीं फक्त त्यांच्या व आपल्या मुलाबाळांच्या क्षणिक हिताकरितां डोळ्यावर कातडें ओढून त्याला इंग्रज सरकारांतून पेनशन मिळताच तो पुन: अट्टल जात्याभिमानी, अट्टल मूर्तिपूजक, अट्टल सोवळा बनून आपल्या शूद्रादि अतिशूद्रांस नीच मानूं लागला; व आपल्या पेनशनदात्या सरकारनें बनविलेल्या कागदाच्या नोटीससुद्धा सोवळ्यानें बोट लावण्याचा विटाळ मानूं लागला! अशीच कां शेवटी ते सर्व आर्य ब्राह्मण व हतभाग्य देशाची उन्नती करणार! असो, आता यापुढें आम्ही शूद्र लोक आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहींत. सारांश, यांच्यांत मिसळल्यानें आम्हा शूद्रातिशूद्रांचा काही एक फायदा होणें नाहीं, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणें असेल, तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधूप्रीति काय केल्यानें वाढेल, त्याचें बीज शोधून काढावें व तें पुस्तकाद्वारें प्रसिद्ध करावें. अशा वेळीं डोळे झांकणे उपयोगाचें नाहीं. या उपर त्या सर्वांची मर्जी. हे माझें अभिप्रायादाखल छोटेखानी पत्र त्या मंडळीच्या विचाराकरितां तिजकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. साधे होके बुड्ढेका येह पहिला सलाम लेव.*

*आपला दोस्त*
*जोतीराव गो. फुले''*
*(ज्ञानोदय, ११ जून १९८५)*

साहित्य आणि साहित्य संमेलन हा खूप आनंददायी आणि समृद्ध करणारा प्रदेश आहे. साहित्य संमेलन समजून घेताना या पत्रापासून सुरुवात केली तर पुढचे सगळे सोपे होत जाईल. त्यातला रसही वाढत जाईल.

**- विजय चोरमारे**
भ्रमणध्वनी : ९५९४९९९४५६
vijaychormare@gmail.com

**ग्रंथाली**



**तरंग उदकाचे जग**
**दमयंती भोईर**

**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

या संग्रहाचं नाव 'तरंग उदकाचे अंग', हे संत तुकारामांच्या अभंगातून घेतलं आहे. तरंग उठणे हा पाण्याचा स्वभावच आहे. आणि संवेदनशील मनात तरंग उठणं हा कवीचा स्वभाव आहे. स्त्रीच्या मनात साठलेल्या खळबळीचे स्फोट व्हायला हवेत खरंतर. पण आजही अनेकींच्या मनातली खदखद आत तळाशीच राहते. वरवर दिसतात ते तरंग.

प्रकाशन समारंभ

**११ जानेवारी**

# तीन मुलांचे चार दिवस

आदर्श पाटील
विकास वाळके
श्रीकृष्ण शेवाळे




साधना साप्ताहिकाचा
१५ ऑगस्ट २०१६ चा
विशेषांक आता पुस्तकरूपात

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा
मराठी विभाग व विद्यार्थी
कल्याण मंडळ आणि साधना प्रकाशन
आयोजित प्रकाशन समारंभ

प्रमुख पाहुणे :
मिलिंद बोकील व अतुल पेठे

अध्यक्ष :
वासुदेव गाडे (कुलगुरु)

स्थळ :
नामदेव सभागृह,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
वेळ :
बुधवार, ११ जानेवारी २०१७,
सायंकाळी ४ ते ६



**१५ जानेवारी**

मुलाखत





**महाराष्ट्र फाउंडेशन,**
**मुक्तांगण**
**आणि साधना ट्रस्ट**
**आयोजित**

## पुढे जाण्यासाठी, मागे वळून पाहताना...

डॉ.अनिल अवचट,
डॉ.अभय बंग आणि
डॉ. आनंद नाडकर्णी
हे आजच्या तरुणाईचे तीन आयकॉन
स्वत:विषयी व परस्परांविषयी
बोलणार आहेत...

...या तिघांना बोलते करणार आहेत–
विवेक सावंत

वेळ
रविवार, १५ जानेवारी २०१७,
सायंकाळी ५–३० ते ८

स्थळ
बालगंधर्व रंगमंदिर, पुणे

# साहित्यसंमेलनाविषयी काही प्रश्न

**प्रशांत डिंगणकर**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने यावर्षी डोंबिवलीचे आमंत्रण स्वीकारले आणि माझ्या डोळ्यांसमोर आगरी, कोळी, कुणबी आणि इतर बहुजन वर्गांतील, जाती-धर्मातील वाचकांचे डोंबिवली नावाचे गाव उभे राहिले. पुण्याच्या सदाशिव पेठेतले संमेलन डोंबिवलीपर्यंत आले हे नक्कीच मनाला आनंद देणारे आहे. साहित्यसंमेलन सर्वसमावेशक असावे आणि संमेलनाच्या व्यासपीठावर राजकीय नेत्यांचा वावर असू नये अशा चर्चा मी गेली अनेक वर्षे ऐकतो आहे.

**मराठीतील पु.ल. देशपांडे, वि.वा. शिरवाडकर यांसारख्या अनेकांनी नव्या लिहिणाऱ्यांना उभे केले. आज साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावर बसणारे किती जण हे काम करत आहेत? वास्तववादी जगणाऱ्या नव्या पिढीशी किती जण संवाद साधत आहेत, याचा लेखाजोखा कधीतरी मांडला जाणार आहे की नाही? साधा नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या माणसाकडूनसुद्धा पाच वर्षांचा हिशोब जनता मागते. आता देशाच्या पंतप्रधानालाही हिशोब द्यावाच लागतो मग साहित्य संमेलनाचा अध्यक्षही निवडूनच येत असेल तर त्यानेही आपल्या कामाचा हिशोब का देऊ नये?**

मला असं वाटतं की, 'बेळगावसह महाराष्ट्र झाला पाहिजे!' अशी वैचारिक सिंहगर्जना करणारे साहित्यसंमेलन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरता-फिरता परदेशवारीही करून आले आणि आता मुंबईच्या बरोबरीनं वाढणाऱ्या डोंबिवली-कल्याणसारख्या उपनगरांपर्यंत पोहचू लागले हे सर्वसमावेशकच धोरण आहे, पण ज्या गावात संमेलन होते त्या गावातील ही जत्रा उठल्यानंतर शिल्लक काय राहते, त्या गावातील साहित्यसंस्कृतीला काय मिळते? त्या गावातील माणसांना त्यात किती स्थान राहते? या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. आजपर्यंत जी संमेलने झाली त्या संमेलनाचे यजमानपद भूषवणारी गावे किती साहित्यसमृद्ध झाली याचा शोध कधीतरी घेतला जाण्याची गरज आहे. त्यासोबतच गेली अनेक वर्षे चर्चिला जाणारा राजकीय नेत्यांचा साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावर असणारा वावर हाही विषय कधी कधी साहित्यिकांनी तडीस नेण्याची गरज आहे. नाहीतर मागच्या पिढ्यांकडून पुढच्या पिढ्यांकडे हा विषय वर्षानुवर्षे कॅरी फॉरवर्ड होत राहील. त्यावर चर्चाही होत आहे, पण त्याचे उत्तर अंतिमत: सापडू शकलेले नाही. हे उत्तर नेमके कधी सापडणार याचाही शोध घेण्याची गरज आहे. नव्वद संमेलनं झाल्यानंतर अनेक प्रश्न निरूत्तरित आहेत. त्याचे कारणच हे आहे की, अनेक वेळा या प्रश्नांची उत्तरे नाहीत हे माहीत असतानासुद्धा वर्षानुवर्षे मराठी साहित्याचा व्यवहार ते प्रश्न जात्यावर दळत बसला. मराठी लेखक, कवी, साहित्यिक, संमेलनाचे आयोजक, वाचक, प्रकाशक आणि एकूणच या साहित्य व्यवहाराशी जोडलेल्या व्यक्तींचे हे ढोंगी रूप आहे. हे ढोंग, हा मुखवटा जोपर्यंत बाजूला सारून वास्तवाचा विचार करत साहित्य-संमेलन वास्तववादी होणार नाही तोपर्यंत संमेलनाच्या भोवती उठणारी टीकेची राळ कमी होणार नाही.

आज समाजमाध्यमांनी ज्या पद्धतीचे रूप धारण केले आहे त्याचा विचार करता संमेलनाने मुळापासूनच बदल करण्याची गरज आहे. हा बदल करून, संमेलन नव्या तरुणाईच्या सळसळत्या विचाराला घेऊन, वास्तवाचे भान ठेवून, समकालीन घडामोडींचा विचार करून पुढे जाणार की नाही, हा माझ्या समोरचा खरा प्रश्न आहे. साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावर राजकीय व्यक्तींचा वावर असूनही अशी भूमिका ज्या मराठीतील दिग्गज साहित्यिकांनी घेतली त्यातील बहुतांश साहित्यिक आज हयात नाहीत, पण त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न मात्र जिवंत आहे. आजच्या काळात हा प्रश्न ज्या साहित्यिकांच्या खांद्यावर आहे किंवा त्याचे उत्तर त्यांनी शोधणे अपेक्षित आहे ते खरेच या प्रश्नाचे उत्तर शोधण्यास सक्षम आहेत का, हेही एकदा तपासून पाहावे लागेल. डोंबिवली येथे होणाऱ्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या रिंगणात उमेदवारी अर्ज भरणारे एक उमेदवार हे गेली अनेक वर्षे विविध राजकीय पक्षात काम करीत आहेत. माझा कोण्या एका उमेदवाराला विरोध वगैरे नाही. त्यांचा तो घटनादत्त अधिकार आहे. मी फक्त या निमित्ताने जुन्या प्रश्नाचे नवे उत्तर शोधू पाहतो आहे. विधानपरिषदेची उमेदवारी मिळावी म्हणून मंत्रालयात फेऱ्या मारणारे साहित्यिक मी पाहिले आहेत. पत्रकार म्हणून काम करताना आणखीन एक प्रसंग याची देही याची डोळा पाहिला.

तो म्हणजे साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावर निवडून आलेल्या अध्यक्षांनी त्या संमेलन आयोजनातील महत्त्वाच्या राजकीय नेत्याला संमेलन सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला संमेलनाच्या आवारात वाकून नमस्कार केला. त्यांना संमेलन अध्यक्षाच्या निवडणुकीत निवडून आणल्याबद्दल त्यांचे असे आभार मानले. तरीही राजकीय लोकांचे साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावर असणे हे तुच्छतेचे ठरते का? कुठल्याही गावात प्राप्त परिस्थितीनुसार संमेलन उभे करायचे झाल्यास लागणारा निधी कुठलेही राजकीय पाठबळ न घेता खरंच आयोजक उभे करू शकतात का? जर या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतील तर मला आनंदच होईल.

मी वयाच्या २२ व्या वर्षापासून कधी पत्रकार म्हणून तर त्यापूर्वी पुस्तक विक्रेता म्हणून, अनेक वेळा साहित्यरसिक म्हणून साहित्यसंमेलने गावोगावी जाऊन जवळून पाहतो आहे, कारण साहित्यसंमेलने व्हावीत याच विचारांचा मी आहे. मात्र असे ढोंगीपणाने जे प्रश्न उभे केले जातात त्याचा मला मनस्वी संताप होतो. साहित्यिकांनी भूमिका घेतली पाहिजे असे म्हणणाऱ्या एका संमेलन अध्यक्षांना एका सामाजिक परिस्थितीमध्ये तुम्ही काय भूमिका घेणार असा पत्रकार म्हणून मी जेव्हा प्रश्न विचारला होता तेव्हा त्यांची उडालेली भंबेरी मला आजही आठवते. हे वास्तव आता कधीतरी आपण स्वीकारणार आहोत की नाही, हा माझा थेट प्रश्न आहे. सामाजिक परिवर्तनामध्ये राजकीय घडामोडी या अविभाज्य असतील तर मग राजकीय क्षेत्रात काम करणारा माणूस साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावर अस्पृश्य कसा ठरतो. गेली अनेक वर्षे ज्यांच्या जिवावर संमेलने उभी राहिली त्याच राजकीय लोकांना अजून किती वर्षे आपण झोडपून काढणार आहोत? किती वर्ष तुच्छ समजणार आहोत?

देशाच्या घटनेमध्ये वेळ व परिस्थितीनुसार समाजाभिमुखपणे वेगवेगळ्या घटनादुरुस्ती करण्यात आल्या. कायदे जे जुने झाले ते बदलण्यात आले. मग अखिल भारतीय साहित्य महामंडळाची किंवा महाराष्ट्रातील मुख्य प्रवाहातील या साहित्यसंस्थेची घटना काळ्या दगडावरची रेघ असल्यासारखी जतन का बरं केली जाते आहे? समाजमन आणि सामाजिक वास्तव स्वीकारून घटना दुरुस्त करून समाजाच्या सर्व घटकांना सामावून घेण्याची भूमिका संमेलन का घेऊ शकत नाही?

गेल्या ५०-६० वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रात नेमके काय घडले, हे मी सांगण्याची गरज नाही. जवळपास १५० साहित्य संमेलने महाराष्ट्रात होतात आणि यातील बहुतांश संमेलनांचा रोष आणि रोख हा अखिल भारतीय साहित्य संमेलनावर आहे. लोकसत्तासारख्या अग्रणी मराठी वर्तमानपत्राने संमेलन कुठल्याही गावात झाले तरी त्याला फार महत्त्व न देण्याची भूमिका घेऊन प्रसिद्धी देणे जवळपास बंद केले. एवढे सगळे घडल्यानंतर-सुद्धा अशा कुठल्या व्यक्तीने साहित्य महामंडळाची घटना लिहिली आहे जी दुरुस्त होऊ शकत नाही? किंवा अशी घटनादुरुस्ती सुचवणारा साहित्यिकच आज आपल्याकडे उपलब्ध नाही असे माझ्यासारख्या सर्वसामान्य बुद्धीच्या माणसाने समजावे का?

संमेलन सर्वसमावेशक असावे अशी अपेक्षा सर्व स्तरातून आहे. संमेलन अध्यक्षांच्या निवडणुकीबाबतसुद्धा जो वाद गेली अनेक वर्षे सुरू आहे त्याला ज्या ज्या वेळी साहित्य महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उत्तरे दिली त्यामध्ये एकच गोष्ट ते सांगत आले, की आम्ही घटनेप्रमाणे काम करतो आहोत. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदापासून ज्ञानपीठ विजेते विंदा करंदीकर, भालचंद्र नेमाडे, साहित्य अकादमीविजेते ग्रेस यांच्यासह दि.पु. चित्रे, अरुण कोलटकर, सुरेश भट, ना.धों. महानोर, मंगेश पाडगांवकर, नामदेव ढसाळ अशा थोर जागतिक कीर्तीचे लेखक लांब राहिले त्यांची जराशीही खंत साहित्य महामंडळाची घटना हातात घेऊन बसलेल्या माणसाला का बरं वाटू नये? आज फेसबुक, ब्लॉग, व्हॉट्सअॅप यांसारख्या समाजमाध्यमांचा जबरदस्त प्रभाव आहे, या माध्यमातून व्यक्त होणारे-लिहिणारे अनेक नवे चेहरे कधी साहित्यसंमेलनाशी जोडले जाणार आहेत? समाजमन आणि समाज एका बाजूला आणि साहित्यसंमेलन दुसऱ्या बाजूला असे चित्र घेऊन किती दिवस संमेलन जगणार आहे? मराठीतील पु.ल. देशपांडे, वि.वा. शिरवाडकर यांसारख्या अनेकांनी नव्या लिहिणाऱ्यांना उभे केले. आज साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर बसणारे किती जण हे काम करत आहेत? वास्तववादी जगणाऱ्या नव्या पिढीशी किती जण संवाद साधत आहेत, याचा लेखाजोखा कधीतरी मांडला जाणार आहे की नाही? साधा नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या माणसाकडूनसुद्धा पाच वर्षांचा हिशोब जनता मागते. आता देशाच्या पंतप्रधानालाही हिशोब द्यावाच लागतो मग साहित्य संमेलनाचा अध्यक्षही निवडूनच येत असेल तर त्यानेही आपल्या कामाचा हिशोब का देऊ नये?

ठाण्यात झालेल्या साहित्य संमेलनात २ कोटींची पुस्तकविक्री झाली अशा बातम्या प्रकाशित झाल्या होत्या. एका ग्रंथप्रदर्शनात डोंबिवलीसारख्या शहरात एका दिवशी सुमारे एक लाखाची पुस्तकविक्री होते हेही मी पाहिलेले आहे. तर चंद्रपूरसारख्या छोट्याशा शहरात १५ दिवसात आठ-दहा लाखांची पुस्तकविक्री होते हेही मी वाचलेले आहे. असे असले तरी एकूण ग्रंथविक्री जगाचे रडगाणे मराठीपुरते तरी संपलेले नाही.


एक काळ होता मराठी साहित्यिकांचे व्याख्यान किंवा थेट मुलाखत असा कार्यक्रम असला की मैदानंसुद्धा हाऊसफुल्ल व्हायची. तिकिटं काढून कथाकथन आणि अन्य अनेक कार्यक्रम व्हायचे. आज फुकट कार्यक्रम ठेवला, त्याच्या बातम्या आणि जाहिरात प्रसिद्ध केली, सोशल मीडियावर मेसेज व्हायरल केले तरी किती रसिक श्रोते उपस्थित राहतात? गर्दी गोळा करू शकतील किंवा ज्यांना पाहायला, ऐकायला, भेटायला लोक गर्दी करतील असे लेखक मराठी साहित्य विश्वात किती आहेत? आज पुस्तक प्रकाशनाला जर राजकीय पुढारी नसेल किंवा एखादा ग्लॅमरस कलावंत नसेल तर हॉल किती भरतो आणि किती पुस्तके संपतात हे सत्य काही लपून राहिलेले नाही.

संमेलनामध्ये कविसंमेलनापासून वेगवेगळ्या परिसंवादामध्ये दरवर्षी दिसणारी तीच-तीच ठोकळेबाज माणसे काय कामाची? त्यांचे काय योगदान आहे? सगळ्यात घातक आहे ते म्हणजे, कविसंमेलनामध्ये कवींचा सहभाग हा जिल्ह्याच्या कोट्यानुसार होतो. मग चांगली कविता आणि नवी कविता, चाकोरीबाहेरील कविता आपण कधीतरी समजून घेणार आहोत की नाही. नवनवीन प्रयोग आज होत आहेत. गतवर्षी ट्विटर साहित्य संमेलन घेण्यात आले त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. मग असे उपक्रम संमेलनाच्या प्रवाहात येणार आहेत की नाही?

नवे प्रयोग, नवे आयाम, नवी माणसे, नवे बदल, नवे शब्द, नव्या संकल्पना आणि नवी उमेद घेऊन येणाऱ्या नव्या दिशांना जोपर्यंत आपण कवेत घेण्याचे धाडस करीत नाही तोपर्यंत संमेलन हे सर्वसमावेशक कसे होणार? ऑक्सफर्ड डिक्शनरीने इतर भाषांमधील नवनवीन शब्द स्वीकारून इंग्रजी भाषा समृद्ध केली. मराठीच्या बाबतीत हे सर्वांना कळत असूनही वळत का नाही. परवाच कधीतरी बातमी आली की ऑक्सफर्डने पापड हा मराठी शब्द इंग्रजीमध्ये समाविष्ट केला. आता बोला! मराठीत कुरकुरीत पापडाचा चुरा झाला तरी चर्चेचे गुऱ्हाळ संपेल असे वाटत नाही. (पापड भाजलेला की तळलेला असा वाद मात्र मराठीत उपस्थित होऊ शकतो.) साहित्य संमेलनाच्या जेवणावळीच्या होणाऱ्या चर्चेच्या पलीकडे जाऊन सोशल मीडियावर संमेलन हे आपले वाटेल का? ज्या दिवशी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आपले विचार भाषणातून मांडतील त्या दिवसानंतर काही दिवस सोशल मीडियावर त्यावर चर्चा सुरू होईल. हा माणूस आपल्याबद्दल, आपल्या भावभावनांबद्दल, आपल्या प्रश्नांबाबत, आपल्या जगण्याबाबत आणि बदलत्या समकालीन परिस्थितीबाबत बोलतो आहे म्हणून तरुणवर्ग चर्चा करू लागेल. नाहीतर संमेलन होते, संपते हे कळत नाही. एक विशिष्ट वर्ग त्याबाबत बोलतो, बाकी समाज घटक त्या गावातच नसतो. नव्या वाचकवर्गाला, तरुणाला भाषा, भाषा व्यवहार हे सारे आपले आहे, आपल्यासाठी आहे, आपण त्यामध्ये असायला हवे. आपण त्याबाबत बोलायला हवे. आपण सहभागी व्हायला हवे हा 'आपलेपणा'चा भाव संमेलन कधी निर्माण करू शकेल का? तो करावा एवढीच अपेक्षा आहे, म्हणूनच हा अक्षरप्रपंच केला.

– प्रशांत डिंगणकर
भ्रमणध्वनी : ९५९४९५८१२३
prashantdingankar@gmail.com

## ॥ग्रंथाली॥




## सुंदर ते ध्यान

### डॉ. यश वेलणकर

'सुंदर ते ध्यान' हा आहे पाच मित्रमैत्रिणींचा वाद-संवाद. त्यातील यश याला ध्यान सुंदर आहे हे पटते. त्या विषयाचा तो अधिक अभ्यास करतो. ध्यान हे मेंदूचे ट्रेनिंग आहे, ते एक कौशल्य आहे आणि प्रत्येकाने ते केले पाहिजे असे त्याला वाटते. म्हणून तो त्याच्या दोन मैत्रिणी आणि दोन मित्र यांना इमेल पाठवून ध्यानाविषयी, त्यातील संशोधनाविषयी माहिती देऊ लागतो. त्या चौघांची विचारधारा वेगवेगळी आहे. त्यानुसार त्यांची ध्यान या विषयाविषयी ठाम मते आहेत.

माणूस कोणत्याही विचारसरणीचा असेल, कोणत्याही धर्माचा असेल, कोणतेही काम करत असेल, आस्तिक असेल किंवा नास्तिक असेल, त्याने ध्यानाविषयीचे पूर्वग्रह बाजूला ठेवून ध्यान समजून घ्यायला हवे, रोजच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या आयुष्यातदेखील ध्यानासाठी वेळ काढायला हवा हे आपले मत यश मांडत राहतो. आपल्या सर्व मित्रांनी ध्यान शिकून घ्यावे आणि ते त्यांच्या दिनचर्येचा भाग बनवावे यासाठी त्याचे प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांचा प्रवास म्हणजेच हा वाद-संवाद आहे.

**मूल्य १५० रुपये • सवलतीत ९० रुपये**



## सफर छंद

### पकंज घारे

गिअरची सायकल घेऊन पंकज लडाखसाठी सज्ञ झाला पण त्याआधी त्याने सायकलचा इतिहास शोधून काढला. दूरदृष्टीच्या उद्देशाने पृथ्वीची भ्रमंती, बहुरूपी चमत्कारिक निसर्ग, त्याचं रंगरूप, त्याची चित्रकारिता, शिल्पकारिता, त्याची सुन्न करणारी भव्यता हे सर्व जेव्हा शब्दांकित होतं तसतसं प्रवासास लेखक जिवंत करत सुटतो आणि ज्यांनी कधीही लडाख पाहिलेलं नाही त्यांच्या डोळ्यांपुढेही जिवंत होत जातो. त्यातून जिज्ञासा, सुंदरता, सृष्टिसौंदर्य निर्माण होत जातं. वास्तवासोबत आनंददायी काव्यात्मक भाषाशैली, सिंधूनदीचं दर्शन होताच त्याचं अभ्यासपूर्ण अवलोकन आणि तसंच लेखन हे या प्रवासवर्णनाचं बलस्थान आहे. कधी गारवा, कधी पावसाचा शिरवा तर कधी उन्हाची पर्वा याचं सुंदर वर्णन पानापानांवर वाचताना लेखकाच्या ललितपूर्ण मनोधाटणीचा अंदाज येतो आणि शब्दातीत लडाख लाडाकोडात वाचत जावेसे वाटते. 'सफर-छंद' फक्त प्रवासवर्णन नसून सामाजिक भान असलेल्या लेखकाचं त्यात निसर्गाविषयीचं मनोगतसुद्धा आहे.

– विजयराज बोधनकर

**मूल्य १५० रुपये • सवलतीत ९० रुपये**

# साहित्यसंमेलनांमधून प्रतीत होणारी सांस्कृतिक समज आणि अभिरुची

ओंकार थोरात

> **मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पुस्तकविक्रीमध्ये जर 'यशस्वी व्हा!', 'सुखी होण्याचा मूलमंत्र' यासारख्या पुस्तकांचा समावेश होणार असेल तर मग हे कोणत्या प्रकारच्या साहित्यिक अभिरुचीचे निदर्शक म्हणायचे? तसेच वर्षानुवर्षे साजऱ्या होणाऱ्या साहित्यसंमेलनांमुळे आमच्या एकूण साहित्यिक प्रगल्भतेच्या विकासाला चालना मिळाली का? या शंका उपस्थित होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. अर्थात यामागचे एक महत्त्वाचे कारण हे आपल्या साहित्य संमेलनामधील साहित्यबाह्य प्रेरणांचा वाढता प्रभाव आहे.**

एखाद्या मानवी समूहाच्या उत्कर्षाची किंवा उन्नतीची परिमाणे ठरवायची झाली तर त्या समाजाची 'सांस्कृतिक समज' ही एक प्राधान्यक्रम द्यायला हवी अशी मोजपट्टीही ठरू शकते. संस्कृतीनिविष्ट घटकांच्या आंतरसंबंधामध्ये, तसेच साधल्या जाणाऱ्या परिणामांमधून ती प्रदर्शित होत असते. त्यामुळे 'सांस्कृतिक समज' हा एका अर्थाने मूल्यविचार आहे असे म्हणता येईल.

आदिम काळातील नृत्य, संगीत, मौखिक आविष्कार, इ. ही जर त्या काळातील सांस्कृतिक वैशिष्ट्यांची रूपे असतील तर लिपीबद्ध साहित्य आणि त्यावर आधारित चर्चा-विमर्श हा पुढच्या काळातील सांस्कृतिक व्यवहाराचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणता येईल. माणूस हा मूलत: समाजशील प्राणी असल्यामुळे त्याच्या या साहित्यिक चर्चा-विमर्श, विचार प्रकटीकरण, साहित्याचे सादरीकरण यांना काळाच्या ओघात संमेलनांचे स्वरूप आले असावे. जगभरात निरनिराळ्या प्रकारची साहित्य संमेलने (लिटररी फेस्टिव्हल) होत असतात. या साहित्य संमेलनांमधून एखाद्या समूहाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये ठळक होत असतात, त्याचप्रमाणे त्या समूहाची 'सांस्कृतिक समज'ही प्रकट होत असते. साहित्य संमेलनांना दीर्घ अशी परंपरा आहे तेव्हा मराठी 'साहित्यसंमेलनांना केंद्रस्थानी ठेवून आपल्या समाजाच्या सांस्कृतिक समजेवर तसेच अभिरुचीबाबत काही भाष्य करता येते का हे पाहणे, हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

मोठ्या स्तरावरील साहित्य संमेलनाशिवाय मराठी भाषेच्या क्षेत्रात विविध प्रकारची साहित्य संमेलने भरवली जातात. याप्रकारच्या आयोजनालाही जवळजवळ ५० ते ६० वर्षे उलटून गेली आहेत. दलित साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, स्त्रीवादी साहित्य संमेलन, मुस्लिम मराठी साहित्य संमेलन, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे साहित्य संमेलन, विश्व मराठी साहित्यसंमेलन, ई-साहित्यसंमेलन (इंटरनेट) अशी निरनिराळ्या धर्तीवरची साहित्यसंमेलने हे मराठी संस्कृतीचे एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य बनले आहे. कोणत्याही भारतीय भाषेच्या क्षेत्रात इतक्या मोठ्या प्रमाणावरचे (अ.भा.म.सा. संमेलन) तसेच इतक्या विविध प्रकारची साहित्यसंमेलने भरवली जात नाहीत. साहित्यसंमेलनासारख्या सांस्कृतिक आयोजनाला असणारी ही व्यापक पार्श्वभूमी एखाद्या विशिष्ट समूहाची 'सांस्कृतिक समज' तसेच अभिरुची या संदर्भातील भाष्याला सहाय्यकारी ठरणारी आहे.

मराठी साहित्यसंमेलनांचा गंभीरपणे विचार करत असताना, आपल्या सांस्कृतिक समजेच्या अनुषंगाने काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होतात. यापुढील विवेचनात प्रत्येक मुद्द्याचा स्वतंत्रपणे विचार केला आहे.

अ) साहित्यसंमेलनाच्या आयोजनामध्ये साहित्यबाह्य प्रेरणांच्या वाढत्या प्रभावाने, संमेलनकाळात आपण एका आभासी साहित्यिक वातावरणामध्ये रमण्यात धन्यता मानतो का?

साहित्यसंमेलनाशी संबंधित साहित्यबाह्य प्रेरणांचे विवेचन करण्याआधी न्या. रानड्यांनी १८८५ साली भरवलेल्या दुसऱ्या मराठी ग्रंथकार संमेलनात सहभागी होण्यासंबंधी महात्मा फुले यांना विनंती केली होती. या पत्ररूपी विनंतीस म. फुले यांनी ज्या पत्राद्वारे उत्तर पाठवले होते, त्या पत्राचा येथे उल्लेख करणे महत्त्वाचे वाटते. सामाजिक सुधारणांच्या उद्देशाने भारलेल्या म. फुले यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वालाही ग्रंथकार संमेलनाच्या आमंत्रणाला नकार देताना विशुद्ध साहित्यिक प्रेरणांचे भान होते हे प्रस्तुत पत्रातून आपल्याला दिसते. म. फुले यांच्या पत्रामधील साहित्यिक विचारांचे महत्त्व लक्षात घेता अनेक अभ्यासक या पत्राला विद्रोही साहित्य चळवळीचा एक प्रमुख आधार मानतात. जे साहित्यविषयक भान ग्रंथकार

संमेलनाच्या संदर्भातील या नकारदर्शक पत्रात दिसते ते अलीकडच्या काळातील अ.भा.म.सा. संमेलनाच्या आयोजनातही अभावानेच आढळते.

मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासात 'संमेलन' हे बहुतांश वेळेस साहित्यबाह्य कारणांनी आणि प्रकरणांनीच गाजले आहे. ठळक उदाहरण म्हणून १९८७ सालच्या एका घटनाक्रमाचा उल्लेख करता येईल. १९८७ च्या दरम्यान प्रवरानगर येथे अ.भा.म.सा. संमेलन भरवले होते पण तिथल्या एका बड्या राजकीय कुटुंबाला अध्यक्ष म्हणून लेखक 'आनंद यादव' हवे होते. पण जेव्हा लेखक वसंत कानेटकर हे अध्यक्ष म्हणून घोषित झाले तेव्हा आयोजकांनी प्रवरानगर येथे संमेलन भरवायला नकार दिला. पुढे ते ठाणेकरांनी आपल्या शहरात आयोजित केले, पण या प्रक्रियेत पूर्ण एक वर्ष वाया गेले. यावरून वैयक्तिक अथवा सामाजिक राजकीय हितसंबंध नजरेसमोर ठेवून साहित्यसंमेलनांचे आयोजन करायचे नसते ही साधी बाबही आमच्या आयोजकांच्या लक्षात येत नाही असे दिसते. म्हणूनच गेल्या १०-१२ वर्षांत औरंगाबाद (२००४), नाशिक (२००५), चिपळूण (२०१३), सासवड (२०१४) या चार वेळेस देशातील एक महत्त्वाचे राजकीय व्यक्तिमत्त्व असलेले शरद पवार हेच संमेलनाचे उद्घाटक होते. अशाच एका साहित्य संमेलनाप्रसंगी प्रस्तुत संमेलनाची सूत्रे ज्यांच्या हाती असतात त्या साहित्य महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांना शरद पवार यांच्या उद्घाटक असण्याविषयी विचारणा झाली. त्यावेळी दिल्या गेलेल्या उत्तरावरून आयोजक संस्था आणि साहित्य महामंडळ संमेलनासंबंधीच्या गोष्टी कशाप्रकारे 'मॅनेज' करते हेच लक्षात येते आणि एकदा का तुम्ही इतक्या वरच्या पातळीवर तडजोडी करायला सुरुवात केली, की मग संमेलनाच्या स्मरणिकेतील लेख असोत वा परिसंवादातील विषय व वक्ते ठरविणे असो, तुमच्या तडजोडीचा हा प्रवाह संपूर्ण व्यवस्थेत अनेक ठिकाणी पाझरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

साहित्यसंमेलनासंबंधीच्या या अवनतीचे विश्लेषण करताना प्रस्तुत म. फुलेंच्या ज्या पत्राचा उल्लेख आला आहे त्याचा संदर्भ येथे देणे आवश्यक वाटते. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या निर्भीड बाण्याने म. फुले यांनी साहित्य संमेलनाच्या आमंत्रणाला नकार देताना स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आहे, त्याचा अवलंब साहित्य महामंडळ ९० व्या साहित्य संमेलनाच्या आयोजनात तरी करते का? ही शंका उपस्थित होण्याला लेखक संजय भास्कर जोशी यांचा स्वानुभव बळकटी देतो. संमेलनाबाबत संजय भास्कर जोशी वर्तमानपत्राच्या एका रविवारच्या पुरवणीतील लेखात म्हणतात, ''...मुळात साहित्य संमेलनातलं काय आवडत नाही आम्हाला? तर आधी चार-सहा महिने गाजणारे अध्यक्षाच्या निवडीचे भंपक वाद आणि निवडणुकीचा खुळचट फार्स! चार-सहा साहित्य परिषदा आपल्या हजारो सभासदांपैकी जाहीर न केलेल्या अनाकलनीय निकषांवर अगदी मोजके मतदार निवडणार अशा साताठ परिषदांतले असले हजारेक मतदार अध्यक्ष निवडणार. ही पद्धतच मुळात भंपक आहे. एक गंमत म्हणजे, दोन वेळा राज्य सरकारची आणि बाकी अनेक वेळा इतर पारितोषिके मिळवून आणि नावावर साताठ पुस्तके असूनही दरवर्षी मी या अध्यक्ष निवडणुकीच्या मतदारात असेन की नाही, याचे कुतूहल मला अध्यक्ष कोण निवडून येईल याच्यापेक्षा जास्त असते. त्या यादीत मी कधी असतो तर कधी नसतो...'' संजय भास्कर जोशी यांच्या वरील मनोगतावरून एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, निवडणुकप्रक्रिया पारदर्शी बनवणे आणि साहित्याशी संबंधित प्रत्येक घटकाला निवडणुकप्रक्रियेचा भाग बनविणे हा साहित्य महामंडळाच्या अजेंड्यावरील मुद्दा राहिला आहे का? असे नसेल तर 'साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाची निवडणूक' या शीर्षकाखाली आम्ही फक्त लोकशाहीचा ढाचा स्वीकारला आणि सत्ताकारणाच्या संघर्षात प्रत्यक्ष लोकशाही मूल्यांना मात्र फाटा दिला.

आ) साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणजे अल्पकाळ अस्तित्वात असलेले सत्त्वहीन सांस्कृतिक सत्तापीठ आहे का?

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून निवडून येणे हे एखाद्याच्या साहित्यिक कार्यकर्तृत्वावर अवलंबून नसते ही सर्वश्रुत अशी बाब आहे. आजपर्यंत कमी-अधिक कुवतीचे लेखक-समीक्षक हे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान झालेले आपण पाहिलेले आहेत, पण तरीही काळाच्या ओघात अ.भा.म.सा. संमेलनाचे अध्यक्षपद हे सांस्कृतिक क्षेत्रात एक विशेष उंचीचे स्थान म्हणून स्थापित झाले आहे. त्यामुळे हे 'स्थानमाहात्म्य' अनेकांच्या आकर्षणाचे केंद्र न ठरले तर नवल! हा मुद्दा अधिक समजून घेण्यासाठी लेखक आनंद यादव यांच्याबाबतीतला एक खेदजनक घटनाक्रम पाहू या... आनंद यादव यांची २००९ साली महाबळेश्वर येथे आयोजित केलेल्या अ.भा.म.सा. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली, पण त्यानंतर त्यांच्या 'संतसूर्य तुकाराम' या कादंबरीसंदर्भात वारकरी संप्रदायातील एका प्रभावशाली गटाने आक्षेप घेतला. ज्या वारकरी संप्रदायाला संत विचारांची, सहिष्णू आचरणाची व्यापक पार्श्वभूमी लाभली आहे, तो समूह कादंबरीसारख्या सर्जनशील साहित्यप्रकाराबाबत आक्रमक झालेला संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला आहे. ही आक्रमकता इतकी टोकाला पोहोचली, की आनंद यादवांनी कादंबरीतील तो वादग्रस्त मजकूर मागे घेऊन देहू येथे तुकारामांच्या मूर्तीसमोर माफी मागूनही त्यांना संमेलनाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. अर्थात आनंद यादवांचे संमेलनाध्यक्षपद चर्चेत येण्यापूर्वीच 'संतसूर्य तुकाराम' ही कादंबरी प्रकाशित होऊन त्यावरची परीक्षणेही वर्तमानपत्रांत छापून आली होती, पण जसे त्यांचे संमेलनाध्यक्षपद घोषित झाले तशी या वादाला सुरुवात झाली. या संपूर्ण प्रकरणात ज्या पद्धतीने आनंद यादव यांनी आपल्या लेखनाशी द्रोह करून कणाहीन भूमिका घेतली त्यावरून या संमेलनाध्यक्षपदाचे आकर्षण काय तीव्रतेचे असू शकते याची कल्पना येते.

हजारो लोक वर्षानुवर्षे संमेलनाध्यक्षाचे भाषण ऐकण्यासाठी

संमेलनस्थळी हजर असतात (त्यातले बरेचजण उपचार म्हणून हजर असले तरीही) यावरून या सांस्कृतिक सत्तापीठाच्या महिम्याचा अंदाज बांधता येतो. माध्यमाच्या प्रचारामुळे असेल अथवा संमेलनाच्या आयोजनाच्या विशिष्ट स्वरूपामुळे असेल या सांस्कृतिक सत्तापीठाचे जनमानसामधील स्थान अबाधित आहे. त्यामुळेच की काय विशिष्ट संमेलनाध्यक्षावर सडकून टीका करणारे, साहित्य महामंडळाच्या आयोजनावर तोंडसुख घेणारेही काही वेळेस साहित्य संमेलनांना हजेरी लावतात. बरेचसे टीव्ही चॅनल्स संमेलनाध्यक्षाच्या भाषणाचे प्रसारण करतात, पण ज्या सांस्कृतिक सत्तापीठाबद्दल आपण बोलत आहोत ते सत्त्वहीन आहे कारण सत्कार करणे आणि सत्कार स्वीकारणे याच्यापलीकडे जाऊन संमेलनाध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळात संमेलनाध्यक्ष म्हणून उत्तुंग कामगिरी केली आहे अशी उदाहरणे कमीच सापडतात.

इ) दीर्घ परंपरा असलेल्या मराठी साहित्य संमेलनांच्या फलश्रुतीमध्ये साहित्यिक प्रगल्भतेचा अंतर्भाव करता येईल का?

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आपला दीर्घ इतिहास अभिमानाने मिरवताना दिसते. हजारो-लाखो लोक दरवर्षी या संमेलनाला भेटी देत असतात. काही वेळेस महाराष्ट्राच्या बाहेर, पण प्रामुख्याने महाराष्ट्राच्या विविध शहरांमध्ये या संमेलनाचे आयोजन होत असते. पुण्या-मुंबईसह पंढरपूरपासून ते चंद्रपूरपर्यंत आणि जळगावपासून ते आळंदीपर्यंत ही अखिल भारतीय स्तरावरची संमेलने भरवली गेली आहेत. वर्षातील या सर्वात मोठ्या साहित्य उत्सवाशिवाय विविध विचारनिष्ठेला, जातीधर्मांना, प्रादेशिक जाणिवेला आधारभूत मानून साहित्य संमेलने आयोजित करण्यालाही आता जवळपास ५० ते ६० वर्षे उलटून गेली आहेत.

साहित्य संमेलनात साहित्यविषयक कार्यक्रमांना महत्त्व असणे अपेक्षित असते. ज्यामध्ये लेखक-वाचक संवाद, कविता-कथांचे सादरीकरण, अभिवाचन, साहित्यविषयक चर्चा, परिसंवाद, व्याख्याने, साहित्यविषयक मतांचे आदान-प्रदान इ. उपक्रम असतात. या सर्व उपक्रमांमधून साहित्याची आवड निर्माण होण्यापासून ते साहित्यजाणिवा प्रगल्भ होणे असे साहित्यासंबंधीचे अनेक उद्देश आयोजकांनी गृहीत धरलेले असावेत असा एक समज आहे. प्रत्यक्षातील चित्र काय आहे? या साहित्यसंमेलनांमधून साहित्य आणि साहित्यिकांबाबत एक विशिष्ट प्रकारची जाणीव, भान किंवा आस्था यांची किमान पातळी तरी विकसित झाली का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी मिळण्याची शक्यता जास्त आहे.

साहित्यसंमेलन आणि साहित्यिक अभिरुची यांचा विचार करताना संमेलनस्थळी होणाऱ्या ग्रंथविक्रीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. गेल्या काही वर्षांपासून संमेलनांमध्ये होणाऱ्या कोट्यवधींच्या पुस्तकविक्रीची चर्चा होते. आता या कोट्यवधींच्या उलाढालीत आमच्या ज्ञानपीठ पारितोषिकाने सन्मानित भालचंद्र नेमाडे यांच्या पुस्तकांचा, कमल देसाई यांच्या कथा आणि कादंबऱ्यांचा, दि.पु. चित्रे, अरुण कोलटकर यांच्या कवितासंग्रहाचा, किरण नगरकर, श्याम मनोहर यांच्या कादंबऱ्यांचा वाटा किती? या प्रश्नाचे उत्तर देताना अत्यंत खेदाने म्हणावेसे वाटते, की मराठी साहित्यातील या सर्व प्रतिभावंतांची पुस्तके एकूण वाचकसंख्येच्या तुलनेत अतिशय अल्प प्रमाणात विकली जातात. प्रस्तुत पुस्तकांच्या किती आवृत्त्या निघाल्या आणि प्रत्येक आवृत्ती किती पुस्तकसंख्येची होती हे जर पाहिले तरी सहजपणे हे लक्षात येते. जर ललित साहित्याशी संबंधित ही पुस्तके विक्रीस जात नसतील तर मग कोट्यवधींच्या आकड्यांमध्ये कोणत्या प्रकारच्या पुस्तकांचा समावेश होतो? या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या पुस्तकविक्रीमध्ये जर 'यशस्वी व्हा!', 'सुखी होण्याचा मूलमंत्र' यांसारख्या पुस्तकांचा समावेश होणार असेल तर मग हे कोणत्या प्रकारच्या साहित्यिक अभिरुचीचे निदर्शक म्हणायचे? तसेच वर्षानुवर्षे साजऱ्या होणाऱ्या साहित्यसंमेलनांमुळे आमच्या एकूण साहित्यिक प्रगल्भतेच्या विकासाला चालना मिळाली का? या शंका उपस्थित होणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. अर्थात यामागचे एक महत्त्वाचे कारण हे आपल्या साहित्यसंमेलनामधील साहित्यबाह्य प्रेरणांचा वाढता प्रभाव आहे.

आमच्या साहित्यसंमेलनांमधील चर्चेचे, औत्सुक्याचे, आस्थेचे, गर्दीचे विषय कोणते असतात? संमेलनातील अमिताभ बच्चन यांचे मराठी भाषण, हिंदी-मराठी चित्रपट मालिकांतील कलाकारांचा वावर, फिल्मी गीतकार म्हणून ओळख असलेल्या जावेद अख्तर यांची संमेलनांनी भलामण करणे, संमेलनातील आशा भोसले तसेच मंगलगाणी-दंगलगाणीसारखे कार्यक्रम, राजकीय व्यक्तींचा वावर तसेच त्यासंबंधीचे वादग्रस्त विषय, संमेलनातील सोयी-सुविधा आणि होणारा खर्च याच मुद्द्यांचं साहित्यिक विषयांपेक्षा आम्हाला जास्त अप्रूप असते असे दिसते. साहित्य संमेलनांच्या वार्तांकनांवर नजर टाकली की हा विषय लक्षात येतो. आपली प्रसारमाध्यमे ज्या पद्धतीने 'साहित्यसंमेलन' हा विषय हाताळतात त्यामधूनही आपल्या साहित्यिक अभिरुचीचे व साहित्यिक प्रगल्भतेचे पडसाद उमटताना दिसतात.

साहित्यसंमेलनांमधून कोणत्या प्रकारची साहित्यिक प्रगल्भता साधली जाते? आणि त्या अनुषंगाने प्रतीत होणाऱ्या 'सांस्कृतिक समजे'ची प्रतवारी काय? या विषयावर अधिक प्रकाश पडावा या उद्देशाने आम्ही एक प्रश्नावली तयार केली आणि काही निवडक लोकांपर्यंत 'व्हॉटस् ॲप'च्या माध्यमातून प्रतिसादासाठी पाठवून दिली. पुणे, मुंबई, सांगली, औरंगाबाद, धुळे, अकोला या ठिकाणी स्थित २०० ते २५० जणांपर्यंत प्रस्तुत प्रश्नावली पोहचली. या प्रश्नावलीला कसा प्रतिसाद मिळाला हे विदित करण्यापूर्वी प्रश्नावलीचे स्वरूप काय होते ते पाहू या...

१) आपण आजपर्यंत किती मराठी साहित्य संमेलनांना भेटी दिल्या आहेत?

२) साहित्य संमेलनातील सर्वात आवडणारी गोष्ट कोणती?

३) आपण अध्यक्ष निवडीच्या प्रक्रियेबाबत समाधानी आहात का?

४) साहित्य संमेलनातील एक खटकणारी बाब कोणती?

५) स्थानिक संमेलने उपयुक्त की मोठ्या स्तरावरची?

६) संमेलनात येणाऱ्या किती टक्के लोकांना साहित्यविषयक परिसंवाद अथवा गंभीर भाषणांमध्ये रस असतो?

७) साहित्यसंमेलन साहित्यबाह्य विषयांमुळेच जास्त गाजते असे वाटते का?

८) साहित्यसंमेलनसंबंधीचे वाद, धमक्या, हल्ले हे आपली साहित्याविषयीची जाण प्रगल्भ नसल्याचे लक्षण आहे असे वाटते का?

प्रश्नावली पाठवलेल्यांमध्ये प्रामुख्याने साहित्यिक व साहित्यरसिक यांचा समावेश होता. या २०० ते २५० जणांपैकी फक्त ११ जणांनी आम्हाला उत्तरे पाठविली. यावरून आम्ही साहित्यव्यवहार व साहित्यविषयक घडामोडींबाबत किती सजग असतो हे दिसून येते. प्रश्नावली पाठवलेल्यांपैकी काही जण हे बऱ्याच वेळेस विविध संमेलनांमध्ये निमंत्रित कवी म्हणून हजेरी लावलेले होते, तरीही त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. यावरून आमच्या बऱ्याचशा कवी आणि लेखकांना 'साहित्यिक' हे बिरुद मिरविण्यासाठी आणि त्यांच्या लेखनाच्या सादरीकरणासाठीचे व्यासपीठ म्हणूनच अशा संमेलनांची आवश्यकता वाटते. बाकी मग फारतर यांच्या मित्र-मैत्रिणींच्या साहित्याचा आस्वाद घेताना हे दिसतात. एकूण साहित्याची परंपरा, साहित्यातील नवे प्रवाह, भाषेची माध्यमं म्हणून असलेली ताकद याबाबतीत ही मंडळी बऱ्याच वेळेस अनभिज्ञ असतात. त्यामुळेच संमेलनातील साहित्यविषयक परिसंवाद, व्याख्याने व चर्चासत्र यामध्येही या लेखक-कवींना फारसा रस नसतो. साहित्यविषयक गंभीर चिंतनाला हे साहित्यिक नाके मुरडतात आणि त्यामुळेच अशा साहित्य संमेलनाविषयक प्रश्नावलीप्रति निराशा दर्शवितात. संमेलनाबाबतचा हा दृष्टिकोन एकप्रकारे आपले सांस्कृतिक आकलनच स्पष्ट करतो.

आतापर्यंतच्या विश्लेषणावरून साहित्य संमेलने ही साहित्यिक प्रगल्भतेच्या दृष्टीने फारशी उपयुक्त ठरली नाहीत असे दिसते. मग ही साहित्य संमेलने कोणासाठी व कशाच्या अनुरोधाने उपयुक्त ठरली, याचा विचार करताना व्यक्तीच्या 'सांस्कृतिक स्थाना'चा विषय पुढे येतो

ई) साहित्य संमेलनांचा सांस्कृतिक स्थान उंचावण्यासाठीचे साधन म्हणून वापर होतो का?

व्यक्तीची प्रतिष्ठा किंवा समाजातील त्याचे स्थान हे जसे त्याच्याकडील संपत्तीवर अवलंबून असते, तसेच ती व्यक्ती सांस्कृतिकदृष्ट्या किती पुढारलेली आहे यावरही आधारित असते. त्यामुळेच राजकारणी मंडळी ही साहित्यसंमेलनासारख्या सांस्कृतिक व्यासपीठाचा वापर करताना दिसतात. लाखोंच्या संख्येने लोक साहित्यसंमेलनांना हजेरी लावत असतात आणि माध्यमांच्या या युगात ही संमेलने प्रसारमाध्यमांद्वारे कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचताना दिसतात. त्यामुळे मोठ्या जनसंख्येपर्यंत पोहोचणे, विशेष जनसमूहापर्यंत पोहोचणे आणि आपल्या संपन्न किंवा उच्च अभिरुचीचा आभास जनतेमध्ये निर्माण करणे यांसारख्या उद्देशाने प्रेरित होऊन ही राजकारणी मंडळी साहित्य संमेलनांमध्ये रस घेताना दिसतात.

राजकारण्यांप्रमाणेच उद्योजकही या साहित्यसंमेलनाप्रति आपला स्नेहभाव दाखविताना दिसतात. 'ब्रँड बिल्डिंग' आणि 'मार्केटिंगचे तंत्र' यासारख्या उद्देशांनी ही उद्योजक मंडळी साहित्य संमेलनांकडे आकर्षित होताना दिसतात. याबाबतीत पिंपरी चिंचवड (२०१६) येथील संमेलनाचे उदाहरण देता येईल. पिंपरी चिंचवड येथील संमेलन हे महाराष्ट्रातील एका राजकीय कुटुंबातील शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित असलेल्या संस्थेने आयोजित केले होते. चकचकीत वेबसाइटपासून ते फेसबुक पेजपर्यंत अनेक अद्ययावत व आधुनिक गोष्टींचा वापर येथे केला होता. या संमेलनाच्या वेबसाइटवर संमेलनाच्या स्वागताध्यक्षांचा परिचय दिलेला आहे. स्वागताध्यक्ष हे आयोजक असलेल्या शैक्षणिक संस्थेचे प्रमुख पदाधिकारी होते. त्यांच्या परिचयात म्हटले आहे की, ''हे संमेलन कोणतेही अवडंबर व बडेजाव न माजवता करण्याचा त्यांचा (स्वागताध्यक्ष) मानस आहे. हे संमेलन वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्याची त्यांची (स्वागताध्यक्ष) इच्छा आहे. व्यक्तिगत प्रसिद्धीपासून दूर राहणारे डॉ. पाटील (स्वागताध्यक्ष) साहित्यसंमेलनातही याच भूमिकेतून वावरताना दिसणार आहेत.'' प्रत्यक्षात मात्र याच वेबसाइटचे नीट निरीक्षण केल्यानंतर, संमेलनातील विविध घटना-प्रसंगांची छायाचित्रे पाहिल्यानंतर परिस्थिती परिचयाच्या विरोधी आहे हे सामान्यपणे लक्षात येते.

एकूण काय तर राजकारणी आणि उद्योजक मंडळी ही प्रामुख्याने हितसंबंधांच्या दृष्टीने 'साहित्यसंमेलन' या सांस्कृतिक व्यवस्थेकडे पाहताना दिसतात, पण मग वर्षानुवर्षे लाखो-करोडो लोक नित्यनियमाने साहित्यसंमेलनांना उपस्थित राहतात या गोष्टीमागे कोणत्या प्रेरणा कार्यरत असतात? हा सांस्कृतिक शोध जरी एकरेषीय आणि साधा-सोपा नसला तरी या विश्लेषणामध्ये सांस्कृतिक स्थान उंचावण्यासाठी जोपासला गेलेला 'साहित्यिक भक्तिभाव' हा निश्चितच एक महत्त्वाचा मुद्दा ठरू शकतो.

लेखाचा शेवट करताना साहित्यसंमेलनाची आषाढी-कार्तिकी वारीशी तुलना करण्याचा मोह आवरत नाही. पंढरीची वारी आणि साहित्य संमेलने ही महाराष्ट्रीय संस्कृतीची अनन्यसाधारण वैशिष्ट्ये आहेत. विठ्ठलाच्या (मंदिराच्या कळसाच्या रूपाने का होईना) दर्शनाने मिळणारे 'आत्मिक समाधान' हे प्रमाण मानले की 'भेदाभेद भ्रम अमंगल' म्हणत शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या वारीने धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रात काय उन्नती साधली, हे प्रश्न जसे कमी महत्त्वाचे ठरतात. तशाच प्रकारे वर्षानुवर्षे भरवल्या जाणाऱ्या साहित्य संमेलनांमध्ये जोपासल्या गेलेल्या विशिष्ट प्रकारच्या साहित्यिक भक्तिभावाने अपेक्षित साहित्यिक प्रगल्भतेची गोची केली असेल का?

संदर्भ :-

१) शतकाची विचारशैली (अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणे व त्यांची चिकित्सा)

लेखक : रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, प्रथमावृत्ती, १ जानेवारी २००२.
२) महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपा. य.दि. फडके, प्रकाशन बार्टी (पुणे), प्रथमावृत्ती २०१५.
३) आपले ८९ संमेलनाध्यक्ष - संमेलनाची स्मरणयात्रा, संकलन : रविप्रकाश कुलकर्णी, प्रकाशन : शब्दांगण, पुणे. प्रथमावृत्ती : २० जानेवारी २०१६.
४) दिव्य मराठी - रसिक पुरवणी, २७ नोव्हेंबर २०१६.
५) दिव्य मराठी - ३ जानेवारी २०१४.
६) ८९ व्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाची वेबसाइट.
७) महाराष्ट्र टाइम्स ब्लॉग - आनंद यादव यांचा मृत्यू, विजय चोरमारे, २८ नोव्हेंबर २०१६


**- ओंकार थोरात**
भ्रमणध्वनी : ९९२२९३५५०५
onkar.thorat2@gmail.com


## ग्रंथाली



## आता करायचं आहे...

**चांगदेव काळे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

चांगदेव काळे हे मराठीतील एक प्रसिद्ध साहित्यिक आहेत. कादंबरी, कथा, चरित्र या प्रकारात त्यांनी विशेषत्वाचे लेखन केले आहे. साहित्य आणि ग्रंथालय चळवळींशी त्यांचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे मराठी साहित्यातील भिन्न प्रवाहांसंबधींचे त्यांचे भान सूक्ष्म आहे. मुळात ते एक उत्तम वाचक आहेत आणि त्याचबरोबर ते एक सर्जनशील कलावंत आहे. कथालेखन या प्रकारावर त्यांची निर्विवाद हुकूमत आहे.

प्रस्तुतच्या संग्रहातील आशयप्रदेश जीवनातील विविध क्षेत्रांचे चित्रण करणारा आहे; आणि हे जीवनचित्रण त्यांनी पुरेशा ताकदीने केलेले आहे. चित्रमयता, नाट्यत्मकता प्रसंग रेखाटण्यातील कुशलता, अल्पाक्षरी वाक्यरचना, प्रवाही निवेदन आणि ठसठशीत व्यक्तिरेखा यांच्यामुळे या कथांना उंची गाठणे शक्य झाले आहे.

'आता काय करायचं...' या कथासंग्रहातील कथा चांगदेव काळे यांची कथालेखनावर असलेली हुकूमत स्पष्ट करणाऱ्या असून अतिशय गंभीर स्वरूपाच्या आणि वाचकांच्या जाणिवा प्रगल्भ करणाऱ्या कथालेखनाकडे त्यांची वाटचाल सुरु असल्याची आश्वासक विश्वास वाचकांच्या मनात निश्चित निर्माण करतील याविषयी मला पुरेपूर खात्री वाटते.

## मिरग

**डॉ. सई लळीत**



**मूल्य १३० रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

लग्न ही गोष्ट स्त्री मनाच्या अतिशय नाजूक भावविश्वाशी बांधली गेली आहे. आयुष्यभराचं ते एक बंधन असतं. पण आजही यात मुलीचा विचार क्वचितच केला जातो. होणाऱ्या नवऱ्याची सांपत्तिक स्थिती, घराणं, एकंदरीत प्रतिष्ठा आणि आपल्याला कितपत हे स्थळ झेपेल, याचा विचार करून मुलीचं लग्न लावून दिलं जातं.

खरं तर दुसरं लग्न हा विषयच खूप गुंतागुंतीचा आहे. दुसरेपणा म्हणजे... नवऱ्या मुलाचं पहिलं लग्न झालेलं असायचं. पण बायको मेलेली असायची, कधी वर्षानुवर्षे अंथरुणाला खिळलेली. कधी मुल नसायचं तर कधी फक्त मुलीच असायच्या. अशी असंख्य कारणं आणि निमित्तही. हा दुसरेपणा कुंकवाबरोबरच तिच्या जन्माला कायमचा चिकटायचा. अगदी तिच्या मुलीचं लग्न झालं तरीही... कदाचित तिच्या आयुष्यातलं हे एकमेव स्वप्न असू शकायचं की आपल्या मुलीचं लग्न पहिलेपणावरच करायचं.

दुसरेपणाला दिलेली मुलगी... कसं असेल तिचं भावविश्व... त्याचं वरकरणी स्थिर भासणारं भावविश्व... आणि त्या दोघांचं मिळून भावजीवन... ही कादंबरी आहे त्यांचं अंतरंग... कादंबरीतला काळ साधारण वीस वर्षापूर्वीचा आहे.

# अ.भा.मराठी साहित्यसंमेलन आणि मराठी भाषेचे संवर्धन

**डॉ. प्रकाश परब**

> **साहित्यसंमेलनांतून आणि त्यानिमित्ताने होणाऱ्या चर्चेतून मराठीच्या दुरवस्थेची कैफियत वर्षानुवर्षे मांडली जात आहे पण परिस्थिती सुधारते आहे असे मात्र दिसत नाही. महाराष्ट्र शासन गेली पाच-सहा वर्षे मराठी भाषेचे धोरण दळते आहे. ते जाहीर करण्यास अद्याप मुहूर्त सापडलेला नाही. मराठीबाबत काही करण्याची राजकीय इच्छाशक्ती नाही अशी टीका आपण करू शकतो, पण सत्ताधारी असा वेळकाढूपणा करू शकतात कारण मराठीबाबत सामाजिक इच्छाशक्तीही क्षीण झाली आहे.**

**न्या.** महादेव गोविंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली १८७८ मध्ये पुणे येथे भरलेले 'मराठी ग्रंथकार संमेलन' अनेक नामकरणांनंतर आता अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ह्या नावाने स्थिरावले आहे. अ.भा.मराठी साहित्यसंमेलन हे प्रामुख्याने साहित्यव्यवहाराला वाहिलेले असले तरी ह्या संमेलनाच्या व्यासपीठावरून मराठी भाषा आणि भाषाव्यवहार यांविषयीच्या प्रश्नांचीही चर्चा झालेली आहे. मग तो स्वतंत्र मराठी भाषिक राज्याच्या स्थापनेचा प्रश्न असो की मराठीच्या स्वतंत्र विद्यापीठाचा. अलीकडे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर मिळावा ह्यासाठी संमेलनाच्या व्यासपीठाचा वापर होऊ लागला आहे.मराठीचे शुद्धलेखन, बोलींना सामावून घेणारे प्रमाणीकरण, शिक्षणातील इंग्रजी भाषेचे वाढते वर्चस्व आणि मराठीचे घसरते स्थान, उच्च माध्यमिक स्तरावर मराठीला माहिती तंत्रज्ञान ह्या विषयाचा प्रर्याय, बंद पडत चाललेल्या मराठी शाळा, मराठीच्या प्रश्नांवर सरकारी अनास्था आणि एकूणच मराठी भाषेचे भवितव्य असे अनेक प्रश्न संमेलनाच्या अनुषंगाने चर्चिले गेले आहेत. मराठी भाषेविषयीची चिंता आणि चिंतन हे संमेलनातील परिसंवादांत महत्त्वाचे विषय राहिलेले असून संमेलनाच्या समारोपाला खुल्या अधिवेशनात मांडल्या जाणाऱ्या ठरावांतूनही त्याचे प्रतिबिंब पडलेले दिसते.

असे असले तरी मराठी भाषेचा प्रश्न नीट समजून घेऊन तो तडीस नेण्यात मुख्य किंवा मध्यवर्ती समजले जाणारे हे संमेलन यशस्वी झाले आहे असे निश्चितच म्हणता येणार नाही.हे खरे आहे की मराठी भाषेपुढील समस्यांची चर्चा करणे आणि त्या सुटण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करणे हे मध्यवर्ती संमेलनाचे अवतारकार्य नव्हे.तेथे साहित्यचर्चेलाच प्राधान्य मिळावे हे स्वाभाविक आहे. परंतु, मराठी भाषाव्यवहारालाच ओहोटी लागली असताना व तिच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे असे वाटत असताना कोट्यवधी मराठी भाषकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या साहित्य संमेलनाला त्यापासून दूर राहाता येणार नाही. स्वा. सावरकारांनी भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या असे आवाहन केले. कऱ्हाडच्या साहित्य संमेलनात दुर्गाबाई भागवत यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याची बाजू घेत आणीबाणीविरोधातील असंतोषाला वाट करून दिली. मध्यवर्ती साहित्य संमेलनाने मराठी समाजाच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाचे प्रासंगिक, सामाजिक, राजकीय प्रश्न कधीही अस्पर्श मानलेले नाहीत. भाषिक प्रश्न तर नाहीच नाही. मराठी भाषेला वाहिलेले स्वतंत्र भाषा संमेलन नसल्यामुळे भाषेचे प्रश्नही साहित्य संमेलनाने मांडावे हे स्वाभाविक आहे. देवनागरी लिपिसुधारणा व मराठी शुद्धलेखनासंदर्भातील अनेक ठराव साहित्यसंमेलनात मांडले गेलेले आहेत.

जागतिकीकरणानंतर झालेली मराठीची अवस्था पाहता आगामी साहित्यसंमेलनाकडून खूपच अपेक्षा आहेत. डोंबिवली येथे होणा-या नव्वदाव्या साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांनी संमेलनापूर्वीच मराठी भाषेच्या संवर्धनाचा मुद्दा चर्चेत आणला आहे. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना मराठीच्या प्रश्नाची चांगली समज आहे आणि मुख्य म्हणजे प्रामाणिक कळकळ आहे. मराठीचे सर्व आलबेल चालले आहे असे भासवणे, मराठीच्या प्रश्नावर काहीही भूमिका न घेणे किंवा असा काही गंभीर प्रश्न आहे हेच नाकारणे असे प्रकार साहित्यिकांकडूनही झालेले आहेत. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, वि.वा. शिरवाडकर, वसंत बापट यांनी मराठी समाजाला मराठीच्या प्रश्नावर खडबडून जागे करण्याचा व सत्ताधाऱ्यांचे कान ओढण्याचा जसा प्रयत्न केला तसा काहींनी मराठीच्या प्रश्नावर पाणी

ओतण्याचाही प्रयत्न केला. म्हणे मराठी भाषेला काही झालेलेच नाही व काही होणारही नाही कारण ती ज्ञानोबा-तुकारामांची भाषा आहे. ''जोपर्यंत खेड्यापाड्यांतून अडाणी, निरक्षर लाखो मराठी भाषक आहेत तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही. मराठी भाषेला काहीही झालेले नाही आणि भविष्यात काही होणार नाही अशी धारणा असलेला एक वर्ग मराठी साहित्यिकांमध्ये आहे. 'जोवर कीर्तनं रंगतायत, भजनं घुमतायेत, वारकरी आहेत तोवर तरी मराठीची काळजी करावी, असं मला अजिबात वाटत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचाही उगाच बाऊ करण्यात अर्थ नाही. आजच्या काळात इंग्रजीची उत्तम जाण हवीच आणि शाळा इंग्रजी असली तरी घरी मराठीचे संस्कार करता येतातच की. त्यात काय अडचण आहे? त्यामुळे मराठीचे भवितव्य उत्तम आहे. त्याबाबत चिंता नसावी.'' हे एका माजी संमेलनाध्यक्षांचेच उद्‌गार आहेत.

'कोण म्हणतो मराठी मागे?' ह्या आपल्या लेखात (सकाळ. दि.१३/८/२०१६) प्रसिद्ध लेखक, समीक्षक डॉ. गो.मा. पवार मराठीच्या स्थितीबाबत काय लिहितात ते वाचा - ''महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात जिव्हाळ्याने चर्चिल्या जाणाऱ्या विषयांपैकी एक विषय म्हणजे मराठीभाषेच्या भवितव्याबद्दल वाटणारी चिंता. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी १९२६ मध्ये 'मराठी भाषा मुमुर्षू आहे काय?' या शीर्षकाचा लेख लिहिला. त्याचा अर्थ मराठी भाषा मृत्युपंथाला लागली आहे काय?'' असा होतो. आपल्याविधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी सुशिक्षित मराठी माणसांचे शिक्षण, पत्रव्यवहार, ग्रंथलेखन इ. गोष्टी इंग्रजी भाषेतच चालतात, हे सांगून पुढच्या काळात मराठी भाषा केवळ घरगुती वापरापुरती मर्यादित राहील की काय, अशी सभय शंका प्रदर्शित केली. खरे तर, राजवाडे यांच्या आधीच्या काळात; तसेच त्यांच्या काळात कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री चिपळूणकर, श्रीधर व्यंकटेश केतकर, विठ्ठल रामजी शिंदे, त्रिंबक नारायण अत्रे यासारखे लेखक सकस मराठी लिहीत होते. मात्र त्याची दखल न घेता मराठीचा विकास खुंटल्याची हाकाटी सुरू झाली. पुढे स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर, माधवराव पटवर्धन इत्यादींनी भाषाशुद्धीची चळवळ सुरू केली व राजवाड्यांच्या विचाराला पाठबळ पुरविले. अलीकडेही काही विद्वान व राजकारणी मराठीच्या विकासाचा मुद्दा लावून धरताहेत. साहित्य संमेलनाच्या अधिवेशनातही मराठीच्या विकासाचा प्रश्नय कळकळीने मांडला जातो. मराठी भाषेची स्थिती चिंता करण्याजोगी आहे काय, हे पाहिले तर या हाकाटीत फारसे तथ्य नाही, असेच दिसून येईल.'

साहित्य संमेलनातील एका परिसंवादाला जमलेल्या गर्दीचा हवाला देत एका प्रथितयश कादंबरीकाराने आपल्या भाषणात मराठीच्या नावाने गळा काढणा-यांना ही चपराक असल्याचे म्हटले होते.

मराठी भाषेबाबत मराठी साहित्यिकांचीच अशी धारणा असेल तर संमेलनाच्या व्यासपीठावरून मिरवणारे राजकारणी कशाला मराठीसाठी काही करण्याचे कष्ट घेतील? जोवर मराठीचा मुद्दा निवडणुकीच्या यशापयशाशी थेट जोडला जात नाही तोवर राजकारण्यांना त्याच्याशी काहीच देणेघेणे नाही. आपल्या हे लक्षात येईल की महाराष्ट्रात, विशेषत: मुंबईसारख्या महानगरांत अमराठी भाषकांची संख्या जशी वाढते आहेतसे राजकीय पक्ष मराठीबाबत स्पष्ट भूमिका घेणे टाळू लागले आहेत.जात, धर्म आणि भाषा यांना एकाच तराजूत तोलल्यामुळे त्यांना भाषेचे राजकारण हे संकुचित व प्रतिगामी वाटू लागले आहे.

पडद्याआड जातीपातीचे राजकारण करणारे पक्ष भाषेचे राजकारण आले की मात्र नाके मुरडताना दिसतात. राष्ट्रीय पक्षांना तर प्रादेशिक भाषेचे नाव काढले की धडकीच भरते.जणू भाषेचे राजकारण ही समाजात भांडणे लावणारी, देश तोडणारी एक अभद्र आणि संकुचित गोष्ट आहे.आपण सर्वांना बरोबर घेऊन चालले पाहिजे. हा मराठी, तो अमराठी असा संकुचित विचार करणे बरोबर नाही. देश सर्वांचा आहे. महाराष्ट्रही सर्वांचा आहे.केवळ मराठीचे आणि मराठी भाषकांचेच हित पाहून कसे चालेल? राजकारण हे कसे उदारमतवादी आणि सर्वसमावेशक असले पाहिजे म्हणूनच संकुचित भाषावादी लोकांना आमचे राज्यकर्ते ऐकवतात, ''आम्ही आता सगळ्यांकडे लक्ष देणार आहोत. आम्हांला सर्व धर्म समान आहेत त्याप्रमाणे सर्व भाषाही समान आहेत.''

मराठीची राजधानी असलेल्या पुण्यात काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अधिवेशन झाले. अधिवेशनाच्या समारोपाच्या भाषणात पक्षाध्यक्ष श्री. शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आता बहुभाषकांचाही विचार करा असा संदेश देताना जे भाषाचिंतन केले ते राज्यात मराठीच्या भल्यासाठी भाषेच्या विधायक राजकारणाची अपेक्षा ठेवणाऱ्या मराठी भाषकांसाठी निराशाजनक आहे. महाराष्ट्रात एकहाती सत्ता आणायची असेल तर बहुभाषक आणि अल्पसंख्याकांच्या प्रश्नाकडे लक्ष द्या, असा धोरणात्मक आदेशच जणू शरद पवार आपल्या कार्यकर्त्यांना देतात. मुंबईसह पूर्ण महाराष्ट्र राज्य हे बहुभाषकांचे आहे. मुंबईत तर २७ टक्केच मराठी भाषक आहेत. बाकीचे सर्व इतर जाती-धर्मांचे लोक आहेत. मुंबई आणि महाराष्ट्राच्या विकासात या सर्वांचे मोलाचे योगदान आहे. त्यामुळे त्यांना डावलून चालणार नाही. मातृभाषा आणि आपल्या राज्याबद्दल प्रेम याचा अर्थ राष्ट्रभाषेचा द्वेष करावा, असा नाही. असे वर्तन देशाच्या एकात्मतेस मारक आहे असे सांगत पवार मनसे व शिवसेनेलाही त्यांच्या तथाकथित मराठी भाषेच्या राजकारणाबद्दल आपल्या टीकेचे लक्ष्य करतात.

शरद पवार यांनी त्यापूर्वीही मुंबईसारख्या शहरात वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक किती मोठ्या संख्येने वास्तव्य करून आहेत याची आकडेवारी देत भाषेवरून समाजात भांडणे नकोत असा सल्ला दिला होता. वरकरणी ही समंजस भूमिका वाटत असली तरी तिला भाषेच्या विधायक राजकारणापेक्षा सत्तेच्या राजकारणाचाच संदर्भ अधिक आहे. ज्यांना महाराष्ट्रीय जनता यशवंतरावजींचे मानसपुत्र मानते आणि ज्यांच्याकडून मराठी भाषेच्या व मराठी भाषकांच्या कल्याणाच्या रास्त अपेक्षा आहेत त्यांच्याकडून

ह्या प्रकारची भाषा अपेक्षित नव्हती. यशवंतरावांनी महाराष्ट्रात मराठीच्या विकासाचा संस्थात्मक पाया रचला. शरद पवार त्यावर कळस चढवतील अशी अपेक्षा होती. मात्र तसे घडले नाही. याचा अर्थ पवार हे मराठीविरोधी आहेत असा मुळीच नव्हे. राजकारणी म्हणून केवळ त्यांचेच उदाहरण येथे घेण्याचे कारण महाराष्ट्राचे ते प्रभावशाली व सुसंस्कृत समजले जाणारे नेते आहेत. साहित्यिक, विचारवंत यांच्यामध्ये त्यांचा वावर राहिला आहे. मराठी साहित्य, संस्कृती यांची त्यांना चांगली समज आहे. आणि मुख्य म्हणजे, अ.भा.मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारणी, रसिक वाचक म्हणून जाण्याची व भाषण करण्याची संधी त्यांच्याइतकी महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्याच नेत्याला लाभलेली नाही.

मध्यंतरी राष्ट्रवादीच्याच एका तरूण नेत्याने शाहू, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात भाषेचे राजकारण खपवून घेतले जाणार नाही असा इशारा देत मराठीचे तथाकथित राजकारण करणाऱ्या पक्षांना टीकेचे लक्ष्य केले होते. काही वर्षांपूर्वी सोनिया गांधी पनवेल येथील एका जाहीर सभेत आम्हांला सर्व भाषा समान आहेत असे म्हणाल्या होत्या. काय सुचवायचे आहे ह्या नेत्यांना? भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे त्याप्रमाणे भाषानिरपेक्षही राष्ट्र आहे असे सुचवायचे आहे? देशाची भाषावार प्रांतरचना ही ऐतिहासिक चूक होती आणि आता ती आपणास दुरुस्त करायची आहे असे सुचवायचे आहे? जातिपातीच्या राजकारणाप्रमाणे भाषेचे राजकारण हे हीन व निषिद्ध आहे असे सुचवायचे आहे? की त्यांना भारताची भाषिक व सांस्कृतिक विविधता पुसून टाकून इंग्रजी एकभाषिक राष्ट्राची निर्मिती करायची आहे?

कविवर्य कुसुमाग्रज, प्रा. वसंत बापट यांच्यासारखे फार थोडे साहित्यिक आहेत ज्यांनी मराठी भाषेचे वास्तव व त्यांना दिसलेले मराठीचे संभाव्य भवितव्य रेखाटून मराठी समाजाच्या आणि त्यांच्या नेत्यांच्या डोळ्यात अंजन घातले. प्रा. वसंत बापट यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत भरलेले संमेलन अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या मुद्द्यावर गाजले तरी प्रा. बापट यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेची जी कैफियत मांडली ती धोक्याची घंटा समजून मराठीसाठी काही धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज होती. इंदूरला डॉ. विजय राजाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या संमेलनात मराठी भाषेची श्वेतपत्रिका काढण्याचा ठराव संमत करण्यात आला. त्याचे काय झाले? पुढे याबाबत शासन काही करील याची अधिक वाट न पाहता मराठी अभ्यास केंद्राचे डॉ. दीपक पवार यांनी मराठी भाषेची (अ) श्वेतपत्रिका प्रसिद्ध करून सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला. चंद्रपूरच्या संमेलनात प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी उच्च शिक्षणातील मराठीच्या दुरवस्थेचा मुद्दा मांडला. चिपळूणच्या संमेलनात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी मराठीबाबत चर्चा खूप झाली, आता कृती करा असे आवाहन केले.

अशा प्रकारे साहित्य संमेलनांतून आणि त्यानिमित्ताने होणाऱ्या चर्चेतून मराठीच्या दुरवस्थेची कैफियत वर्षानुवर्षे मांडली जात आहे पण परिस्थिती सुधारते आहे असे मात्र दिसत नाही. महाराष्ट्र शासन गेली पाच-सहा वर्षे मराठी भाषेचे धोरण दळते आहे. ते जाहीर करण्यास अद्याप मुहूर्त सापडलेला नाही.मराठीबाबत काही करण्याची राजकीय इच्छाशक्ती नाही अशी टीका आपण करू शकतो. पण सत्ताधारी असा वेळकाढूपणा करू शकतात कारण मराठीबाबत सामाजिक इच्छाशक्तीही क्षीण झाली आहे. मराठी भाषक समाज म्हणून संघटितपणे आपण शासनाला कधी जाब विचारला आहे काय? राज्यात 'एक मराठा, लाख मराठा' आशा घोषणा देत लाखांचे मोर्चे निघतात तसे मराठीसाठी कुठे, कोणी मोर्चे काढले आहेत काय?भाषेपेक्षा जात, धर्म हीच ओळख बहुसंख्य मराठी समाजाला अधिक सुखावते आणि संघटित होण्याची प्रेरणा देते असा याचा अर्थ काढायचा काय? 'एक भाषक समाज' (Speech Community) म्हणून मराठी समाजाला काही अस्तित्व उरले आहे काय? की तो जातीपातींच्या उतरंडीत व राजकारणात आपला अवकाश शोधण्याला अग्रक्रम देतो आहे?

मराठी साहित्यापासूनच नव्हे तर मराठी भाषेपासूनच नवी पिढी दूर जाते आहे. त्याचे मुख्य कारण नव्वदोत्तर झालेले शैक्षणिक माध्यमांतर हे आहे. शिक्षणाच्या सर्व स्तरांवर मराठी भाषेची जागा इंग्रजी भाषा घेते आहे. उच्च शिक्षित, प्रभावशाली मराठी समाजाने आपल्या आर्थिक उत्कर्षासाठी मराठीऐवजी इंग्रजीची कास धरली त्याला अनेक दशके लोटली. देशी-परदेशी त्याची झालेली प्रगती(!) पाहून आता बहुजन वर्गही त्याचे अनुकरण करतो आहे. जात, धर्म यांच्यापेक्षाही स्वभाषेची मूल्यात्मकता आज घसरली आहे. कोणे एके काळी मराठी भाषेचा न्यूनगंड समाजात होता. आता त्याची जागा अपराधगंडाने घेतली आहे. अभिजनांना, राजकारण्यांना अपराधगंडाने ग्रासले आहे. मराठीचा आग्रह धरणे म्हणजे इंग्रजीचा द्वेष करणे. समाजाला मागे घेऊन जाणे. वंचितांना विकासाच्या संधी नाकारणे. इंग्रजीच्या सक्तीला त्यांचा विरोध नाही पण मराठीच्या सक्तीला पाठिंबाही नाही. भाषातटस्थतावादी किंवा भाषास्वातंत्र्यवादी असणे हे पुरोगामी मूल्य बनले आहे. मराठी भाषेच्या अंगाखांद्यावर खेळणारे आणि ज्यांचे व्यावसायिक हितसंबंध मराठी भाषेच्या सुरक्षिततेवर अवलंबून आहेत असे मराठीचे प्राध्यापक, पत्रकार यांनाही मराठीच्या बाजूने ठामपणे उभे राहण्यात संकोच वाटतो. अनेक अभ्यासू प्राध्यापक, पत्रकार मराठीच्या चळवळीपासून स्वत:ला अलिप्त ठेवतात. कदाचित त्यांची मुले इंग्रजी माध्यमात शिकत असल्यामुळे त्यांना अशी भूमिका घेणे नैतिकदृष्ट्या उचित वाटत असेल तर काहींना हे फॅसिस्ट असण्याचे लक्षण वाटते.

मराठी समाजातील सुशिक्षित आणि प्रभावशाली वर्गाच्या ह्या भाषिक अलिप्ततावादी भूमिकेची संमेलनाच्या व्यासपीठाने दखल घेऊन त्यावर व्यापक विचारमंथन घडवणे आवश्यक आहे. कारण ह्या भाषिक अलिप्ततावादाची तार्किक परिणती भविष्यात केवळ 'इंग्रजीवादा'त झाल्यावाचून राहणार नाही. तसे झाले तर भविष्यात मराठी साहित्य संमेलन हे केवळ उपचार म्हणून अस्तित्वात राहील. ग्रंथकारांच्या संमेलनाने सुरू झालेल्या मराठी साहित्यसंमेलनांची

फजागा 'इंग्लिश लिट फेस्ट' घेतील. त्याआधी अर्थातच नवीन पिढीला आकर्षित करण्यासाठी शिक्षणातील सेमी-इंग्रजीच्या पर्यायाप्रमाणे सेमी-इंग्लिश साहित्य संमेलने भरवली जातील. चेतन भगतसारख्या लेखकांना मराठीच्या व्यासपीठावर अमिताभ बच्चनच्या इतमामात बोलावले जाईल. त्याची सुरुवात झालीही आहे.


बहुजन समाज भाषेचे जतन करू शकतो. फार तर भाषेचा विस्तार करू शकतो. पण भाषेचे टोकाचे बरे-वाईट अभिजन वर्गच करू शकतो. 'Language is a dialect supported by elite' अशी भाषेची एक व्याख्या केली जाते. अभिजनांचा आश्रय गमावलेल्या भाषेचे प्राक्तन 'बोली' एवढेच उरते. मराठीतील भूतपूर्व साहित्यिकांची वर्तमान पिढी व ज्येष्ठ वर्तमान साहित्यिकांची पुढची पिढी कोणत्या भाषेला आपली प्रथम भाषा मानते? मराठीला की इंग्रजीला?

भाषिक अस्मितेच्या पलीकडे जाऊन मराठी भाषेचा आग्रह मराठी समाजाने का धरला पाहिजे याची शास्त्रपूत चर्चा हा मोठा विषय आहे. तो स्वतंत्र लेखाचा विषय होईल. भविष्यात सर्व जग एकभाषिक झाले तर ती पृथ्वीवरील आजवर घडलेली सर्वांत मोठी सांस्कृतिक दुर्घटना असेल असे डेव्हिड क्रिस्टल म्हणतो. कोणताही मनुष्य आपली सर्वोत्कृष्ट निर्मिती व अभिव्यक्ती स्वभाषेतूनच करू शकतो. भाषा म्हणजे काही धर्म नव्हे जिचा परभाषा आत्मसात करण्यासाठी त्याग करावा लागेल. बहुभाषक असणे हेच व्यक्तीच्या आणि जगाच्या हिताचे आहे.

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने होणाऱ्या विचारमंथनातून मराठी समाजाची भाषासाक्षरता वाढीस लागेल अशी आशा करूया.

– डॉ. प्रकाश परब
भ्रमणध्वनी ९८९२८१६२४०
parabprakash8@gmail.com

**॥ग्रंथाली॥**




**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

# मराठी विज्ञान परिषद - नाबाद ५१

## अ.पां. देशपांडे

विज्ञानाची ओळख सर्वसामान्य मराठी भाषकास व्हावी या हेतूने २४ एप्रिल, १९६६ रोजी, मराठी विज्ञान परिषदेची स्थापना एका जाहीर सभेत मुंबईत झाली. त्यानंतर गेली ५० वर्षे निरंतरपणे विज्ञान प्रसाराचे व्रत घेऊन कार्य करणाऱ्या परिषदेला अनेक आर्थिक, सामाजिक आणि संघटनात्मक अडचणींना सामोरे जावे लागले. तथापित त्या प्रत्येक परिस्थितीतून मार्ग काढताना विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक व्यवहारातील नितिमत्ता पाळून परिषदेने आपली एक वेगळी मानाची प्रतिमा समाजात निर्माण केली. सातत्याने मिळालेले उत्साही व निस्पृह कार्यकर्ते आणि विविध स्तरांवरून वेळोवेळी मिळालेले प्रोत्साहन हे तिच्या यशाचे गमक आहे.

आपल्या देशात वैज्ञानिक नियतकालिक चालविण्यासारखा एखादा विज्ञानाचा कार्यक्रम स्वबळावर खंड न पाडता आणि दीर्घकाळ चालवणे, हे जवळपास दुरापास्त आहे. या पार्श्वभूमीवर मराठी विज्ञान परिषदेने आपली दर्जेदार मासिक 'पत्रिका' सतत ४९ वर्षे चालविण्याबरोबरच विज्ञान प्रचार आणि प्रसाराचे साठाहून अधिक उपक्रम मोठ्या धडाडीने राबवून किमया केली आहे हे विशेष. तिचे महाराष्ट्रात ७२ तर महाराष्ट्राबाहेर ४ असे एकूण ७६ विभाग स्थापले जाणे हा विस्तारही मोठा विस्मयजनक आहे. तरी तिने वाटेत आलेले अडथळे कसे ओलांडले आणि स्वत:ची उपयुक्तता कशी टिकवली याची गाथा इतर संस्थांना मार्गदर्शक ठरू शकेल या उद्देशाने परिषदेच्या कार्याचा धांडोळा घेणारे हे पुस्तक आहे.

केवळ एका संस्थेचा इतिहास असे हे पुस्तक नसून आपल्या समाजाचा आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्यात होत गेलेले बदल यावर सोप्या भाषेत केलेले हे विचारमंथन आहे. सुवर्णमहोत्सवी मराठी विज्ञान परिषदेची ओळख पारदर्शकपणे देणारे हे पुस्तक वाचकांचा परिषदेशी सांधा जोडून देऊन त्यांना विज्ञान प्रसाराच्या या कार्यात भाग घ्यायला हे प्रेरणा देईल अशी आशा आहे.

विज्ञानाचा प्रसार मराठी भाषेतून सतत करून आणि त्याचप्रमाणे विज्ञानाचे जीवनात महत्त्व वाढवून मराठी विज्ञान परिषदेने ज्ञानाधिष्ठित समाज घडवण्यात जे योगदान दिले आहे त्याबद्दल उभा महाराष्ट्र मराठी विज्ञान परिषदेचा ऋणी राहील.

**– डॉ. रघुनाथ माशेलकर**

अनेक निष्ठावंत कार्यकर्ते सातत्याने संस्थेची देखभाल करत तिची उपयुक्तता वाढवत आहेत आणि मराठी विज्ञान परिषदेने 'पत्रिके'च्या स्वरूपात ज्ञान प्रसार देखण्या स्वरूपात अखंडितपणे चालू ठेवला आहे, हे कौतुकास्पद कार्य आहे.

**– डॉ. विजय आजगावकर, मधुमेह तज्ज्ञ**

# कुंचल्यातून तीर

**प्रदीप म्हापसेकर**








दचकू नकोस ग... माझा नवरा आहे तो...
रहस्यकथाकार आहे न...


हि आहे तर तुमच्या लिखाणातली प्रेरणा...
चला आत चला... आता माझी ऊर्जा बघा...


साहित्यातून जरा बाहेर याल का?...
चहा ठेवलाय तुमचा....



# निश्चलनीकरणाचे काही परिणाम

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

८ नोव्हेंबर २०१६ रोजी सगळी अमेरिका व बरंचसं जग अध्यक्षणीय निवडणुकीचा निकाल बघण्यास दूरदर्शनला चिकटलं असताना मोदींनी एका गफलतीच्या क्षणी भारताच्या अर्थकारणाला मोठा धक्का दिला. त्यांनी एकदम ५०० व १००० रुपये (१५ डॉलर)च्या नोटा रद्द करून त्याऐवजी नवीन ५०० व २००० रुपयांच्या नोटांचं प्रयोजन केलं. त्यामुळे अनेकांच्या काळ्या पैशाच्या संचिताची रद्दी झाली. भारताचं २५ टक्के अर्थकारण अशा पैशांतून होत असल्यामुळे जनसामान्यांपेक्षा राजकारणी व उद्योजकत्व कोंडीत पडते. मोदींच्या या धक्कातंत्रामुळे काळा पैसा एकदम मूल्यहीन होऊन तो विड्या किंवा सिगारेटस् शिलगावण्यायोग्य ठरला.

असं मोदींनी का केलं? भ्रष्टाचार करून अवैधपणे कमावलेल्या पैशाचं प्रमाण कमी करून अंधारातली लक्ष्मी उजेडात आणणे हे या मागचं उद्दिष्ट. असा पैसा करपात्र होत असल्यामुळे त्यात सरकारचं व पर्यायानं जनतेचं हितच होतं. काळ्या पैशाचं भूत भारताच्या मानगुटीवर स्वातंत्र्य मिळाल्यापासून बसलं आहे. मोदींच्या कारकिर्दीत मंत्री भ्रष्टाचार करीत असल्याचं अजून तरी उघडकीस आलं नाही. पण याचा अर्थ उरलेले बाबू एकदम राजा हरिश्चंद्राचे भक्त झाले असा कुणी करू नये. सर्वच ठिकाणी भ्रष्टाचार जसाच्या तसा आहे. खिरापत वाटल्याशिवाय कुठलंच काम होत नाही. सातव्या वेतन आयोगानं एक ट्रिलियन रु.ची बाबूंना पगारवाढ दिली तरी त्यांची भूक कमी झालेली नाही.

उद्योजक करचुकवेगिरी करण्यात तरबेज आहेत हे पटवून देण्यास कुठला पुरावा नको. यातला विरोधाभास असा की पैसे खाणारे बाबूच या सर्वात जास्त प्रामाणिक आहेत असं म्हणावं लागेल. त्यांना देशहिताचा उमाळा आला म्हणून नव्हे तर करचुकवेगिरी करणं कठीण म्हणून सरकार त्यांच्या उत्पन्नकराची मुळापासून कपात करते म्हणूनच की काय त्यांना वाममार्गानं पैसे कमावण्याचा मोह होत असावा. या काळ्या संचिताची फळं त्यांना चाखता येऊ नये म्हणून मोदींनी हे टोकाचं पाऊल उचललं.

आपल्या देशात उत्पन्नकर भरण्याचं प्रमाण फार कमी आहे. १.२१५ अब्ज लोकांमधले फक्त २० दशलक्ष लोक म्हणजे करदात्यांमधले ५ टक्के धाडसी देखील वितरणपत्र भरण्याच्या भानगडीत पडत नाही. हेच प्रमाण अमेरिकेत ४१ टक्के आहे.



याचा अर्थ भारतीय माणूस मुळातच त्याच्या गोऱ्या बांधवापेक्षा अप्रामाणिक आहे असा होत नाही. प्रामाणिकपणाचे वाटप करताना ब्रह्मदेवानं माणसाचा वर्ण लक्षात घेतला नाही.

याची दोन कारणं देता येतील. एक म्हणजे पाश्चात्त्य देशात रोख व्यवहार फार कमी होतात. एकतर पतपत्र (Credit card) वापरतात नाहीतर इलेक्ट्रॉनिक पद्धतीनं पैशाचं हस्तांतरण होतं. त्यामुळे मुद्राहीन (Cashless) समाज निर्माण झाला आहे. अशा व्यवहारात पैशाला कागदी 'शेपूट' असल्यामुळे सरकारला ते पकडून करचुकवेगिरी करणाऱ्यांना एकदम वठणीवर आणता येतं. याची परिणती हमखास कारावासात होते. चोरी करून किंवा शरीर विकून कमाई केली तर ती अर्थमंत्रालयाला आक्षेपार्ह वाटत नाही. पण त्या मिळकतीवर उत्पन्न कर भरला नाही तर सरकार बडगा उगारल्याशिवाय राहत नाही. म्हणून अमेरिकेत वाममार्गानं पैसे कमावणारे देखील वितरण पत्र भरण्याचं विसरत नाही. याप्रमाणे जवळजवळ सर्व व्यवहार कागदी पुराव्यानं होत असल्यामुळे व इथलं सक्तवसुली संचालनालय अतिशय कार्यक्षम व क्रियाशील असल्यामुळे करचुकवेगिरीचं प्रमाण फार कमी आहे. या संचालनालयाला अमेरिकेत इंटरनल रेव्हेन्यू सर्व्हिस (IRS) म्हणतात. लहान मुलांना पोलिसाचं नाव काढताच भीती वाटते तसं अमेरिकन माणसाला IRS चा नामोल्लेख करताच थरकाप होतो. त्यांच्याकडून टपाल येताच त्याची झोप उडून जाते. एवढा धाक या करवसुली संस्थेचा आहे. अमेरिकन माणसाला अणुबाँबपेक्षा IRS ची जास्त भीती वाटते असं म्हटलं तर चूक होणार नाही. कारण ते तीन अक्षरी नाव काढताच त्याच्यासमोर तुरुंगाचे गज उभे राहतात. त्यांनी केलेलं लेखापरिक्षण म्हणजे जिवंत माणसाला सोलणं. त्यातल्या वेदना फक्त संभाजीलाच ठाऊक. औरंगजेबनं त्याचा कसा छळ केला हे आपणा सर्वांनाच ठाऊक आहे.

भारतातला कारभार उलट आहे. आपल्या देशात ९० टक्के व्यवहार रोख भरून होतात. आम्ही स्टारबकमध्ये कॉफी घेतो ती पतपत्र वापरून. पण मंडईत भाजी विकत घेणाऱ्यानं तसं केलं तर भाजीवाला एवढा 'आ' वासेल की त्यात पृथ्वी बसावी. जगभर उबर (Uber) पतपत्रावर टॅक्सीचं भाडं आकारते. पण भारतात त्या कंपनीला अपवाद करावा लागला. तिला पैशाच्या हस्तांतरणासाठी जुनी पद्धतीचं वापरणं भाग पडलं कारण भारतात पतपत्राचं प्रस्थ अजून वाढलेलं नाही.

घर विकत घेताना आपण गृहकर्ज तर घेतोच पण त्याबरोबर काही किंमत टेबलाखाली भरतो. त्यामुळे ग्राहकाचा फायदा होत असला तरी सरकारचं नुकसान होतं. त्याचं कररूपी उत्पन्न घटतं. असा प्रकार अमेरिकेत चालत नाही. त्यामुळे सरकारला इतर कर लादण्याची जरुरी भासत नाही. पण भारतात करचुकवेगिरीची भरपाई करण्यासाठी अप्रत्यक्ष कर आकारावे लागतात. त्यामुळे वस्तूंच्या किंमती राहणीमानाच्या तुलनेनं जास्त आहेत. नाहीतर आयफोन, दूरदर्शन संच, आरामदायी गाड्या यासारख्या वस्तू अमेरिकेपेक्षा भारतात महाग का असाव्यात? त्या किमतीत मूल्यवर्धक कर, आयात कर, वस्तू व सेवा कर आणि निरनिराळे सेस (cess) दडलेले असतात. एखादा हेतूनिष्ठ कर म्हणजे सेस. सध्या भारतात शिक्षण, स्वच्छ भारत नावाचे सेस मी भरले आहेत. ते द्वाड सुरक्षा अधिकारी नसले असते तर मी अमेरिकेहून पेट्रोल भारतात आणून श्रीमंत झालो असतो. आपल्या देशात ते इंधन दुप्पट किमतीला मिळतं. त्यामुळे भारतात सोनं आणण्याऐवजी पेट्रोल आणलेलं हितावह नाही का?

जर सर्वांनी आपापला कर सरकारकडे पाठवला तर अशा अतिरिक्त करांची जरुरी राहणार नाही व वस्तूंचे दर अमेरिकेप्रमाणे कमी होतील. तसंच काळा पैसा व्याख्येनुसार करमुक्त असतो. त्याचं उच्चाटन केलं तर सरकारचं उत्पन्न वाढेल हे उघड आहे. हा पैसा मग सरकारला पायाभूत सुविधा उभारण्यास, रेल्वेत सुधारणा करण्यास वापरता येईल. त्यासाठी कर्ज काढण्याची जरुरी राहणार नाही.

मोदींच्या या धाडसी उपक्रमाची जगानं दखल घेतली. भारतातील ८० पेक्षा जास्त लोकांनी त्यांना पाठिंबा तर दिलाच पण टाईम या जगविख्यात साप्ताहिकानं २०१६चा मानवी बदल करणारी सर्वात महत्त्वाची व्यक्ती (Person of the year) म्हणून निवड करण्यासाठी वाचकांना मतदान करण्याचं आव्हान दिलं असता २४ नोव्हेंबर २०१६ पर्यंत सर्वाधिक मतं कुणाला मिळाली म्हणता? अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष ट्रंप? की ओबामा? अहं! तो मान मोदींना मिळाला हे विशेष. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीत हा नितीबदल करून निधी गोळा करणं म्हणजे एक साधी गोष्ट नव्हे. ते एक भीमकृत्यच, पण त्याचा श्रीगणेशा प्रधानमंत्र्यांनी केला ही जगाला एक स्तुत्य गोष्ट वाटली.

कुठल्याही प्रस्थापितांना बदल स्वागतार्ह वाटत नाही. यावेळीही तसंच झालं. ज्यांच्या अवैधपणे मिळवलेल्या नोटांचं इंधन झालं त्यांनी तीव्र विरोध दर्शवला. नवीन पैसे हाती नसल्यामुळे गोरगरिबांचे हाल झाले. दिल्लीत भिकाऱ्यांची संख्या घटली कारण कुणाच्यात हातात चिल्लर नव्हती. जी होती ती लोकं खिशात ठेवू लागले. डिझेलसाठी जवळ नवीन पैस नसल्यामुळे अनेक ट्रक्स रस्त्यावर पडून राहिले. तसंच अनेकांजवळ आपला भ्रमणध्वनी उर्जितावस्थेत ठेवण्यासाठी पैसे (Charge) नसल्यामुळे त्यांना लोक शिवाजीच्या काळात कसे राहत होते त्याचा अनुभव झाला. अनेक वर्षात प्रथमच त्यांना आईवडिलांशी, भावाबहिणींशी संवाद




करण्याची आठवण झाली, पण नवीन नोटांच्या अनुपलब्धीमुळे अनेक व्यवहार ठप्प किंवा कमी झाले. मुंबईत स्थापत्य व्यवहार बंद पडला म्हणे. सदनिकांच्या किमती ३० टक्के घसरल्या. काळ्या पैशाची साठवण स्थावर इस्टेटीत होत असल्यामुळे मुंबईतल्या पंचतारांकित सदनिका न्यूयॉर्कपेक्षा महाग. म्हणून त्यांचं अवमूल्यन बघून जनतेला पोटतिडिक आली नाही.

पण भारतीय बुद्धीच्या सर्जनशीलतेला जगात तोंड नाही. तिचा आपण गैरवापर करतो एवढंच. मोदींच्या जाळ्यातून बाहेर पडण्यास पूंजीपतींनी अनेक अभिनव मार्ग शोधून काढले. उद्योजकांनी मजुरांचे अनेक महिन्यांचे पगार जुन्या पैशात चुकते केले. अडीच लाख रुपयांपर्यंत प्रत्येकाला जुने पैसे नवीन पैशात रूपांतर करण्याची परवानगी असल्यामुळे याला कुणी अपेक्षार्ह समजणार नाही.

इतरांनी सोन्याकडे धाव घेतली. या धातूचे भाव भारतात एकदम वाढले. हे सोनं परदेशात नेऊन ते विकल्यावर त्यासाठी डॉलर मिळवले की त्याचं मातृत्व कृष्णधनात आहे असं कोण म्हणेल? या व्यवहाराचा मक्का म्हणजे दुबई. आतापर्यंत पिवळ्या नद्या त्या चिमुकल्या देशापासून भारतासारख्या मोठ्या देशाकडे वाहत होत्या. पण मोदींच्या योजनेमुळे त्यांचा प्रवाह उलटा झाला. आता सोन्याची गंगा देशाबाहेर पडली. परवाच मुंबई ते दुबई विमानात एक प्रवाशी २.५ किलो सोनं देशाबाहेर नेताना आढळून आला.

काही उद्योजकांनी तर जुनी ट्रिकच वापरली. त्यांनी खोट्या पावत्या लिहून आपला खप वाढवला. ही काल्पनिक वाढ लेखापालाच्या लक्षात येऊ नये म्हणून त्याला खिरापत वाढणं आलंच. बऱ्याच पूंजीपतींना गरिबांचं महत्त्व प्रथमच कळलं. प्रत्येकाला २.५ लाखापर्यंत नवीन पैशात रूपांतर करण्याचं स्वातंत्र्य असल्यामुळे कपडे धुणारी, पोळ्या लाटणारी, सफाई करणारी, वाहनचालक, माळी वगैरेंच्या खात्यात तेवढे पैसे भरले व मग काढून घेतले की झालं काम. त्यांचा वापर पुन्हा पुन्हा केला तर कोट्यवधी काळा पैसा धुवून निघू शकतो. भारतामध्ये जनधन योजनेत गरिबांनी दशलक्षांनी बँक खाते उघडलीत. ती सर्व रिकामी होती. पण मोदींचं सुतोवाच होताच होताच ती अकस्मात फुगली. काळ्या पैशाचं पांढऱ्या पैशात रूपांतर करण्यासाठी गरीब हे साधन ठरलं.

व्यवहार ठप्प झाल्यामुळे भारताचा वाढदर घटेल यात शंका नाही. त्याला १ टक्क्याची कात्री लागेल असं म्हणतात. परंतु हे नुकसान इतर सकारात्मक परिणामांमुळे भरून जाईल असं अर्थतज्ज्ञांचं म्हणणं आहे. भारतात ५०० व १००० रुपयाच्या एकूण १५ लाख कोटी नोटा आहेत. वर उद्धृत केलेल्या वाममार्गाचा कितीही उपयोग केला तरी सर्वच काळा पैसा उजेडात येणार नाही. सरकार म्हणतं की त्यातले ५ लाख कोटी रुपये अंधारातच राहून त्या नोटा मूल्यहीन होतील. आपली मध्यवर्ती बँक (RBI) त्या जागी नवीन नोटा छापून त्या सरकारला वापरण्यासाठी देईल. म्हणजे सरकारचं उत्पन्न तेवढ्या पैशानं एकदम वाढून मोदींची योजना बऱ्याच अंशी फलित झाली असं आढळून येईल.

त्यामुळे देशातील सर्वच पैसा उजेडात आला असं कुणी समजू नये कारण निश्चलनीकरण हे या उच्चाटनातली पहिली पायरी आहे. आपण या नंतर दुसरी पायरी ओलांडू असं मोदींनी जाहीर केलं आहे. भारतात बेनामी संपत्ती कितीतरी आहे. काळ्या पैशाचं ते माहेरघर. मुंबईतली रहिवाशी संकुलं हे याचं एक उदाहरण. आपल्या वित्त राजधानीत व पुण्यात हजारो संकुलं रिकामी आहेत. त्यामुळे विकसकाचं नुकसान होऊ नये म्हणून तो कमी किंमतीत त्यांची विल्हेवाट लावेल अशी अपेक्षा. पण पुरवठा वाढला की किमती घसरतात हा अर्थशास्त्राचा मूलभूत नियम इथे लागू पडत नाही कारण ती संकुलं काळ्या पैशाने बांधून त्याचं पांढऱ्या पैशात रूपांतर करण्याचं एक साधन झालं आहे. त्यामुळे बाजारपेठीय नियम त्यांना लागू पडत नाही. आपली इंडियन प्रिमियर लीग (Indian Premier League) भारतात अतियशस्वी झाली आहे. पण त्यातले अनेक क्लब बेनामी आहेत हे विशेष. त्यांचा खरा मालक कोण हे सांगणं कठीण. यावर बंदी घातली तर बराचसा काळा पैसा वैध होऊन जनतेचा फायदाच होईल.

मोदींच्या योजनेमुळे बँकातील बचत वाढेल असं अर्थमंत्री अरुण जेटली म्हणतात. त्यामुळे वित्तसंस्थांना जास्त कर्ज देता येईल. परिणामी अर्थकारणाला पुष्टी तर मिळेलच पण बँकांचा नफा वाढून त्यांची आर्थिक तब्येत सुधारेल. त्यामुळे देशाच्या वाढदरात २ टक्के वृद्धी होईल असं म्हणतात.

दुसरं म्हणजे देशात निश्चलनीकरणामुळे अंकीकरणाचं (digitalization) प्रमाण वाढून आपले अर्थव्यवहार एकविसाव्या शतकात शिरतील. सध्या देशात ९० टक्के व्यवहार रोख देऊन होतात. पण अंकीकरण वाढलं तर इलेक्ट्रॉनिक हस्तांतरण करण्याचं प्रमाण वृद्धिंगत होऊन रोखरहित (Cashless) समाज जन्माला येईल. असं अमेरिकेत, युरोप, जपान व चीनमध्ये झालं आहे. याबाबतीत आपण जगाच्या खूप मागे आहोत. पैशाचं विद्युत हस्तांतरण करण्यासाठी लागणाऱ्या सुविधा देशात उपलब्ध आहेत. या बाबतीत PayTM नावाची दिल्लीस्थित कंपनी महत्त्वाची आहे. स्मार्ट फोनच्या पटलावर टिचकी मारली की आपण चुटकीसरशी बिलं चुकतं करू शकतो. ही सेवा ग्राहकांना मोफत असते. त्यामुळे तिची वापर वाढत आहे. निश्चलनीकरण सुरू झाल्यावर त्याचं प्रमाण अजूनच वाढलं. पाश्चात्य देशात या ई-वालेटचा सर्रास उपयोग होत असल्यामुळे इथला समाज रोखविरहित झाला आहे. दुकानदाराच्या खात्यात रक्कम एकदम जमा होत असल्यामुळे तोही खुश असतो. अमेरिकेत तर सर्वत्र पतपत्र किंवा ई-वालेट वापरतं असल्यामुळे रोख कालबाह्य झाली आहे. खरं म्हणजे कुठलीही खरेदी करताना नोटा दिल्या तर तिथली लावण्यलतिका आपल्याकडे काहीशा तुच्छतेनं बघते कारण याचा अर्थ आपली पतपत्र मिळवण्याएवढी लायकी नाही असा होतो. कमी पतदर्जा असलेल्यां ग्राहकाचा आदर कोण करणार?

या गणिताला तीन अपवाद आहेत. कुणी अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारात गुंतलं असेल तर त्यासाठी अर्थातच ई-वालेट चालत नाही. तो विक्रीदार रोखच मागतो. दुसरं ठिकाण म्हणजे अमेरिकेला भेट देणारे पर्यटक. इते फ्लोरिडामध्ये दक्षिण अमेरिकेचे प्रवाशी खूप येतात. त्यांच्याजवळ मी नोटांची जाड बाडं बघितली आहेत. तिसरं म्हणजे अमेरिकेतलं भारतीय किराणा दुकान. इथले पटेल ब्रदर्स १५-२० डॉलरच्या वर खरेदी केल्यावरच पतपत्र वापरू देतात. बिल त्यापेक्षा कमी असेल तर रोखच भरावी लागते.

देशात ई-वालेटचा वापर वाढला तर नोटांची गरज घटेल, व्यवहार सुखकर व सोयीस्कर होतील आणि देश प्रगतिपथावर मार्गक्रमण करेल. म्हणूनच मोदींनी या विद्युत पाकिटाचा जास्त उपयोग करा म्हणून देशाला आवाहन केलं. त्यांच्या विधानात बरंचसं तथ्य आहे.


**– अनंत पां. लाभसेटवार**

latalabh@aol.com

(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनीचे चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)



**पुणेपोस्ट** दिवाळी विशेषांक २०१६ किंमत : १०० रुपये

अल्पावधित लोकप्रिय ठरलेल्या 'पुणे पोस्ट'चा विचार, आनंद आणि साथ देणारा दिवाळी अंक!

- आजपासून १०० वर्षांपूर्वी भारतीय स्वातंत्र्य लढा संक्रमणावस्थेत होता. टिळक युगाचा अस्त आणि गांधी युगाच्या उदयाचा हा काळ होता. या काळातील लो. टिळक आणि म. गांधी यांच्या संबंधावर प्रकाश टाकणारा लेख लिहिला आहे. निवृत्त न्यायमूर्ती **नरेंद्र चपळगावकर** यांनी.
- मुस्लीमविरोध हा रा. स्व. संघाच्या गाभ्यात कसा आहे, सांगताहेत ज्येष्ठ पत्रकार व विश्लेषक **निळू दामले**.
- अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या झालेल्या गळचेपीमुळे प्रख्यात तमिळ लेखक पेरुमल मुरुगन यांनी गेल्या वर्षी स्वतःच्या मृत्यू झाल्याचे घोषित केले होते, त्यांच्या ज्या 'माधोरूबागान' या कादंबरीला लक्ष्य करण्यात आले होते, त्या कादंबरीविषयी सखोल भाष्य केले आहे. कवी-लेखक **वसंत आबाजी डहाके** यांनी.
- **दोन मुलाखती :** आजपासून १०० वर्षांनंतर माणसाचं जग अस्तित्वात असेल की नाही? या गंभीर व स्फोटक प्रश्नांचा वेध घेणारी आंतरराष्ट्रीय विचारवंत **संदीप वासलेकर** यांची मुलाखत. - मुलाखतकार **मनोहर सोनवणे, प्रदीप खेतमर**.
- ज्येष्ठ नृत्य कलासाधक **मनिषा साठे** यांची मुलाखत- मुलाखतकार **हेमंत मेढी**.
- दोन शायर : **'साहिर लुधियानवी'** यांच्या 'तलखियाँ' वर लिहिताहेत **लक्ष्मीकांत देशमुख**
- **'निदा फाजली'** यांच्या आठवणी सांगताहेत- गझलकार **प्रदीप निफाडकर**
- **दोन रिपोर्ताज :** मेधा पाटकरांच्या आंदोलनातील धरणग्रस्त भागातील फेरफटका - **अंजली कुलकर्णी**
- लेह लडाखच्या आगळ्या भटकंतीचा - **नम्रता भिंगार्डे**
- याशिवाय, माधव कर्वे, संग्राम पाटील, सतीश देशपांडे, देवेंद्र सासणे यांचे लेख.
- गणेश मतकरी, ह. मो. मराठे, नीलम माणगावे, दीपक पारखी, दीपक चैतन्य व प्रदीप खेतमर यांच्या कथा.
- भारत सासणे, कृष्णात खोत, हिम्मत पाटील व मनोहर सोनवणे यांचे ललित लेख व महाराष्ट्रातील जुन्या-नव्या पिढीच्या नामवंत कवी-कवयत्रींच्या कविता.

**संपर्क : ७७२२००५०८१ । ९५५२३४०१६७**

isha tours
Lets explore the new world...

आनंदतरंग



# रम्य निळाई-अंदमान

**आत्माराम प्ररब, नरेंद्र प्रभू**

*रुपेरी वाळूत, माडांच्या बनात*
*मेंदीच्या रंगात, साथ ही निवांत*
*निळाई पाण्यात आणि आकाशात*
*गोडशा स्वप्नात, हाती तुझा हात*
*लाली आभाळात, जशी गुलाबात*
*लाली या गालात, सलज्ज भावात*
*लाडिक चाळ्यात, हळव्या स्पर्शात*
*चालले हातात गुंफूनिया हात*
*स्वप्नांच्या स्वप्नात, सागराची साथ*
*लाटांच्या भरात, चिंब चिंब न्हात*
*अथांग प्रितीत, ओली चिंब होत*
*हिरव्या चुड्यात, तुझिया मिठीत*

पर्यटकांना आपल्या विविध आकर्षणांनी लुभावणारा अंदमानचा प्रदेश म्हणजे खरं तर स्वप्नांचंच गाव आहे. स्वच्छ मोकळी हवा, निळेशार आरसपानी समुद्रकिनारे, माडांची बनं, हिरवाईने वेढलेली अनेक बेटं, पक्ष्यांचा स्वैर विहार, घनदाट जंगलं, सेल्युलर कारागृहासारखं ऐतिहासिक ठिकाण, विपुल सागरी संपत्तीने भरलेली विक्री केंद्रं, स्नॉर्केलिंग, स्कुबाडायिव्हगसारखे पाण्यातले क्रिडा प्रकार या सर्वांची मजा या एकाच सहलीत घेता येते.

अंदमान म्हटल्याबरोबर मराठी मनाला चटकन आठवण येते ती स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची. शिवरायांच्या महाराष्ट्राचं अंदमानशी देशप्रेमाचा धागा जोडणारं नातं आहे. दोन जन्मठेपेच्या काळ्यापाण्यावर वीर सावरकरांची बोटीतून रवानगी झाली आणि अंदमानच्या किनाऱ्याला बोट लागत असताना या वीराग्रणीच्या मनात विचार येत होते की भारताच्या संरक्षणात अंदमानचं महत्व अनन्यसाधारण आहे. या प्रदेशावर कायम आपलीच सत्ता पाहिजे. स्वातंत्र्यवीर बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकरांनी देशासाठी ज्या हालअपेष्टा सोसल्या, त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही, पण या मरणयातना सोशीत असतानाही वीर सावरकरांमधला कवी जागा होता. अंदमांच्या सेल्युलर जेलमध्ये आपण कधी गेलात तर त्या कारागृहामधल्या कुठल्याही कोठडीत फक्त अकरा मिनिटं बसून बघा. मी तो अनुभव घेतलाय. हे आपण आपल्या इच्छेने करतोय, कुठल्याही क्षणी आपण बाहेर जाऊ शकतो, इथे आपल्यावर कुठलच बंधन नाही हे सर्व माहित असूनही ती ११ मिनिटं तिथे असह्य होतात हा स्वानुभव आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी तिथे ११ वर्षं महाभयंकर अशा यमयातना भोगल्या आणि त्या भोगत असताना 'कमला'सारखं महाकाव्य लिहिलं, पंगतीभेद विसरायची दिक्षा दिली. कैद्याच्या अंगीचा बाणेदारपणा जिवंत ठेवला. जाज्वल्य देशप्रेम, भाषा आणि साहित्यावरची दांडगी हुकमत आणि असीम सकारात्मक आशावाद म्हणजे काय ते हे पुस्तक वाचल्यास समजून येतं.

वास्तविक क्षणोक्षणी आत्महत्येचेच विचार मनात यावेत

अशीच तिथली स्थिती होती. तसे ते भोग भोगत असताना प्रत्येक क्षणी केवळ देशाचाच विचार वीर सावरकरांनी केला होता. आज रम्य वाटणाऱ्या त्या कारागृहात गेल्यावर जर आपण त्या कोठडीत गेलात आणि ११ मिनिटं जरी थांबलात तरी मनाला, शरीराला ज्या यातना होतात त्यांचा अनुभव घेतला तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी या देशासाठी काय प्रकारची शिक्षा भोगली याची पुसटशी तरी कल्पना येते.

जेलर बारीने याच अंदमानच्या काळकोठडीत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर अनन्वित अत्याचार केले होते. सेल्युलर जेलमध्ये संध्याकाळच्या वेळी होणारा ध्वनिप्रकाशाचा नेत्रदीपक कार्यक्रम पाहिल्यावर स्वातंत्र्यसेनानींचं देशाप्रती असलेलं योगदान लक्षात येतं. सेल्युलर जेलवरून जवळचा परिसर आणि अथांग सागर यांचं विहंगम दर्शन घडतं. सावरकर पुण्यतिथीचा योग साधून २६ फेब्रुवारीला 'ईशा टूर्स'चे पर्यटक गेली सतत बारा वर्षं या तीर्थक्षेत्राला भेट देत आले आहेत.

मुंबईहून चेन्नई मार्गे विमानाने किंवा बोटीने पोर्ट ब्लेअर या अंदमानच्या राजधानीत पोहोचता येतं. पोर्ट ब्लेअरला पोहोचत असतानाच या आगळ्यावेगळ्या प्रदेशाचं सौंदर्य आपल्याला भुरळ पाडतं, त्या पाचूच्या बेटाचं निराळेपण लक्षात येतं. 'अंदमान' हे नाव रामायणातील 'हनुमान' या नावावरून पडल्याचं सांगितलं जातं. (हनुमान - हन्दुमान - अन्दुमान -अंदमान). भल्या पहाटे चन्नईहून विमानाने निघाल्यावर पोर्ट ब्लेअरला जरी सकाळी पोहोचलं तरी उन्हाचा कडाका जाणवतो, पण तिथल्या नारळपाण्याने मात्र जीव सुखावून जातो.

बंगालच्या उपसागरात थेट विषुववृत्ताजवळ असलेला देशाच्या पूर्व विभागात मोडणारा हा केंद्रशासित प्रदेश तसा इंडोनेशियाच्या जवळ आहे. अंदमान भारताचा अविभाज्य भाग असला तरी तो मुख्यभूमीपासून १२०० किलोमीटर दूर आहे. या भौगोलिक परिस्थितीमुळे या भागात गेल्यावर एका वेगळ्या भूभागात आल्याचा भास होतो.

अंदमान हे मुख्य बेट आणि जवळपास असलेली अनेक लहान लहान बेटं यांनी हा प्रदेश नटलेला आहे. पोर्ट ब्लेअरच्या जवळच नजरेच्या टप्प्यात दिसणारं रॉस आयलंड हे बेट हे पूर्वीचं राजधानीचं ठिकाण होतं. आता तिथे वसती नसली तरी आजही तिथे ब्रिटिशकालीन इमारतींचे अवशेष पाहायला मिळतात. पोर्ट ब्लेअरच्या धक्क्यावरून बोट पकडून दहा-पंधरा मिनिटांत रॉस आयलंडला पोहोचता येतं. तिथल्या धक्क्यावरून थोडं आत गेल्या गेल्या तिथे बागडत असलेल्या हरणांचं दर्शन होतं. बाजूलाच माडांच्या बनात मोर विहरत असतात. एखादा ससा इकडून तिकडे पळत जातो. एकूण काय समुद्रावरून येणारा वारा आणि नितांत सुंदर निसर्गाचा सहवास याने मन खरंच उल्हसित होतं. या छोट्याशा बेटावरून दिसणाऱ्या दीपगृहाचा देखावा आपल्याला ओळखीचा वाटतो, कारण वीस रुपयांच्या नोटेवर तो छापलेला आहे. एवढं करून हाती उरलेला वेळ नॉर्थ बे या






रमणीय किनाऱ्यावर गेल्यास ती संध्याकाळ नक्कीच सार्थकी लागते. दाट जंगल आणि त्याला लागून असलेला हा सागरकिनारा फक्त आपलीच वाट पाहात होता की काय असं वाटतं. नीरव शांतता आणि समुद्राचा वारा सायंकाळ साजरी करतो.

पोर्ट ब्लेअरमध्येच मत्स्यजीवन आणि मूळ रहिवासी यांच्या उत्क्रांतीविषयक संग्रहालय तसेच नौसेना अशा विविध संग्रहालयांना भेट देऊन तिथल्या प्रदेशाची माहिती आणि धावता आढावा घेता येतो आणि तिथल्या विक्री केंद्रांमधून आवडलेल्या वस्तू विकत घेता येतात. जवळच असलेल्या आशियातील सर्वात मोठ्या चाथम सॉ मिलला भेट दिली तर अवाढव्य लाकडाचे ओंडके आणि ते कापणारी तेवढीच मोठी लोखंडी पाती पाहता येतात. अंदमानच्या भू प्रदेशात असलेल्या जंगल संपत्तीचा फायदा करून घेण्यासाठी ब्रिटीश काळापासून या मीलचा वापा केला गेला होता.

पोर्ट ब्लेअर बेटापासून दोन तासांच्या अंतरावर बरातांग बेटावर आदिम संस्कृती असलेल्या जारवा आदिवासींची वसती आहे. शिवाय तेथील मड 'व्होलकॅनो' जगप्रसिद्ध आहेत. याच भागात चुनखडीच्या गुहा (लाइमस्टोन केव्ह) पाहण्यासारख्या आहेत. लाइमस्टोन केव्हला जाताना कांदळबनातून वाटकाढत जाणाऱ्या छोट्या बेटीतला प्रवास लक्षात रहाण्यासारखा आहे. अंदमानमध्ये कुठल्याही दोन ठिकाणच्या प्रवासादरम्यान जलवाहतूकीचा आसरा घ्यावा लागतो. लहान होड्या, पडाव, बोट, स्पीड बोट, हावर क्रॉप्ट अशा अनेक प्रकारच्या बोटी आपल्या दिमतीला तयार असतात.

अंदमानच्या या रमणीय परिसराची सफर हॅवलॉक बेट आणि राधानगर हा जगातील सात नंबरचा सुंदर समुद्रकिनारा यांना भेट दिल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. हॅवलॉक बेटावर जाण्याकरिता जलदगतीने जाणाऱ्या बोटींची व्यवस्था आहे. पोर्ट ब्लेअरहून दोन ते अडीच तासांत या बोटीने हॅवलॉक बेटावर पोहोचता येतं. समुद्राचा तळ दाखवणारं स्वच्छ निळंशार पाणी, सोसाट्याचा वारा आणि घनदाट जंगलानी वेढलेली छोटी छोटी बेटं यांचं दर्शन घेत हा वेळ कधी निघून गेला ते समजतही नाही. बोट धक्क्याला लागते आणि निवासाच्या ठिकाणी जाण्यासाठी आपण जेव्हा गाडीपाशी येतो तेव्हा तिकडे फेब्रुवारी महिन्यात गेल्यास तिथे पिकलेले आंबे मिळाले तर आश्चर्य वाटायला नको.

सकाळच्या वेळी एलिफंटा समुद्रकिनारी स्नॉर्केलिंग, पोहणे, स्कुबाडायव्हिंग, काचेचा तळ असलेल्या बोटीमधून समुद्र सफर आदी जलक्रीडांचा आनंद लुटता येतो. सागराच्या पोटात लपलेली रंगीत दुनिया याचि देही याची डोळा पाहण्याची गंमत काही औरच असते. निळ्याशार नितळ पारदर्शी पाण्यात, समुद्राच्या तळाशी असलेली प्रवाळं (Coral), रंगीत मासे, शेवाळ, शंख-शिंपले आणि पाण्याखालची सागरी संपत्ती न्याहाळण्याची दुर्मिळ संधी इथे साधता येते. स्नॉर्केलिंग सारखे क्रिडाप्रकार प्रत्येकाने अजमाऊन पहायला हरकत नाही.

हॅवलॉक बेट म्हणजे या सहलीतला परमोच्च बिंदू असतो.



विरळ वसती असलेलं शांत सुंदर गाव, सभोवार पसरलेला अथांग दर्या, घनदाट अरण्य आणि रात्रीला चांदण्यांनी भरलेलं आकाश. जीवनातली सुखस्वप्न रंगवायला यासारखी दुसरी जागा शोधून सापडणार नाही. रात्रीच्या वेळी, समुद्रकिनारी वाळूत पाय सोडून बसल्यावर सागराचं संगीत ऐकावं आणि त्या शांततेत हरवून जावं..... याच बेटावर एका बाजूला राधानगर सर्वांग सुंदर समुद्रकिनारा आहे. रुपेरी वाळूत फेरफटका मारून थकल्यावर जोजवणाऱ्या समुद्राच्या लाटांमध्ये स्नानाचा आनंद घेता येतो. अस्ताला जाणारं मोठ्ठं सूर्यबिंब मन:पटलावर आठवणी कोरत असताना कधी काळोख पडला समजतच नाही.

अंदमानच्या या सफरीत समुद्राची सैर अनेकदा घडते. एका अविस्मरणीय सफरीची सांगता झाली तरी पुढील आयुष्यात सतत आनंद देणाऱ्या आठवणी बरोबर घेऊनच आपण अंदमानचा निरोप घेतो. आशाच स्वप्निल वातावरणात भावबंध घट्ट होतात, माणसं आणखी जवळ येतात. इथे दिवस साजरे होतात, करावे लागत नाहीत.


**– आत्माराम परब, नरेंद्र प्रभू**

भ्रमणध्वनी ९८९२१८२६५५

दूरध्वनी : ०२२-२५४३७४१७ / २५४३७४५८

info@ishatours.net






# वाचकांचा सहभाग असलेला 'ग्रंथाली'चा वाचकदिन




'ग्रंथाली'चा बेचाळिसावा 'वाचकदिन' अर्थात 'साहित्य उत्सव भाषेचा' यावर्षी २४ डिसेंबर व २५ डिसेंबर २०१६ असा दोन दिवस, संपूर्ण दिवसभर आयोजित करण्यात आला होता. 'मराठी बोलूया; मराठीच्या उत्सवात सामील व्हा! वाचकदिनात सामील होऊया' अशा आराळ्यांनी दि. २४ डिसेंबर २०१६ रोजी सकाळी ९ वाजता दादर धुरू हॉल येथून 'ग्रंथदिंडी'ने या उत्सवाची सुरुवात झाली. 'ग्रंथदिंडी'तील प्रत्येकाने पुस्तकाचे पोस्टर आपल्या गळ्यात घातले होते. लेखिका मंगला केवळे व डॉ. उषा गुजराथी आवर्जून दिंडीत सहभागी झाल्या होत्या! ही सुमारे ६० ते ७० साहित्यिक, कलाकार, विद्यार्थ्यांची दिंडी १० वाजता कीर्ती महाविद्यालय, प्रभादेवी या संमेलनस्थळी पोहोचली. संमेलनस्थळी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून सभागृहापर्यंतच्या मार्गावर दोन्ही बाजूंना महाराष्ट्रातील नव्या-जुन्या कवींच्या कवितांचे (पोस्टर्स) फलक बनवून लावण्यात आले होते. या फलकांमध्ये गुरुनाथ सामंत, सतीश काळसेकर, वसंत दत्तात्रेय गुर्जर, वंसत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, अशोक नायगांवकर, अरुण म्हात्रे, संदेश ढगे, बालाजी सुतार, प्रतिभा सराफ इ. जवळपास १०० कवींच्या कवितांमुळे हा परिसर साहित्यमय झाला होता. अनेक महाविद्यालयीन तरुण-तरुणी या कवितांसोबत सेल्फी काढताना दिसत होते.

**अभिवाचन स्पर्धा**

सकाळी ११ वाजता 'अभिवाचन स्पर्धे'ला सुरुवात झाली. चंद्रकांत मेहेंदळे व श्री. श्रीनिवास नार्वेकर यांनी या स्पर्धेचे















समन्वयक म्हणून काम पाहिले. महाराष्ट्राच्या विविध शहरांतून, खेड्यांतून आलेल्या वाचकांनी, साहित्यिकांनी, रंगमंच तसेच पडद्यावरील कलाकारांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. ५३ समूहांच्या प्रतिसादामुळे स्पर्धा एकाच वेळी दोन वेगवेगळ्या मंचावर घेण्याचे ठरवून, प्राथमिक फेरीत दोन्ही गटांतून तीन-तीन संघांची निवड करून दिनांक २५ रोजी अंतिम फेरी घेण्यात आली. या स्पर्धेत प्रथम पुरस्कार पूनम चांदोरकर, हेमंत भालेकर. द्वितीय पुरस्कार राजश्री गढीकर, यशोधरा भिडे. तृतीय पुरस्कार प्रकाश भाटवडेकर, आशिष जोशी देण्यात आला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. चांगदेव काळे, ज्योती चांदोरकर, डॉ. उत्कर्षा बिर्जे, चंद्रकांत मेहेंदळे यांनी काम पाहिले.



**कलावंतांचे अभिवाचन**


त्यानंतर संध्याकाळी संपदा जोगळेकर, ललित प्रभाकर, दीपक करंजीकर, डॉ. उत्कर्षा बिर्जे, श्रीनिवास नार्वेकर, चंद्रकांत मेहेंदळे, अभिजित झुंझारराव, प्रज्ञा भाटवडेकर, दीपक करंजीकर यांनी अभिवाचनात सहभाग घेतला. दीपक करंजीकर यांनी ग्रेस, प्रज्ञा भाटवडेकर यांनी जयंत पवार, चंद्रकांत मेहेंदळे यांनी प्रकाश आमटे, श्रीनिवास नार्वेकर यांनी लक्ष्मण लोंढे, तर डॉ. उत्कर्षा बिर्जे यांनी नारायण सुर्वे यांच्या साहित्याचे अभिवाचन केले.

**नाट्य-चित्ररंग**



त्यानंतर पु.शि. रेगे यांच्या 'सावित्री' या कादंबरीचा एकपात्री रंगमंचीय आविष्कार प्रिया जामकर या अभिनेत्रीने सादर केला. हा दीर्घांक रवींद्र लाखे यांनी दिग्दर्शित केला होता. दि. २५ डिसेंबर २०१६ रोजी सकाळी ११ वाजता अरुण खोपकर दिग्दर्शित नारायण सुर्वे यांच्या जीवनावरील चरित्रपट तर १२ वाजता अतुल पेठे दिग्दर्शित बहिणाबाई यांच्या जीवनावरील चरित्रपट दाखविण्यात आला. त्यानंतर २ बाजता संदेश भंडारे दिग्दर्शित महाश्वेतादेवी





यांच्या कादंबरीवर आधारित 'म्हादू' सिनेमा दाखविण्यात आला. या चित्रपट प्रदर्शनाची जबाबदारी प्रल्हाद जाधव यांनी सांभाळली. जवळपास २०० रसिक या चित्रपट/चरित्रपटांस उपस्थित होते. त्यात 'पॉप्युलर'चे श्री. रामदास भटकळ, पंडित सत्यशील देशपांडे इत्यादी







महत्त्वाच्या व्यक्तींचा सहभाग होता.

चरित्रपट प्रदर्शन चालू असतानाच दुसऱ्या मंचावर 'वाचक कॉर्नर'ची सुरुवात झाली होती.

**वाचक कॉर्नर**

'वाचक कॉर्नर' ही संकल्पना प्रथम राबविण्याचे श्रेय 'ग्रंथाली'कडे जाते. या 'वाचक कॉर्नर'च्या मंचावर वाचकाला, त्याला आवडलेल्या लेख, कथा, कविता, नाट्यांशाचे वाचन करण्याची सुविधा होती. या 'वाचक कॉर्नर'चे उद्घाटन अंबरनाथ येथून आलेल्या 'बालभवन'च्या कुमार विठ्ठल पिके या चौथीतल्या मुलाच्या वाचनाने झाले. त्याने अशोक कौतिक कोळी यांच्या कवितांचे वाचन केले. त्यानंतर मुंबईसह, ठाणे, अलिबाग, वाशी, नेरुळ येथून आलेल्या ३७ वाचकांनी कोसला, बनगरवाडी, राधेय,



शाळा, आई समजून घेताना, कोल्हाट्याचं पोर, पथेर पांचाली, तिकडमजी, इत्यादी साहित्यकृतीचे वाचन केले. या 'वाचक कॉर्नर'ची जबाबदारी प्रा. दीपा ठाणेकर यांनी सांभाळली.

डिसेंबरच्या २५ तारखेला दुपारी दोन वाजता वाचक कॉर्नरवर 'मराठी अभ्यास केंद्रा'च्या सहकार्याने 'शिक्षणातील मराठी : दशा आणि दिशा' या विषयावरील चर्चा आयोजित करण्यात आली होती. सदर सत्रास शिक्षक व मराठी भाषाप्रेमींची उपस्थिती लाभली.

राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळेत पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य आहे, त्याप्रमाणे अमराठी माध्यमांच्या शाळेत आणि सर्व प्रकारच्या बोर्डांच्या शाळांत पहिलीपासून मराठी विषय अनिवार्य करावा, असे मत प्रा. मुकुंद आधंळकर यांनी मांडले.

इतर प्रगत देशांप्रमाणे आपल्याकडेही मातृभाषेतून मेडीकल, आभियांत्रिकी अशा विषयांचे शिक्षण मातृभाषेतून घेता आले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. यश वेलणकर यांनी केले. असे झाले तरच पालक आपल्या मुलांना मराठी माध्यमातून शिक्षण देण्यासाठी प्रवृत्त होतील असे ते म्हणाले.



मराठी अभ्यास केंद्राच्या कार्यकर्त्या डॉ. बीणा सानेकर यांनी शिक्षण क्षेत्रात मराठी इतकी दीन होण्यामागे मराठी विषयाला शासनाने दिलेले सतराशे साठ पर्याय मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत असे मत मांडले. काही वर्षापूर्वी शासनाने मराठी विषयाला आयटीसारखा विषय पर्याय म्हणून दिला. त्यातच अलीकडे काही महाविद्यालयांनी फ्रेंच, जर्मन, जपानी अशा परदेशी भाषांचे पर्याय मराठीला द्यायला सुरुवात केल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील मराठी टक्का मोठ्या प्रमाणात घसरायला सुरुवात झाली. यामागील आर्थिक बाजूही डॉ. सानेकर यांनी विस्ताराने मांडली.

मराठी माध्यमांच्या शाळेत विविध उपक्रम राबवले तर पालक निश्चित मराठी माध्यमाकडे वळतील असे मत राजकीय-सामाजिक कार्यकर्ते दत्ता बाळसराफ यांनी मांडले. 'माध्यम मराठी आणि उत्तम इंग्रजी' हे शालेय शिक्षणाचे सूत्र असले पाहिजे असेही ते म्हणाले.

शिक्षणक्षेत्रातील मराठीच्या सदर प्रश्नांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी निवेदन सादर करावे असा ठराव या चर्चेच्या अखेरीस मांडण्यात आला.

सायंकाळी ४ वाजता अभिनेते संजय मोने, अभिनेत्री शर्वरी पाटणकर, पटकथाकार अंबर हडप यांच्या हस्ते 'अभिवाचन स्पर्धे'ची पारितोषिके प्रदान करण्यात आली.



**पुस्तक प्रकाशन**

मान्यवरांच्या हस्ते या वाचकदिनी नऊ पुस्तकं प्रकाशित करण्यात आली. पुस्तक संपादनात आल्हाद गोडबोले, डॉ. बीणा सानेकर, डॉ. लतिका भानुशाली आणि प्रा. साधना गोरे यांचे सहकार्य लाभले.


सलग २५ दिवस आपल्या सहकाऱ्यांसोबत अनुभवलेलं मृत्यूचं तांडव अत्यंत प्रभावीपणे कथन करणारे आत्माराम परब आणि तितक्याच उत्कटपणे ते शब्दबद्ध करणारे नरेंद्र प्रभू यांच्या 'लडाख .... प्रवास अजून सुरू आहे' या पुस्तकाचं प्रकाशन प्रसिद्ध अभिनेते संजय मोने यांच्या हस्ते झालं.



वारसागत मिळालेल्या प्रवासाच्या छंदाने देशविदेशात भटकंती करता आली आणि त्या भटकंतीनेच ज्यांना अभिव्यक्त होण्याची सवय लावली त्या लेखिका स्मिता भागवत यांच्या 'सफरनामा' या पुस्तकाचं प्रकाशन कवी सतीश काळसेकर यांनी केलं.



साहित्य आणि ग्रंथालय चळवळीशी जवळचा संबंध आणि कथालेखन या साहित्यप्रकारावर निर्विवाद हुकूमत असणाऱ्या चांगदेव काळे यांच्या 'आता काय करायचं...' या पुस्तकाचं प्रकाशन कवी सतीश काळसेकर यांच्या हस्ते झालं.




ध्यानाविषयी वेगळी माहिती देणारा आणि ध्यानाविषयी वेगवेगळ्या विचारधारा असणाऱ्या पाच मित्रमैत्रिणींचा वादसंवाद 'सुंदर ते ध्यान' या पुस्तकातून डॉ. यश वेलणकर यांनी मांडला आहे. या पुस्तकाचं प्रकाशन कवी बसंत दत्तात्रय गुर्जर यांनी केलं.




'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१६' या सुधीर आणि नंदिनी थत्ते लिखित पुस्तकाचं प्रकाशन कवी वसंत दत्तात्रय गुर्जर यांच्या हस्ते झालं. हे पुस्तक म्हणजे गेल्या २१ वर्षांपासून नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची गोष्टीरूपाने यथार्थ वैज्ञानिक माहिती देणारा आणि देशविदेशांत ज्याची नोंद घेतली गेली असा उपक्रम आहे.




अर्चना गाडेकर-शंभरकर लिखित 'सोलमेट' या पहिल्याच कादंबरीचं प्रकाशन कवी गुरूनाथ सामंत यांनी केलं. एका सामान्य स्त्रीच्या जीवनातलं सामान्यत्वच कथेला विलक्षण पातळीवर घेऊन जातं हा अनुभव या पुस्तकातून व्यक्त होतो.




स्त्री-मनाच्या नाजूक भावविश्वाशी बांधली गेलेली गोष्ट म्हणजे लग्न - दुसरेपणावर दिलेल्या मुलीचं बरकरणी स्थिर वाटणारं आयुष्य आणि २० वर्षांपूर्वीचा कालखंड उलगडणारी डॉ. सई लळित यांची पहिली कादंबरी 'मिरग' कवी गुरुनाथ सामंत यांच्या हस्ते प्रकाशित झाली.




स्त्री-मनात साठलेली खळबळ, खदखद मनाच्या तळाशीच राहते आणि वरवर दिसतात ते केवळ तरंग. संवेदनशील मनात उठलेले हे तरंग आपल्या पहिल्याच कवितासंग्रहातून व्यक्त करणाऱ्या कवयित्री दमयंती भोईर यांच्या 'तरंग उदकाचे अंग' या पुस्तकाचं प्रकाशन कवी सतीश काळसेकर, गुरूनाथ सामंत वसंत दत्तात्रय गुर्जर या तिघा कवींच्या हस्ते झालं.




ज्ञानदा देशपांडे यांनी १९९२ ते २०१६ पर्यंत लिहिलेल्या आणि परमेश्वर, नाती, स्वत:चा शोध या तीन संकल्पनांभोवती गुंफलेल्या कविता पुस्तकरूपाने एकत्रित स्वरूपात प्रकाशित झाल्या. प्रसिद्ध लेखिका, कादंबरीकार आणि कवयित्री मेघना पेठे यांनी या कवितासंग्रहाचं प्रकाशन केलं.




**कविसंमेलन**

यानंतर सायंकाळी ५ वाजता या 'वाचकदिना'च्या कळसाध्यायाला सुरुवात झाली. 'ग्रंथाली'ने आयोजित केलेले कविसंमेलन संस्मरणीय ठरले. याचे कारण म्हणजे या कवी-संमेलनात साठोत्तरी असूनही समकालीन कविता लिहिणारे पाच कवी आमंत्रित करण्यात आले होते. यात प्रत्येक कवीला वाचनासाठी सलग १५ मिनिटे देण्यात आल्यामुळे प्रत्येक कवीच्या लेखनाचा आलेख रसिकांना आनंद देऊन गेला. सतीश काळसेकर यांनी 'वयाला साजेसे', 'अरुण कोलटकर' तर गुरुनाथ सामंत यांनी 'प्लीज डोन्ट डिस्टर्ब मी', 'नाटक' व वसंत दत्तात्रेय गुर्जर











यांनी 'अंबई', अशा कविता सादर केल्या. त्यामुळे रसिकांसाठी हे संमेलन संस्मरणीय ठरले. या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन कवी, नाटककार किरण येले यांनी मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, जर्मन, तुर्की कवितांचे अंश सादर करत तसेच रतन थिय्याम, अल्फ्रेड हिचकॉक, द.भि. कुलकर्णी यांच्या आठवणी व किस्से सांगत केले.

**संगीत मैफल**

सात वाजता हे कवीसंमेलन संपले व त्यानंतर पंडित सत्यशील देशपांडे यांच्या मैफलीस प्रारंभ झाला.



प्रसिद्ध गायक, संगीतकार, संशोधक, संगीततज्ज्ञ, विचारवंत पं. सत्यशील देशपांडे यांच्या 'संगीत आणि साहित्य' या सांगितिक कार्यक्रमाने ग्रंथालीच्या वाचकदिनाची सांगता झाली. साहित्याचाही उत्तम व्यासंग असणारे पं. सत्यशील देशपांडे हे उत्तम वाचक आहेत.

संगीत अभ्यासक आणि श्रोत्यांसाठी पंडितजींचा हा संवाद संगीत आणि साहित्याचा सजगपणे, निखळपणे कसा आस्वाद घ्यावा याचा वस्तुपाठ ठरला.

या वाचकदिनास बालसाहित्यकार अनंत भावे, समीक्षक पुष्पा भावे, प्रकाशक रामदास भटकळ, कवयित्री मेघना पेठे, सुप्रसिद्ध निवेदक दत्ता बाळसराफ, 'झी' मराठीचे क्रिएटिव्ह हेड निलेश मयेकर, साठ्ये महाविद्यालयाच्या प्राध्यापिका अपूर्वा मयेकर, नाशिकचे कवी संजय चौधरी, शरद पुराणिक, गुहागरचे कवी प्रा. बाळासाहेब लबडे, मॅक्सम्युलर भवनच्या जर्मन अभ्यासक जयश्री हरी जोशी, कवी संदेश ढगे, कवी सतीश सोळांकूरकर, कवी प्रवीण दामले, पोस्टर बॉईज चित्रपटाचे कार्यकारी निर्माते भूषण तेलंग, गझलकार चंद्रशेखर सानेकर, बनमस्का मालिकेतील अभिनेत्री श्रेया तळपदे, अभिनेते सुधीर चित्ते, सुप्रसिद्ध अभिनेता रमेश भाटकर, कवयित्री मृदुला भाटकर, साहित्यिक कुमार नवाथे,





























नीरजा इत्यादी अनेक साहित्यिक व बाचक उपस्थित होते. जबळपास ८०० रसिक, साहित्यिकांनी या संमेलनाचा आनंद घेतला.

वाचकदिन यशस्वी करण्यास कीर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एन. मगरे, उपप्राचार्य डी.व्ही. पवार आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

पद्मभूषण देशपांडे, धनंजय गांगल, धनश्री धारप, यांच्यासह किरण येले, चंद्रकांत मेहेंदळे, श्रीनिवास नार्वेकर, अस्मिता पांडे, दीपा ठाणेकर, प्रल्हाद जाधव, सायली जाधव, सायली राणे, अंजना कांबळे, श्रीधर पाटील यांनी श्रम घेतले.

नंदकुमार पाटील यांनी सजावट केली तर योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे, हरिप्रसाद जयस्वाल यांनी पडद्यामागची जबाबदारी सांभाळली.

या कार्यक्रमास सारस्वत बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, एलआयसी, ठाणे भारत सहकारी बँक यांचे प्रायोजकत्व लाभले. कार्यक्रम प्रसिद्धीबद्दल 'झी'चे विशेष आभार.

– सुदेश हिंगलासपूरकर

## पुस्तक प्रकाशन वृत्तांत

# श्रीपाद भालचंद्र जोशींची कविता दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन थकरणारी श्रेष्ठ कविता : उत्तम कांबळे




''गेल्या चाळीस वर्षांहून अधिकच्या अस्वस्थ वर्तमानात श्रीपाद भालचंद्र जोशी यांची कविता जीवनाचे सूक्ष्मातिसूक्ष्म आयाम कवेत घेत अविरतपणे दीपस्तंभासारखी उभी असून या कवितेने आपली अभिरुची समृद्ध केली आहे,'' असे उद्गार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे एक पूर्वाध्यक्ष, ज्येष्ठ संपादक उत्तम कांबळे यांनी श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांच्या 'मथितार्थ' आणि 'इत्यादि' या त्यांच्या 'ग्रंथाली' प्रकाशित अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या कवितासंग्रहांचे प्रकाशन करताना काढले.

'ग्रंथाली' तसेच महाराष्ट्र कला हितकारिणी सभा, प्रगतिशील लेखक संघ आणि पश्चिम महाराष्ट्र सांस्कृतिक परिषद यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस ह्यांच्या अध्यक्षतेखाली केले होते.

कविता संग्रहावर बोलताना प्रा. मिलिंद जोशी म्हणाले की, कवि अनिलानंतर प्रथमच साहित्य महामंडळाला श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या रुपाने नामवंत कवी असणारी व्यक्ती अध्यक्षपदी लाभली आहे. त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक चळवळीतील समृद्ध व्यक्तित्वाने केलेल्या दिशा दिग्दर्शनाप्रमाणेच त्यांच्या कवितेने त्यांच्या पिढीचे व गेल्या चार दशकातील मराठी कवितेचे सक्षम व समर्थ असे प्रतिनिधित्व केले असून मराठी कवितेला आवश्यक ते वळण देत दिशा दिग्दर्शनही केले आहे.''

डॉ. आश्विनी धोंगडे यांनी या कवितेचे विविधांगी स्वरूप आणि तिने कवेत घेतलेले समग्र जीवन उलगडून दाखवीत हा कवी क्रांतिकारक, समाजपरिवर्तनापासून तो सखीसोबतच्या प्रणयजीवनाच्या समृद्ध छटापर्यंत आणि विवेकी व विचारशील समाज निर्मितीच्या टप्प्यापासून तो तरुण मुलांच्या इष्ट बंडाचे स्वागत करणाऱ्या प्रेमळ सहृदय पित्याच्या भूमिकेपर्यंत सारख्याच ताकदीने अभिव्यक्त होत मराठी कविता कशी समृद्ध करत नेतो त्याचे विवेचन केले.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, ''आधुनिक अथवा उत्तर आधुनिक अशा कोणत्याच विशिष्ट चौकटीने बांधलेल्यांसमोर श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या कवितेला कुठे ठेवायचे हा प्रश्न सततच कायम राहिला आहे, समीक्षेच्या साऱ्या रुढ संकल्पना चौकटीत न मावणारी ही कविता असून ती एकाच वेळी सारखीच समाजनिष्ठ आणि आत्मनिष्ठ आहे, मराठीत हा कवी व त्याची कविता त्यामुळे पूर्णपणे वेगळी, एकमेव व स्वसामर्थ्यानिधी ठामपणे उभी आहे.''

या कवितेचे गेल्या चार दशकातील तिचे स्वायत्त व वेगळे स्थान प्रदान करणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना कवी श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी त्यांना सतत अस्वस्थ राखणाऱ्या वर्तमानाचे सखोल विश्लेषण करीत कवीच्या अभिव्यक्तीत असणारे समाजाचे योगदान अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन कवी उद्धव कानडे ह्यांनी केले, आभार प्रदर्शन राकेश वानखेडे ह्यांनी केले.

कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर लेखक, कवी आणि रसिक उपस्थित होते.




**अ.पां. देशपांडे लिखित**
**'मराठी विज्ञान परिषद – नाबाद ५१'**
**पुस्तक प्रकाशन समारंभ**
**राज्यपाल डॉ. विद्यासागर राव यांच्या हस्ते**
**१७ डिसेंबर २०१६ रोजी संपन्न झाला.**
**त्या समयी डॉ. भानुशाली**
**लेखक अ.पां. देशपांडे**
**डॉ. अनिल काकोडकर**
**राज्यपाल डॉ. विद्यासागर राव**
**ठाणे महापौर सुनील मोरे**
**डॉ. जे.बी. जोशी**
**श्री. देशमुख**
**आणि ना.द. मांडके**

## ॥ग्रंथाली॥


द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० ● granthaliruchee@gmail.com www.granthali.com





### विश्वसंचारी : अनंत पां. लाभसेटवार मूल्य ७०० रु. सवलतीत ४०० रु.

घरी बसून देशांतर करण्यास व पर्यायानं नवीन लोक, संस्कृती, चालीरीती आणि राजकारण अभिज्ञ होण्याचे अनुभव पदरात पाडण्यास हे पुस्तक उपयोगी पडेल असं वाटतं. साहित्याप्रमाणे पर्यटनातही मनुष्य सुसंस्कृत, प्रगल्भ व विस्तृत दृष्टिकोनाचा होतो यात शंका नाही. पुस्तकांचा अभ्यास करण्याएवढंच जगातल्या लोकांचे चेहरे वाचल्यानं मनुष्य ज्ञानालंकृत होतो. दुसरे कसे राहतात, कसे विचार करतात, त्यांची सुखदु:खे समजून घेतली तर जगातला कलह कमी होऊन मैत्रीची नाळ जोडण्यास मदत होईल.

### ना पूर्व, ना पश्चिम : डॉ. बाळ फोंडके मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.




आज घरबसल्या आपल्या मोबाईल फोनवरून देशविदेशात मुक्त संचार करण्याजोगी परिस्थिती असताना चातुर्य येण्यासाठी देशाटनच करण्याची गरज आहे का असा प्रश्न कोणालाही पडेल. त्याचंच स्पष्ट आणि सचित्र उत्तर या अनोख्या प्रवासवर्णनातून मिळावं. डॉ. बाळ फोंडके यांनी केवळ सामान्य पर्यटकाच्या यादीत नसलेल्या पर्यटनस्थळांचाच फेरफटका घडवलेला नाही तर त्या यादीत असलेल्या स्थळांच्या वैज्ञानिक दृष्टीतून पाहिलेल्या पैलूंचीही ओळख ललितशैली कायम ठेवून, हसतखेळत मनोवेधक वैज्ञानिक पार्श्वभूमी सादर करून दिली आहे.





### सूर्य होता रात्रीला : मेधा अलकारी मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.

'केल्याने देशाटन' ह्या गोष्टीची नवलाई आता फारशी राहिलेली नाही. ह्या पार्श्वभूमीवर, असं काही लेखन करायचं तर त्यामागची वृत्ती खूप स्वतंत्र, स्वधर्मी आणि स्वच्छंदही असायला हवी आणि त्या जोडीला हवी एक स्वत:ची नजर, मनमुक्त... निरागस तरीही बहुश्रुत... अभिव्यक्तीपूर्ण. सहप्रवासाची जाणीव आणि तरीही एकटं होण्यातला सुटेपणा ह्यांची इथं होणारी सरमिसळ सहज–सुंदर आहे. त्यामुळे हे पुस्तक निवांत, सावकाश वाचायला हवं. नव्हे, वाचायलाच हवं. – सुधीर मोघे


### लडाख... प्रवास अजून सुरू आहे – आत्माराम परब, नरेन्द्र प्रभू

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.




या पुस्तकाने पार झपाटून टाकले. एकदा वाचून समाधान झाले नाही म्हणून पुन्हा वाचावयास घेतले. संघर्षमय प्रवास नेमका कसा असतो याची अनुभूती लाभली... सारे काही थरारक. आपल्यासमवेत अन्य पर्यटकांनाही लडाखचे प्रेम लावलेत तेही अफलातूनच. मृत्यूचे तांडव पराकोटीची भूक, ढासळणारे मनोधैर्य साऱ्याची प्रचिती मनाला धग... उत्सुकता लावून गेली. एकदातरी लडाखला भेट द्यायला हवी एवढी उर्मी या पुस्तकाने दिली. आपण लडाख सचेत केला आहे.

**– प्रसिद्ध समाजसेवक डॉ. विकास आमटे आणि डॉ. भारती आमटे, वरोरा**




### नृत्यगाथा कथ्थकच्या अंतरंगाचा मागोवा : नृत्यालंकार वैशाली दुधे

मूल्य ७०० रु. सवलतीत ४०० रु.

'नृत्यगाथा', एका नृत्यशिक्षिकेने आपल्या विद्यार्थिनींसाठी लेखणी हाती धरण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न. प्रस्तुत लेखन हे जरी आखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या प्रारंभिक ते अलंकार परीक्षांच्या अभ्यासक्रमावर आधारित असले तरी भारती विद्यापीठ, प्रयाग समिती, नालंदा विद्यापीठ, इंदिरा कला संगीत विश्व विद्यालय तसेच मानसिंग तोमर विश्वविद्यालय अशा अनेक विद्यापीठांच्या कथ्थक अभ्यासकांना मार्गदर्शक ठरावे.


बी. केशरशिवम यांच्या आत्मचरित्राचे शीर्षक 'पूर्णसत्य' हे अर्थपूर्ण आहे. याचा अर्थ या आत्मचरित्रातील तपशील अंशतः किंवा बराचसा सत्य नसून, तो पूर्ण सत्य आहे. आत्मकथन वा आत्मचरित्र लेखनाची पूर्व अट पूर्णसत्य हीच असते. या अटीला जागून बी.केशरशिवम यांनी हे लेखन केले आहे. खरं तर मराठीतील असो वा हिंदीतील किंवा इतर भाषांतील दलित लेखकांची आत्मकथने सत्यकथन ही पूर्व अट कसोशीने पाळताना दिसतात. यात अपवाद असतीलही पण विचारांची स्पष्टता असल्याशिवाय असा वेदनादायी भूतकाळ चित्रित करणं जिकीरीचं असतं. लेखकाचा कस पाहणारं असतं. कारण लेखन करताना मानसिक पातळीवर त्या जीवनानुभवाशी पुन्हा संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष पेलणं तारेवरची कसरत असते.

'पूर्णसत्य' या आत्मचरित्राचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात लेखकाने आपली जडणघडण सांगितली आहे. जन्मापासून ते गुजरात प्रशासनात नोकरीला लागेपर्यंतचा काळ पहिल्या भागात कथन करण्यात आला आहे. दुसऱ्या भागात प्रशासकीय कारकिर्दीचा कालखंड लेखकाने उलगडून दाखवला आहे. पहिल्या भागात दारिद्र्याशी झुंज आणि शिक्षणासाठी संघर्ष या गोष्टी चित्रित झाल्या आहेत तर दुसऱ्या भागात आंबेडकरी विचारप्रणाली स्वीकारत काम करणारा धडाडीचा प्रशासकीय अधिकारी दिसतो. स्व.इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंहराव हे माजी पंतप्रधान, राष्ट्रपती आर.के. नारायण, काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष श्रीमती सोनिया गांधी, गुजरात राज्याचे अनेक राज्यपाल या दिग्गजांचा सहवास बी. केशरशिवम यांना लाभला पण एक खंत त्यांनी व्यक्त केली आहे आणि ती म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास त्यांना लाभू शकला नाही. बाबासाहेबांचा सहवास लाभू शकला नाही याची सल त्यांच्या मनात कायम आहे. डॉ. आंबेडकरांचा विचार आणि चळवळ ही प्रेरणा दलित लेखकांनी शिरोधार्य मानली त्यामुळे त्यांचे ज्वालाग्राही अनुभव त्यांनी निर्भीडपणे आणि प्रांजळपणे आविष्कृत केले. बी. केशरशिवमदेखील या गोष्टीला अपवाद नाही. आयुष्यभर या लेखकाने बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण ठेवून वाटचाल केली. महसूल विभागाच्या प्रशासनामध्ये अधिकारपदावर असताना वंचित-दुर्बल घटकांना शासकीय योजनांचा लाभ कसा होईल याकडे लक्ष दिले आणि त्या दिशेने कठोर अंमलबजावणी केली. प्रसंगी वरिष्ठांना जुमानले नाही पण कायद्याच्या तरतुदीप्रमाणे आग्रही राहून आपले काम पुढे रेटले. नोकरीत अनेकांना दुखावले, वाईटपणा घेतला पण सामाजिक बांधिलकीशी तडजोड स्वीकारली नाही. एका गावातील दलितांच्या विहिरीत विष्ठा आणि शेण टाकले जाते. खबर मिळताच मामलेदार असलेले केशरशिवम घटनास्थळाकडे धाव घेतात. दिवसभर घटनास्थळी ठिय्या मारून गावकऱ्यांकडून विहिरीतील सगळं पाणी उपसून घेतात. गावातील दलित तरुणांना सुनावतात. तुम्ही संघटित नसल्यामुळे असे प्रकार घडतात हे निदर्शनास आणून देतात. दलितांना गायरान, सरकारी जमिनी शासकीय नियमानुसार कशा उपलब्ध होतील याबाबत प्रयत्न करतात. बेरोजगार दलित तरुणांना राष्ट्रीयकृत बँकांकडून कमी व्याजदरात कर्ज कसे उपलब्ध होईल त्याबाबत प्रस्ताव मांडतात. केवळ सचोटी आणि प्रामाणिक अधिकारी अशी प्रतिमा असल्यामुळे त्यांना राजभवनात अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळते आणि राजभवनात काम करणारे ते पहिले दलित अधिकारी ठरतात. प्रशासनामध्ये अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या वाट्याला जे येते ते यांच्याही वाट्याला आले. वेळेवर प्रमोशन मिळाले नाही. कार्यकारीपदाला मुकावे लागले. विभागीय चौकशीला सामोरे जावे लागले. सतत मनस्ताप भोगावा लागला. आयएएस केडर मिळू शकले नाही. या सर्व गोष्टींबद्दल बी. केशरशिवम यांना दुःख झाले पण आपण आपले कर्तव्य प्रामाणिकपणे निभावले याचे समाधानही त्यांना मिळाले. या समाधानातच त्यांनी सुख मानले.

साधना प्रकाशन

पूर्णसत्य

बी. केशरशिवम




सुधाताई बोडा यांनी या आत्मचरित्राचा प्रवाही अनुवाद मराठीत केला आहे. आत्मचरित्राच्या वाचनीयतेला कुठेही बाधा निर्माण होत नाही. मूळ आत्मचरित्रात कुठेही अभिनिवेश आणि आत्मगौरव नाही. जे अनुभवाला आले ते निर्लेपपणे लेखकाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. दलित आत्मकथनातील नाट्यमयता विलक्षण असते. शून्यातून सुरू झालेला प्रवास उत्तरार्धात उज्ज्वल अशा कार्यकर्तृत्वाकडे झेपावतो. 'पूर्णसत्य'मध्येही त्याची प्रचीती येते. किशोरवयातच आपल्याला लेखन जमू शकते हा लेखकाला आलेला आत्मविश्वास त्यांना लेखनप्रांतात स्थिरावतो. आपल्या जीवनात चटका लावणाऱ्या ज्या नाट्यमय घडल्या त्यावर आधारित लेखकाने कथालेखन केले. ते प्रतिष्ठित नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. कथासंग्रह नावाजले गेले. लेखनासाठी कल्पनाशक्तीवर विसंबून राहावे लागले नाही. अनुभवाच्या ऐवजाने कथाविषय पुरवले आणि त्यांनी तितक्याच संवेदनशीलतेने त्याचा आविष्कार केला. आता तर त्यांच्या आयुष्यभराचा जीवनानुभव 'पूर्णसत्य'मध्ये एकवटला आहे. वाचकांना तो अस्वस्थ आणि अंतर्मुख करील याची मला खात्री वाटते.

**- मनोहर जाधव**
भ्रमणध्वनी : ९८२२८५०२९०

**पृष्ठे २८४, मूल्य २५० रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**




# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

**मराठी व्याकरणातील वादस्थळे**
**डॉ. सुनील रामटेके**




व्याकरण हा विषय तसा जटिलच. त्यातल्या वादग्रस्त जागा शोधून काढायच्या म्हणजे निबिड काळोखात घनदाट जंगलातून वाट शोधण्याचा प्रकार, परंतु असे धाडस डॉ. सुनील रामटेके यांनी केले, नव्हे त्यांनी वाट शोधली आणि सुखरूपपणे त्यातून बाहेरदेखील पडले. अर्थात त्यासाठी किती प्रयास करावे लागले, याची कल्पना त्यांनी दिलेल्या संदर्भस्थळांच्या यादीवरून येते. एकदोन नव्हे, तब्बल एकेचाळीस तज्ज्ञांच्या संदर्भांची यादी आहे. तो आवाका अचंबित करणारा आहे. आणि त्यामुळे कुतूहलही आहे. व्याकरणात वादस्थळे आहेत ती कशी, कोणती आणि कुठे? त्याच कुतूहलापोटी या ग्रंथांचे वाचन केले. आणि त्यावेळी जाणवले, व्याकरणाबाबत आपण किती वरवरचा विचार करतो. कुठे अडले, नाही समजले तर ती जागा सोडून पुढे जातो. परंतु डॉ. रामटेके यांनी नेमक्या त्याच जागांचा शोध घेतला. त्या अर्थाने हा एका अज्ञात प्रदेशाचा प्रवास, शोध आणि परामर्श म्हणावा लागेल. जो वाचत असताना मति गुंग करून टाकतो, नवीन काही सापडल्याचा आनंद देतो, आणि डॉ. रामटेके यांच्या प्रयासाला सलाम करायला भाग पाडतो.

व्याकरण म्हणजे काय? भाषा म्हणजे काय? प्रमाण कुणाला मानायचे, बोली की लिखित भाषेला? भाषा आणि व्याकरण यांचा परस्पर संबंध कसा? भाषा आधी की व्याकरण आधी? असे काही प्राथमिक प्रश्न आहेत. मग व्याकरणाची परंपरा इथपासून सुरुवात करून यातील तर्खडकर, चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले ते आगरकर, खेर गुंजीकर, दामले, राजवाडे, अर्जुनवाडकर अशा अनेक व्याकरणकारांविषयीचा तपशील, त्यांचे वेगळेपण, भाषा आणि व्याकरण यांचा मागोवा घेतलेला आहे. मराठीमध्ये शब्दयोगी अव्यये ही प्रत्यायासारखी असतात. तेव्हा त्यांना शब्द म्हणायचे का? काही शब्दयोगी अव्यये स्वतंत्रपणे येतात व त्यांना अर्थ असतो. मग त्यांची ओळख शब्दजाती म्हणून कशी करायची? अशा प्रश्नांचा परिचय या प्रबंधातून होतो. मराठीतील शब्दांच्या जातींचा विचार केला असता असे लक्षात येते की, आठ जातींच्या व्यवस्थेचा विचार इंग्रजीच्या अनुषंगाने केलेला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी दोष निर्माण झाले आहेत, असे त्यांनी नमूद केले आहे. मराठीतील शब्दविचार या प्रकरणात नामापासून उभयान्वयी अव्ययापर्यंतचा शोध आहे. संयुक्त क्रियापदे, विभक्ती– द्वितीया आणि चतुर्थी (स ला ते / स ला ना ते ), शब्दसिद्धी आणि प्रत्यय, उपसर्ग, समास असा विस्तृत पट आपल्यासमोर उलगडून ठेवलेला आहे. तज्ज्ञांनी त्यांच्या विचाराचा ठेवलेला खजिना हा वेगवेगळ्या स्वरूपातील आहे. त्यांच्यातील सूत्र एक असले तरी त्यातील परामर्श, विमर्श, व्याख्या यांच्यात भेद आहेत. त्यामुळे काही वाद उपस्थित झालेले आहेत. या सगळ्यांचा शोध घेऊन त्यांवर आधारित निष्कर्ष काढण्याचे अवघड काम डॉ. रामटेके यांनी केले आहे. त्यातला नेमकेपणा शोधला आहे. आठ प्रकरणात हा प्रबंध बांधेसूदपणे साकारलेला आहे. प्रत्येक प्रकरणात प्रास्ताविकापासून ते निष्कर्षापर्यंत मांडणी केलेली आहे, खाली संदर्भांची सूची दिलेली आहे. शेवटी परिशिष्ट आणि समग्र संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

'मराठी व्याकरणातील वादस्थळे' हा डॉ. रामटेके याचा प्रबंधाचा विषय आहे. त्यासाठी त्यांनी केवळ विषयाचा शोध घेतला आहे असे नाही, तर त्यांची उकल केली आहे, त्यांचा परामर्श घेतला आहे. निष्कर्षापर्यंत येऊन ठाकले आहेत. असे करीत असताना तज्ज्ञांच्या विचारांना धक्का लागण्याची, परिणामी रोषाची आपत्ती येणे स्वाभाविक ठरते. परंतु डॉ. रामटेके यांनी निर्भीड आणि चिकित्सकपणा दाखवून सखोल, समतोल, वस्तुनिष्ठ असे संशोधन पार पाडले, तेही सगळ्यांच्या मतांचा, विचाराचा, सूत्रांचा आदर ठेवून. त्यासाठी वापरलेली पद्धती सुलभ, सोपी, आकलनाकडे घेऊन जाणारी आहे. भाषेवरील प्रभुत्व नजरेत भरणारे आहे. आणि काढलेले निष्कर्ष निर्विवाद आहेत. त्यामुळे अभ्यासकांना एक मोठे दालनच त्यांनी खुले करून दिले आहे, असे म्हणता येईल. त्यांची भूमिका स्पष्ट करणारी प्रस्तावना त्यासाठी अभ्यासकांनी जरूर नजरेखालून घालावी. व्याकरणातील जटिलता आणि त्यांची उकल स्पष्ट करणारे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी सजवले आहे. ते विषयाला साजेसे असेच आहे.


**मूल्य ४०० रु. • सवलतीत २२० रु.**

# ग्रंथपान

''नियतीनं पुरुषाला भयंकार शाप दिलाय डॅडी! वयात आल्यापासून ते सरणावर चढेतो , तो अनोळखी स्त्रीकडे  वासना वा विकृतीपलीकडच्या कुठल्याही भावनेनं बघू शकतो, यावर दुसरा पुरुषही विश्वास ठेवत नाही.'' हे वाक्य आहे, स्मिता भागवत यांच्या 'अचानक...' या कादंबरीतलं. कादंबरी वाचत असताना हे वाक्य १९०व्या पानावर अचानक समोर आलं, काही काळ स्तब्ध झालो. (यासंबंधातला प्रसंग कादंबरीच्या ६ व्या पानावर आलेला आहे.) नेमकं सत्य कशाभोवती गुंडाळलं गेलेलं असू शकतं, तर ते अशा वाक्यांभोवती. हे सत्य किती विदारक असू शकतं, हा आणखी वेगळा भाग. कदाचित अनुभवपरत्वे भिन्न असू शकेल, वास्तव मात्र तेच राहते. कालपरत्वे गढूळ पाणी नितळ झाल्यानंतर साक्षात्कार होणारी मंडळी शुद्धतेचे दाखले देत राहतात, तोपर्यंत पुरुषाच्या जगण्यातलं सत्वच नाहीसं होऊन गेलेलं असू शकतं, गाळ खाली बसल्यासारखं. या कादंबरीचा बराचसा भाग व्यापला आहे तो या सत्याभोवती. पुरुषी नजरेचा अन्वयार्थ आणि त्यातून वाट्याला आलेले कटू अनुभव, हे सत्याइतकेच कटू असतात. त्या सत्याचा अन्वयार्थ शोधण्याचा खडतर प्रयास म्हणजे ही कादंबरी; 'अचानक'!

**अचानक**

**स्मिता भागवत**




ही एका विद्वान नायकाची शोकांतिका आहे, संदीप शहा नावाच्या. फाळणीच्या क्रौर्याने होरपळलेलं मन, उध्वस्त झालेलं कुटुंब, अंधारमय वाटावा असा अनिश्चित भविष्यकाळ, यात एकच जमेची बाजू, बुद्धिमत्ता. तिच्या जोरावर स्वतःला अत्युच्च शिखरावर पोहोचण्याचे धाडस तो दाखवतो, परंतु अत्युच्च शिखरावर सारेच रम्य असते, ही कल्पना भ्रामक ठरते. आणि 'आपुले मरण पाहिले म्या डोळा', ही अवस्था समोर उभी राहते, कधी ठरवून, कधी अचानक!

कुठलाही नायक स्वतःचे आयुष्य स्वतः घडवू शकत नाही. त्यात प्रिंससारखा मित्रही खूप मोलाची कामगिरी बजावतो. क्षत्रिय कुलोत्पन्न उदयसिंह उर्फ प्रिंस केवळ मित्रत्वाचे नाते दाखवत नाही, क्षत्रिय कुळाला साजेसे कुलाचाराचे शस्त्र पाठीशी धरून उभा राहतो, अगदी अखेरपर्यंत. त्यामुळे ही कादंबरी जरी सुदीप शहाची आहे, तरी, प्रिंस हा तिचा उपनायक आहे. विक्रमसारखा विद्यार्थी गुरुजनांचा करावा तितका आदर करतो, नव्हे कर्तव्यभावनेने संपूर्ण जबाबदारी घेतो. या विक्रमचे नाते म्हणजे प्रिंसचा जावई, आणि प्रिंसची कन्या प्राची,  तिचे 'प्राची' हे नामकरण संदीपने केलेले आहे.

डॉ. जॉर्ज ही एक प्रभावी व्यक्तिरेखा या कथानकात आहे. ती संदीपचा पुर्नजन्म करते, संदीप ऐवजी 'व्ही जे प्रसाद' या नावाने. डॉ. जॉर्ज हे त्याच्यासाठी मानसपिता ठरतात.  कठीण परिस्थितीत सदैव सोबत करतात. तर मेहरा नावाचा सासरा. कपट आणि धूर्तपणा असलेला.  गर्विष्ठ पूनम आणि भाबडी प्रिया अशा दोन मुलींचा पिता. कधीकाळी  प्रिंसच्या राजवाड्यात काम केलेला, चोरी करून पळालेला. संपत्ती आणि वैभवाला किंमत देणारा. संदीप उर्फ प्रसाद या नायकाचा छळ करणारा. त्याची मुलगी प्रिया ही प्रसादची पत्नी झाली, पुढे तीही बापाप्रमाणेच प्रसादच्या छळात सहभागी झाली. पूनम तर कॉलेजपासूनच त्याचा द्वेष करीत होती. आणि उरला सुरला छळ कॉलेजच्या मुलांनी केला, त्याला कारण अल्पना. असा छळ की त्याला एकच उपाय, राजीनामा आणि कॉलेज सोडणे.  जगण्याने छळले होते...अशी अवस्था. यात इतर व्यक्तिरेखा येतात, पैकी दिप्ती व अल्पना या कन्या.  त्यांच्या व्यक्तिरेखांतील बदल हा कादंबरीचा तोल सांभाळण्यात मोलाची जबाबदारी पार पाडतो.

एक कादंबरी म्हणून या साहित्यकृतीकडे पाहताना ती सर्व निकषांवर उतरली आहे, हे स्पष्टपणे दिसते. कथानकाचा वेग कायम ठेवण्यासाठी फ्लॅशबॅक पद्धतीचा अवलंब केलेला आहे. मुख्य कथानक संदीप शहाचे आहे, परंतु यात आलेल्या व्यक्तिरेखांची स्वतंत्र वाटावीत अशी उपकथानके आहेत.  त्यांच्या वास्तवाची वर्णने तितकीच चपखल आहेत. स्वभाव, गुणदोष, नाती यांच्यातील बारकावे लहाल लहान तपशीलातून उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि त्याच उत्तम कलाकुसरीने त्या सगळ्यांना एकत्र गुंफण्याची किमया केलेली आहे. विमानात बसलेल्या प्रसादला बाहेर बोलावण्यासाठी खोटी अनाऊंसमेंट केली जाते, 'डॉ. प्रसाद, ..युवर डॉटर इज फेसिंग क्रिटिकल प्रॉब्लेम.' क्षणार्धात प्रसादला गळफास आवळलेल्या बापूचं प्रेत हेलकावल्याचा भास होतो. गुंफण घटनांची, नात्याची, पुन्हा काळाची. वाचताना लेखिकेच्या कल्पकतेची, प्रतिभेची उंची पुन्हा पुन्हा प्रत्ययाला येत राहते.


सतीश भावसार यांची मुखपृष्ठाची कल्पकता नेहमीच वाचकाच्या कल्पनेला साद घालणारी असते. कथानकातला नायक जो सतत परिस्थितीचा सावज ठरत गेला, तरी त्याने आपला स्वाभिमान आणि मनाचे हळवेपण कायम जोपासले आहे. हे जपणे मोडून गेलेल्या खोडावर विसावलेल्या लहानशा पक्ष्याप्रमाणे. अल्पना ही कन्या या पक्ष्याप्रमाणेच लहान, निरागस परंतु तीच एका टप्प्यावर मोडून पडायला कारणीभूत ठरलेली. हे सारे उत्तम रीतीने मुखपृष्ठावर उतरले आहे.

**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

## सत्यमेव जयते

**यशवंत व्हटकर**




यशवंत व्हटकरांनी पोलिसदलात प्रवेश केला तो उपनिरीक्षक या पदावर, ते साल होते १९८४. आज आपल्यासमोर ते त्यांचे तिसरे पुस्तक घेऊन येत आहेत तेव्हा त्यांचा हुद्दा आहे साहाय्यक पोलिस आयुक्त! म्हणजे पूर्ण तीस वर्षांचा अनुभवसिद्ध लेखक आपल्या भेटीला आले आहेत, असे ठामपणाने म्हणता येते. पोलीसदलातला एक जबाबदार कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण करणे म्हणजे तळहातावर निखारा ठेवून चालण्यासारखे, परंतु व्हटकर त्यात यशस्वी ठरलेले आहेत, तावून सुलाखून निघालेल्या अजोड दागिन्यासारखे, त्याचा चढता आलेख आपल्यासमोर त्यांनी ठेवला आहे तो 'गुन्हेगारांच्या मागावर', 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' आणि 'सत्यमेव जयते' या तीन पुस्तकांतून!

मुंबईत गँगस्टर स्वतःचा सुभा कसे सांभाळतात, याच्याविषयीची माहिती साधारणपणे मुंबईतल्या प्रत्येकाला असते, अगदी नावासहित. त्यातले एक नाव आहे अरूण गवळी यांचे. त्यांचा दगडीचाळीचा गड कसा अभेद्य आहे हेही सर्वजण जाणून आहेत. परंतु त्या गडाला सुरूंग लावला आणि डॅडी जन्मठेपेवर पोहोचले, ते व्हटकरांच्या साहसी कारवाईमुळे. तीच तऱ्हा चिन्या उर्फ अशोक मोनासिंग नेपाळी या तीस गुन्ह्यांचे रेकॉर्ड अंगावर असलेला आणि हातात कायम दीड फुटाचा कोयता बाळगणारा गुंड याची. तोही पकडला गेला. खंडणी घेऊन पेपर चालवणारा तिवारी ठिकाणावर आला. मुंबईत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, हा महानगरपालिका, न्यायालय आणि पोलीस यांच्यासाठी एक जटील प्रश्न. ही अतिक्रमणे, बांधकामे पाडणे व त्यासाठी पोलीस बंदोबस्त याचा खर्च महापालिकेला सोसावा लागतो. महम्मदी मस्जिद प्रकरण प्रदीर्घकाळापासून प्रलंबित होते. त्याच्यावर पूर्णपणे कारवाई झाली ती व्हटकरांच्या धाडसामुळे, प्रश्न सोडविण्याच्या कुशलतेमुळे. साकीनाका येथील एका व्यापाऱ्याचा मुलगा, मैफुस याचे खंडणीसाठी अपहरण करण्यात आले होते. त्याची सुटका सहीसलामत झाली, ती व्हटकरांच्या कार्यपद्धतीमुळे.

३० जून २००७ रोजी पुराचा जबरदस्त फटका साकीनाका भागाला पोहोचला. तेव्हा तेथील जवळपास ६५ लोकांना वेढलेल्या पुरातून बाहेर काढण्याचे काम व्हटकरांच्या तुकडीने त्यांच्यासह केले, परंतु त्याचे मिडियासमोर भांडवल केले नाही. लग्न जुळवायला घरी कुणी नाही म्हणू लग्नाशिवाय राहिलेल्या वर्षाचे लग्न जुळले पाहिजे म्हणून त्यांनी दाखविलेली तळमळ आत्मीयतेची होती. दारूपायी घराकडे दुर्लक्ष करणाऱ्या चव्हाण अंमलदारास योग्य त्या मार्गाने व्यसनमुक्त करून कुटुंबवत्सल बनविले. साबिरा नावाच्या बाईने पोलिसांवर केलेले बलात्काराचे आरोप, त्यात आहुती पडणाऱ्या विनय घोरपडे या सहकाऱ्यासाठी त्याच्या पाठीशी शेवटपर्यंत उभे राहून एकाकीपणे दिलेली झुंज यशस्वी झाली, ती व्हटकरांमुळे. सत्यासाठी हा लढा आवश्यक होता, तो त्यांनी जिद्दीने तडीस नेला. पोलिसांची होणारी बदनामी दूर करून त्यांनी शान वाढविली. पोलिस ठाणे, पोलिसवसाहत स्वच्छ व सुंदर ठेवता येते, रिकाम्यावेळात, खेळ-व्यायाम असे उपक्रम पोलिसांसाठी राबविता येतात, हा अनुभव पोलिसांना मिळाला तो व्हटकरांच्या सौंदर्यदृष्टीमुळे.

व्हटकरांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी वरिष्ठाची प्रशंसा, प्रशस्ती, रोख बक्षिसे, बढती मिळाली. तरी सगळेच सुरळीत होते असे नव्हे. कोर्टात जाताना गणवेष घातला नाही म्हणून झालेला अवमान, पटेलबंधूप्रकरणी हलगर्जीचा ठपका ठेवून झालेली शिक्षा. वरिष्ठांची अवकृपा आणि त्यातून झालेला मानसिक त्रास, हेही व्हटकरांच्या वाट्याला आलेले आहे. किंबहुना वरिष्ठांची अवकृपा हाताखालच्या कर्मचाऱ्याला कशी देशोधडीला लावू शकते, याचेही उदाहरण म्हणून राजा सावंतचे प्रकरण दिलेले आहे. तशी काही परमवीरसिंह, बिहारी, प्रसन्ना, त्यागी मॅडमसारखी चांगली वरिष्ठमंडळीही त्यांना भेटली आहेत.

पुस्तकांची मांडणी करताना ती प्रकरण क्रमांक घालून केलेली आहे. प्रकरणांच्या सुरुवातीला थोर साहित्यिक, विद्वान, तत्त्वज्ञ यांचे विचार शीर्षभागी दिलेले आहेत. उत्तम साहित्य वाचनाचा छंद त्यांनी जोपासलेला आहे, याचा प्रत्यय यातून येतो. हेमंत करकरे, अशोक कामठे, विजय साळसकर हे २६/११ च्या दहशतवादी हल्लयात शहीद झाले, त्यांच्याविषयीच्या हृद्य स्मृतींना 'आदरांजलीत' उजाळा दिलेला आहे. त्यांच्याविषयी लिहिताना ते नमूद करतात, ' देशबांधवांच्या रक्षणासाठी रणांगणात धावून गेले आणि धारातीर्थी पडले, अमर झाले... देशावर आलेल्या संकटाचा मुकाबला करण्यास प्रथम महाराष्ट्रच उभा राहतो. '

एका कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय, तडफदार, सौंदर्योपासक व करड्या गणवेशात माणुसकीचा गहिवर असलेल्या यशवंत व्हटकर नावाच्या अधिकाऱ्याशी आपली खूप जुनी मैत्री आहे, आपण त्यांच्या खूप जवळचे आहेत; ही भावना आपोआप त्यांची पुस्तके वाचल्यानंतर मनात रूजत जाते. पोलिसखात्यात सगळेच यशवंत व्हटकर असतील तर किती चांगले होईल.

पुंडलिक वझे यांनी 'मुंबई आणि मुंबईचे पोलीस' ही संकल्पना समोर ठेवून 'जागल्याची' प्रतिमा सुरेखपणे मुखपृष्ठावर चितारली आहे.

**मूल्य ३०० रु. • सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान




'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे पुस्तक म्हणजे यशवंत व्हटकर यांच्या कारकिर्दीचा दुसरा टप्पा. पोलीस खात्यात नोकरी करीत असताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे, हे त्यातले मोठे आव्हान. पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली म्हणजे आपल्याला न्याय मिळणारच, अशी ही अपेक्षा असते. परंतु तिची पूर्तता करताना पोलिसांना किती जिवाचे रान करावे लागते, तहानभूक विसरून माग काढीत जावे लागते. वरिष्ठ, राजकीय हस्तक्षेप, नागरिकांच्या भावना, यासारख्या अनेक कुंपणांची कदर करावी लागते, काटेरी भासत असूनही. स्थळ–काळ कुटुंब यांचे भान विसरून कर्तव्याला समर्पित भावनेने पार पाडण्यासाठी झोकून द्यावे लागते. सत्य, न्यायाची कास धरून खलप्रवृत्तीचे दमन करण्याच्या ध्यासासाठी आपले कौशल्य आणि शक्ती पणाला लावावी लागते. याची कल्पना यातून वाचकांना यावी, असे हे पुस्तक.

यशवंत व्हटकर यांनी अधिकारी या नात्याने लोहियासाहेब, आव्हाडसाहेब, विक्रम मराठेसाहेब, बिहारीसाहेब, केदारीसाहेब, अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विविध खात्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी कामे केलेली आहेत. त्यांची प्रशंसा मिळविलेली आहे. काहीवेळेस रोषालाही सामोरे गेलेले आहेत, परंतु आपल्या कामातले नाणे कायम खणखणीत राहील याबाबत दक्षता घेतलेली आहे. खून हा या दलासाठी सगळ्यात घृणास्पद आणि क्लिष्ट प्रकार. त्याची उकल करताना पोलिसांना किती दिव्यातून जावे लागते याची कल्पना या घटनांचे तपशील वाचल्यानंतर लक्षात येते. भारती पाटील खून, ननकूने केलेला खून, गोदीत काम करणाऱ्या बाळूचा खून, अशी काही प्रकरणे आहेत. यांचा शोध घेताना स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अभ्यास किती अंगांनी करावा लागतो, संशयिताला गुन्ह्याच्या मुळाशी आणताना चातुर्याची कशी कसोटी लागते, हे थक्क करणारे अनुभव मुळातून वाचण्यासारखे आहेत. यातील धारावीतील एका खुनाच्या तपासासाठी रामप्यारे नावाच्या संशयित आरोपीला पकडण्यासाठी उत्तरप्रदेशातील प्रतापगड नावाच्या गावी जाण्याचा प्रसंग व त्यातून उद्भवलेल्या घटना म्हणजे स्वतःहून स्वर्गाच्या द्वारावर थाप देऊन त्याला उघडायला भाग पाडण्याचाच प्रकार.

तेलगी प्रकरणाने बनावट स्टॅम्पपेपरचा घोटाळा उघड झाला. परंतु त्याच्यावरही मात करू शकेल असे मुद्रांकशुल्क बनावट फ्रँकिंग प्रकरण निर्माण झाले, तेव्हा सगळ्यांनाच अचंबा वाटल्याशिवाय राहिला नाही. यातला प्रमुख सूत्रधार अशोक पारेख याच्यापर्यंत माग काढून, हे प्रकरण धसाला लावण्यात दाखविलेले कौशल्य, हे 'रॉ' संस्थेच्या पातळीवरचे ठरावे. विक्रोळीत मिरवणुकीच्या दरम्यान झालेल्या स्फोटाचे निदान वेळीच केल्याने मोठी जातीय दंगल टळू शकली. तेलचोरांचे रॅकेट वेळीच पकडल्याने संभाव्य अग्निस्फोट व त्यातून होणारी मोठी हानी टळू शकली. मेधा पाटकरांच्या मंत्रालयाजवळील उपोषणाने निर्माण झालेली परिस्थिती, कोर्ट आदेश, यांच्यामध्ये सापडलेले पोलीसखाते, परंतु अतिशय संयमाने हे प्रकरण हाताळल्याने नामुष्की टळली. अंबानीच्या घरी रात्री दहानंतर सुरू असलेला डीजेवरील गरबा शांत करण्यासाठी योग्य ते भान ठेवून कारवाई केली. अनधिकृतपणे मंदिर उभारणे, मोकळ्या जागेत पक्षाचा झेंडा लावणे, यातून जातीय तेढ निर्माण होते. त्यावर कारवाई करून ही तेढ दाबून टाकली. अशा कितीतरी घटना आहेत, ज्या ठिकाणी यशवंत व्हटकरांतील अधिकाऱ्याच्या कुशलतेचा कस लागलेला आहे. राजीव – मीनल यांच्या प्रेमविवाहाला विरोध करणाऱ्या आप्तांना शांत करून प्रेमवीरांना शांततेचे आयुष्य बहाल करण्यात दाखविलेले औदार्य, पार्ला बॉम्बस्फोट प्रकरणात शेवटच्या टप्प्यापर्यंत जाण्यासाठी केलेली धडपड वाखाणण्यासारखी ठरूनही अपयश आले, ही जिव्हारी लागणारी खंत, त्यांच्यातल्या माणूसपणाची साक्ष देतात.

राजकीय हस्तक्षेप किती पराकोटीचा असतो, त्याचा इमानदार अधिकाऱ्यास कसा त्रास सहन करावा लागतो, याचे उदाहरण म्हणजे शांतीनगरची निवडणूक. तडकाफडकी बदलीची शिक्षा व्हटकरांच्या वाट्याला आली ती इथे. कामाच्या अतिघाईतून हरवलेल्या सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमुळे झालेली शिक्षा, नाते राखलेल्या अधिकाऱ्यांच्या जवळच्या माणसांची कसून चौकशी केली म्हणून ओढवून घेतलेली नाराजी, गंभीर आजारपण व आकसापोटी नाकारलेली 'रजा', अशा प्रसंगांनी त्यांच्यावर मानसिक आघातही केले आहेत. कोल्हापूर प्रवासात चहात गुंगीचे औषध टाकून फसवणारा सहप्रवासी त्यांना वेगळी चुणूक दाखवून जातो, हेही त्यांनी प्रामाणिकपणे मान्य केले आहे.

यशवंत व्हटकरांचे हे लेखन अनुभवसिद्ध आहे. यात त्यांचे अधिकारी म्हणून असलेले गुण, माणूस म्हणून असलेले माणूसपण आणि त्यांचे सहकारी याविषयीचा मोकळेपणा सहजपणे उतरला आहे. कुठे आकस, द्वेष, कटुता नाही की स्वतःची स्तुती नाही. जसे घडले तसेच निवेदन केले, असेही नाही. तर त्यात ओघवतेपण आहे, लालित्य आहे. त्यामुळेच ते वाचताना वाचकाला आपल्यासोबत प्रवासाला घेते. पोलीसखात्याची ठळक निशाणी म्हणजे वर्तुळातील स्टार, त्यात हाताचा पंजा; अधिकाऱ्याची निशाणी म्हणजे छडी आणि कॅप; आणि गुन्हेगार शोधण्यासाठी बोटाचा ठसा व भिंग, यांचा योग्य तो समन्वय ठेवून सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सजविलेले आहे. त्यामुळे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्याचे शीर्षक सजीव झाले आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**



'ग्रंथाली' ४२ वा वाचकदिन ग्रंथदिंडीत सहभागी पुस्तकप्रेमी



निमंत्रितांचे अभिवाचन सहभाग
श्रीनिवास नार्वेकर, ललित प्रभाकर, अभिजित झुंझारराव, संपदा जोगळेकर, दीपक करंजीकर आणि चंद्रकांत मेहेंदळे







डावीकडून : पु.शि. रेगे यांचा 'सावित्री' रंगमंचीय आविष्कार – रवींद्र लाखे आणि प्रिया जामकर.
म्हादू चित्रपट प्रदर्शन – संदेश भंडारे आणि संगीतकार कौशल इनामदार.
कविसंमेलन : सतीश काळसेकर, किरण येले, गुरूनाथ सामंत आणि वसंत दत्तात्रय गुर्जर



'झी' कलावंतांची सदिच्छा भेट.
संजय मोने, विवेक आपटे आणि
शर्वरी पाटणकर



संगीत आणि साहित्य मैफल
पं. सत्यशील देशपांडे आणि
त्यांचे सहकलाकार



'ग्रंथाली' वाचकदिनास
सहभागी मान्यवर

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




" मधुमेह, अतिरक्तदाब, लठ्ठपणा
या हृदयरोगाच्या पाऊलखुणा
प्राणघातक होण्याआधीच
त्यांचा धोका संपवूया.
यासाठी वेळीच योग्य व नियमित
आरोग्य तपासण्या करूया. "

श्री. दिलीप प्रभावळकर
ज्येष्ठ अभिनेते, लेखक आणि जनजागृती मोहिमेचे सदिच्छादुत

हृदयरोग प्रतिबंध मोहिमेअंतर्गत वैद्य साने ट्रस्टव्दारा जनहितार्थ प्रकाशित

३०+ च्या पुढे वय, चालताना धाप, पायांवर सूज, डायबिटीस, उच्च रक्तदाब, वाढलेलं वजन, ब्लॉकेजेस, यापैकी कोणतेही लक्षण असेल तर आजच जवळच्या माधवबाग™ क्लिनिकमध्ये अपॉईंटमेंट घ्या व तणावमुक्त आयुष्य जगा!

हृदयविकारांवरील विनाशस्त्रक्रिया आयुर्वेदिक उपचारांसाठी
अग्रगण्य हार्ट केअर इन्स्टिट्यूट, माधवबाग™

| कार्डीॲक रिस्क असेसमेंट | कार्डीओ असिस्ट असेसमेंट |
|---|---|
| तपासणी अंतर्गत: इ सी जी, ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर) एस पी ओ 2, बी एम आय ~~₹450~~ फक्त ₹150* | तपासणी अंतर्गत: कॉम्प्युटराईज्ड स्ट्रेस टेस्ट, इ सी जी, ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर), एस पी ओ 2, बी एम आय ~~₹2400~~ फक्त ₹1050* |

सोबत एक्सपर्ट डॉक्टर्सचे कन्सल्टेशन आणि डाएट चार्ट

या टेस्ट फक्त माधवबागच्या क्लिनिक्समध्ये उपलब्ध (ही सवलत मर्यादित कलावधी करिता)

**माधवबाग फ्रॅन्चायझी देणे आहे**

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश, मुंबई, पुणे येथिल इच्छुक BAMS / MD (Ayurved) डॉक्टरांनी संपर्क साधावा.

फोन नं. 7738070018 / 19

E-mail id : vsal.franchise@gmail.com

नावनोंदणी आवश्यक,
अधिक माहितीसाठी आजच मिस कॉल द्या

**022-33494950**

माधवबाग

/madhavbaug.heartcare
YouTube /Madhavbaug
www.madhavbaug.org


मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.